
विचारविश्वाची ओळख

डॉ. सुहास पेठे



विचारविश्वाची

ओळख

(आपल्या विचारांच्या विश्वाची ओझरती व उपयोगी ओळख)

डॉ. सुहास पेठे

एम्. ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

* विचारविश्वाची ओळख

पुस्तकरूपाने प्रकाशित चौथी आवृत्ती : नोव्हेंबर २०१४
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

माणसाच्या जीवनाचं
सार्थक घडवण्यात
मोलाची कामगिरी बजावणाऱ्या
'विचारा'स ...

- सुहास पेठे

विचारविश्वाच्या

ओळखीपूर्वी...

आपण दररोजचं वृत्तपत्र उघडलं तरी अशा अनेक बातम्या आपल्याला आढळतात की, ज्यांनी आपल्याला कुणालाही अस्वस्थ व्हायला होतं. उदाहरणार्थ, 'एस्.एस्.सी. च्या परीक्षेतल्या अपयशानं खचून जाऊन विद्यार्थ्याचा आत्महत्येचा प्रयत्न', 'दिवाळीत नवे कपडे घेतले नाहीत म्हणून निराशेने घरातून पळून जाण्याचा मुलीचा प्रयत्न', 'गैरसमजातून दोन गटांत भीषण मारामारी'– अशा एक ना दोन अनेक बातम्या समोर येत असतात. त्या अनेकदा कौटुंबिक पातळीवरच्या संघर्षाच्या असतात, कधी सामाजिक पातळीवरच्या तणावांच्या असतात, कधी दोन दृष्टिकोनांच्या, मतभेदांच्या टोकाच्या अभिव्यक्तीच्या असतात–त्रयस्थ म्हणून म्हणा किंवा शांतपणे विचार केला म्हणून म्हणा, आपल्याला अनेकदा स्पष्ट दिसत असतं की, अशा अनेक दुर्दैवी परिस्थितींचं मूळ त्या त्या व्यक्तींच्या मनातल्या अपरिपक्व विचारांत असतं. तो जर पुरेसा, प्रगल्भ, शुद्ध, व्यापक घडेल तर अनेकदा अशी टोकाची, निराशाजनक परिस्थिती निर्माण होणारच नाही. या अर्थानं विचार केला तर आपण ज्या 'व्यक्तिमत्त्व–विकासा'चा इतका खल करतो आहोत, त्यात या 'वैचारिक– विकासा'चा वाटा किती मोठा आहे, किती महत्त्वाचा नि प्रारंभिक आहे !

पण प्रत्यक्षात या वैचारिक जडणघडणीबद्दल साधारणपणे उदासीनताच आढळते, नाही का ? किंबहुना मुलांच्या पातळीवर असो वा मोठ्यांच्या पातळीवर असो, ही आपलीआपली जडणघडण तपासून पाहाण्याचे किंवा ती जाणीवपूर्वक विकसित करण्याचे प्रयत्न अभावानंच आढळतील. याचा परिणाम व्यक्तीव्यक्तीच्या आयुष्यातल्या स्वास्थ्यावर आणि सामाजिक प्रश्नांवर घडताना प्रत्यही दिसतोच आहे. या साऱ्या तळमळीपोटी या 'विचारांच्या विश्वा'कडं लक्ष वेधण्याचा हा कळकळीचा नम्र प्रयत्न आहे. तो करायची संधी काही व्याख्यानांच्या निमित्तानं मिळाली.पण त्याला अधिक भरीव स्वरूपात निमित्त मिळालं, ते १९९९ साली बेळगावच्या 'तरुणभारत'मध्ये लिहिलेल्या 'विचारविश्व' या लेखमालिकेमुळं. तो योग आणणारे तेथील तत्कालीन स्नेही सर्वश्री.संजय मोघे,सचिन प्रभुणे, किरण ठाकूरजी, मुकुंदराव फडके,उदय पतकी आदी सर्वांचा

मी कृतज्ञतापूर्वक उल्लेख करीत आहे.

आजपर्यंत 'विचार' या विषयावर विचार झाला नाही, असं अर्थातच नाही. पूर्वीपासूनच तत्त्वज्ञान, तदंतर्गत तर्कशास्त्र या शुद्ध विचाराचा शोध घेतच आहे. तद्धतच मानवी वर्तनाच्या, व्यक्तित्वाच्या अभ्यासाच्या अंतर्गत मानसशास्त्रही आज 'विचारप्रक्रियें'चा अभ्यास करीत आहे. आधुनिक काळातले एक योगी स्वामी शिवानंद सरस्वती यांच्या 'विचार सामर्थ्य' या सारख्या ग्रंथातूनही या विषयावर एका वेगळ्या पद्धतीनं प्रकाश टाकण्याचा प्रयत्न झालेला आहे. तरीही आपल्या दैनंदिन जीवनात सतत पडद्यामागं वावरणाऱ्या या विचाराचा नि त्याच्या प्रक्रियेचा शोध घेण्याचा एक छोटासा प्रयत्न 'ओळख'च्या निमित्तानं या पुस्तकाद्वारे केला आहे. या शोधाचा उद्देश अर्थातच 'विचारांचं काही शास्त्र' करण्याचा वा सांगण्याचा प्रयत्न नाही, तर साऱ्याच प्रक्रियेचं आपल्या दैनंदिन जीवनातलं महत्त्व जाणवून देणं व त्या प्रक्रियेविषयी आपल्याला जागरूक करणं, ठेवणं एवढाच मर्यादित आहे. या विषयाची व्याप्ती खूप मोठी असली तरी या पुस्तकाच्या मर्यादित जे काही थोडंफार आणण्याचा प्रयत्न केला आहे, तो वाचकांनी रुजू करून घ्यावा व अनुल्लेख–त्रुटींबद्दल उदार अंत:करणानं क्षमा करावी, ही प्रार्थना.

या पुस्तकाच्या पुढच्या आवृत्तीचा सुयोग आणणाऱ्या असंख्य वाचकांचा मी ऋणी आहे. पुस्तक जास्तीतजास्त वाचकांपर्यंत पोचवण्यासाठी त्याची किंमत कमीतकमी ठेवण्यासाठी झळ सोसणं हे आम्हा कुटुंबियांचं गुरुआज्ञेप्रमाणं केलेलं ज्ञानदान आहे. मात्र या पुस्तकाच्या डी.टी.पी.पासून त्याची ने–आण करणं, रखरखाव करणं व ते जास्तीतजास्त वाचकांपर्यंत पोचवणं – अशा अनेक मदती येथील साधक व या साहित्याचे चाहते उस्फूर्तपणे व सेवाभावानं करीत असतात. या सर्वांचा मी मन:पूर्वक आभारी आहे. त्यांच्या सहकार्याशिवाय हे ज्ञानदान सफल होऊ शकलं नसतं, याचा मी आवर्जून व अत्यंत कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतो. या साऱ्या सेवेचा विधायक विचाराच्या कामी सर्वांना उपयोग होवो, ही ईश्वरचरणी प्रार्थना.

संतछाया, सातारा

– सुहास पेठे

विचारविश्वाची ओळख : अनुक्रमणिका

१. ओळख : विचारविश्वाची/७
२. एक विशाल जग/१०
३. ओळखीची गरज/१३
४. विचारशलाकेचं सामर्थ्य/१६
५. शक्ती आणि शस्त्र/२०
६. सक्तीचा मामला/२३
७. सक्ती की संधी ?/२६
८. सावधतेची गरज/२९
९. काही वैशिष्ट्यं/३२
१०. टिकाऊ विचार/३५
११. विचारांचे प्रकार/३८
१२. विचारांचं वर्गीकरण/४१
१३. वर्गीकरणाची कारणं/४४
१४. आणखी एक वर्गीकरण/४७
१५. पहिला टप्पा/५०
१६. गृहीत धरण्यातले धोके/५३
१७. इंद्रियानुभवांच्या मर्यादा/५६
१८. चौथा घटक/५९
१९. विचारशास्त्राचा परिचय/६२
२०. अनुमानाचा वावर/६५
२१. निष्कर्षापूर्वी/६८
२२. निष्कर्षानंतर/७१
२३. 'वेगळ्या' विचाराचा चकवा/७४
२४. बघेपणाचा धोका/७७
२५. विचारविश्वापलीकडं/८०
२६. विचाराचा विचार/८३
२७. विचारविकास आणि आपलं जीवन/८६
२८. विकासातले अडथळे/८९
२९. विश्वविचार/९२

१. ओळख : विचारविश्वाची

आजचं आपलं दैनंदिन जीवन मोठं धावपळीचं दिसतं. काही सेवानिवृत्त, वृद्ध किंवा तत्सम सन्मान्य अपवाद सोडून देऊ या. पण उरलेल्या सर्वांचीच विलक्षण लगबग सकाळी उठल्यापासून रात्री झोपी जाईपर्यंत सुरू दिसते.

ती इतकी आहे की, अनेकदा माणूस त्या त्या क्षणी जे जे काम करताना दिसतो तो त्यात असल्यासारखा दिसतो खरा, पण अनेकदा त्या पुढच्या कामात तो मनानं कधीच पोचलेला असतो. सकाळी उठून चहा घेत बसलेला दिसला, तरी त्याच्या डोक्यात आंघोळ अन् जेवणाचं उरकण्याचा विचार सुरू असतो, जेवताना जेवणातल्या पदार्थांपेक्षाही वाटेतली बस, सिग्नल, गर्दी, रिक्शा अशा अनेक गोष्टींत तो पोचलेला असतो, बसमधून जाताना तो ऑफिसमधलं काम, त्यातल्या अडचणी, तिथली माणसं, त्यांचे स्वभाव, त्यांचे प्रश्न, त्यांची मतं - अशा अनेक गोष्टींत पोचलेला असतो.

ही परिस्थिती एखाद्या धंदेवाल्याची, व्यावसायिकाचीही असते, साध्या हमाल-मजुराचीही असते. इतकंच काय, शेवटी या धावपळीत रात्री अंथरुणावर अंग टाकतानाही तो अंथरुणात नसतो, धावत-धावत अपरिहार्यपणे उद्याचा विचार करण्यात गुंतलेला असतो.

इतक्या साऱ्या धावपळीच्या आणि व्यग्रतेच्या आयुष्यात त्याला जर 'थोडा विचार करू या' म्हटलं तर ते ऐकायलासुद्धा तो थांबणं कठीण आहे, असंच वाटेल, नाही का ? मग 'थोडा विचार करायचं तर जाऊच द्यात' ही प्रतिक्रिया होणं स्वाभाविक असलं, तरी याचा अर्थ ती प्रतिक्रिया बरोबर आहे, असं म्हणणं मात्र थोडं धाडसाचं आहे. कसं ते पाहू.

आत्ताच आपण आपली सारी धावपळ पाहिली. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंतची. त्या प्रत्येक टप्प्यात- चहा पिताना आंघोळ-जेवण, जेवताना प्रवास, प्रवासात ऑफिस, ऑफिसमध्ये घर, घरी येताच रात्रीची विश्रांती, रात्रीची विश्रांती घेताना उद्याचा दिवस - या प्रत्येक टप्प्यात आपण एकच गोष्ट नियमितपणे पण नकळत करीत असतो, ती म्हणजे विचार.

पहिल्या टप्प्यात दुसऱ्या टप्प्याचे, दुसऱ्यात तिसऱ्याचे, तिसऱ्यात चौथ्याचे - असे विचार आपण अखंड, अविरत करतो आहोत. त्यामुळं 'थोडासा विचार करायला थांबायलाही आपल्याला वेळ नाही' हे वरवर खरं असलं, तरी तो वेळ न व्हायचं कारण विचार नको, विचार सुचत नाही, असलं काही नाही, तर 'विचार सतत करीत असल्यामुळं वेळ नाही' हे आहे, हे तसं मोठं विस्मयकारक आहे.

बरं, तेही खरं आहे, असं गृहीत धरलं की, आपण सततच कुठल्या ना कुठल्या विचारात असल्यामुळं आपल्याला असा 'थोडा विचार' करायला सवड नाही - तरी तिथंच हा विषय संपण्यासारखा नाही. कारण नुसतेच विचार करीत राहाण्यानं भलं होत असतं, तर ते आपणा सर्वांचं केव्हाच व्हायला पाहिजे होतं ! ते तर होताना दिसत नाही. उलट या साऱ्या 'विचारांती'ही आपण मेटाकुटीला येतो आहोत, थकतो आहोत. अनेकदा एक काम करताना दुसऱ्या कामाचे विचार त्रासदायक ठरतात, ते आल्यानं हातातल्या कामात लक्ष लागत नाही, तणाव निर्माण होतात, नुकसान होतं आणि हे कळूनही हे विचार थांबवता येत नाहीत.

असा विचारांचा उपद्रव असेल तर काही विचारच करू नये म्हटलं, तर ते शक्य नाही, योग्यही नाही. कारण 'विचारशक्ती' ही तर माणसाची त्याला पशूपासून वेगळं करणारी एक विधायक आणि उपयोगी शक्ती आहे. शिवाय आज काय, काल काय जे जग आहे, त्यात सर्वत्र विचारांचंच साम्राज्य आहे - ते उद्याही राहाणारच आहे.

म्हणजेच या साऱ्याबद्दल 'थोडा विचार' करण्याचीच खरी गरज आहे. शालांत परीक्षेत फार मोठ्या यशाची सर्वांची अपेक्षा असताना साधा पासही होऊ न शकलेला विद्यार्थी त्या क्षणी काही एक 'विचार'च करतो, भले तो चुकीचा असू द्यात आणि स्वत:चा दुर्दैवी अंत करतो - त्या क्षणी त्याच्या मनातला निराशेचा विचार एका गंभीर कृतीला कारणीभूत ठरतो.

याचबरोबर परिस्थितीत सुधारणा करण्याचे खूप प्रयत्न करताना अपयश-मृत्यू-अडचणी असे अनेक आघात होताना - एखाद्या क्षणी सर्वांत मोठं अपयश, आघात होऊनसुद्धा त्या क्षणीही एखादा माणूस आशावादी, विधायक

विचार करतो, त्यानुसार कृतीही घडते, परिस्थितीची दिशाच पालटते, काही काळातच तो यशाच्या शिखराकडं झेपावतो - ही सारी किमया या विचाराचीच ना ?

म्हणून नकळतपणे आयुष्यभर अविरत विचार करीत राहाणं आणि विचार करणंच सोडून देणं - हे दोनही मार्ग टोकाचे नि नुकसानीचे आहेत, हे तर उघडच आहे. उलट ज्या मोठ्या 'विचारांच्या विश्वाला' आपण टाळू शकत नाही, जे आपल्याला आयुष्यात मोठं उपयोगी पडू शकतं, श्री समर्थांनी म्हटल्याप्रमाणं 'येक विचार शोधून पाही, म्हणिजे कळे' अशा त्या 'विचारांच्या विशाल जगा'ची ओळख करून घ्यावी हे नक्की हिताचं ठरेल, नाही का ?

******

२. एक विशाल जग

प्रत्येक माणसाबरोबर वावरणारं 'विचारांचं जग' खरोखरच किती विशाल असतं, याची कल्पना आपल्याला सहजपणे येणं कठीण आहे. एखादा अगदी शाळकरी मुलगा घ्या. त्याचं विश्व किती मर्यादित असतं ! पण त्यात विचारांचा केवढा वावर असतो. घरातल्या मोठ्या माणसांना हवे असतील असे विचार तो मुलगा भले न करू द्यात, पण तो त्याला महत्त्वाच्या वाटणाऱ्या विषयांच्या विचारातच सतत असतो.

एक 'शाळा' हा विषय घेतला तर रोज तिथं वेळेत जाणं, न गेल्यास आपल्याला कोणत्या शिक्षेला सामोरं जावं लागेल, ती कशी काय चुकवता येईल, आजचे तास कोणते, त्याला लागणारी पुस्तकं-वह्या अशी सामग्री कोणती, त्यात पुन्हा गृहपाठवाले तास कोणते, आज खेळायचा तास आहे किंवा नाही, त्यात ग्राऊंडवर सोडतील का वर्गातच बसवून गोष्टी सांगतील, की कुणाचा राहिलेला अभ्यासक्रम संपवायला तोच तास वापरतील, ग्राऊंडवर खेळायला सोडलंच तर, आपलंआपलं खेळू दिल्यास, काय खेळावं, त्यात कुणाला कुणाला घ्यावं, कुणाला वगळावं, त्यावरून भांडणं झाल्यास काय करावं, परतताना घरच्यांनी वाटेत करायला सांगितलेलं काम या साऱ्या धावपळीत कसं लक्षात ठेवावं, ते नेमकं विसरलंच तर काय होईल, त्या वेळी आपण काय करावं - अशा एक ना दोन नाना प्रकारच्या विचारांनी त्या शाळकरी मुलाचं विश्व नुसतं व्यापलेलं असतं.

दिवस उलटला तरीही त्याच्या या विचारांच्या 'विशाल विश्वा'त काही तपशिलांचा फरक पडेल, पण त्याचा 'विशाल'पणा कायमच असतो.अर्थात यावर मोठ्यांचा विश्वास बसणं कठीण असतं. एखाद्या कार्यव्यग्र किंवा प्रौढ वयाच्या माणसाला विचारलं तर, तो स्वतः सतत विचारांत व्यग्र असल्याचं आणि त्याचं म्हणून एक विचारांचं विशाल विश्व असल्याचं सहजपणे मान्य करील. पण त्याला जर तसंच ते विचारांचं विशाल विश्व एखाद्या सामान्य शाळकरी मुलांचंही असतं, असं म्हटलं, तर तो ते सहजी मान्य करणार नाही.

त्याची पहिली प्रतिक्रिया राहील की, एवढ्याशा पोराला कसले आले आहेत विचार आणि कसलं आलं आहे 'विश्व'! पण हे खरं नाही. विचारांच्या विषयात, करण्याच्या पद्धतीत, परिस्थितीतल्या ताणतणावात, गुंतागुंतीत फरक असेल, पण ज्याच्या त्याच्या पातळीवर ज्याचं त्याचं हे 'विचारांचं जग' 'विशाल' असतंच, असं आपल्याला दिसून येईल. असं हे विचारांचं विशाल जग मोठ्या माणसाचं असो किंवा लहान मुलाचं असो, त्यात बरेच वेळा एक साम्य आढळेल आणि ते म्हणजे, त्यातले बरेचसे विचार हे त्या त्या विषयातल्या समोर आलेल्या काही प्रश्नांना, समस्यांना उत्तरं शोधण्यातून आलेले असतात.

परीक्षेत नापास होणारा मुलगा किंवा शाळेत रोज उशीरा पोचल्यानं रोज छडी खायला लागणारा मुलगा त्यासंबंधी जो विचार करतो, तो पास कसं व्हावं किंवा वेळेत शाळेत कसं पोचावं किंवा उशीरा पोचल्यामुळं मिळणारी छडी कशी टाळता येईल, या दिशेनं विचार करीत असतो. त्यामुळं या विशिष्ट प्रश्नाचं उत्तर शोधून काढण्याच्या निमित्तानं तो बरेच पर्याय पाहातो, इतरांचे अनुभव विचारात घेतो, त्याच्या कुवतीनुसार त्याला चोखाळता येण्यासारख्या पर्यायी मार्गांचा विचार करतो, एखादा पर्याय आढळल्यास त्यानुसार एखादा दिवस किंवा एखाद्या विषयातल्या परीक्षेच्या पेपरबद्दल प्रयोग करून पाहातो - हे सारे त्याचे विचार हे परिस्थितीनं त्याच्यासमोर टाकलेल्या प्रश्नाचं उत्तर शोधण्याच्या स्वरूपाचे असतात.

एखाद्या प्रौढ माणसाच्या 'विचारविश्वा'त आपण डोकावलो तर असंच काहीसं आढळून येईल. त्याचा तसा जम बसलेला धंदा असतो. आजवर विशेष कधी नसलेला, पण अलीकडंच जाणवू लागलेला कामगारांच्या कुरबुरीचा विषय वाढलेला असतो किंवा, बाकी सारं सर्वसाधारणपणे ठीक असतानाही अलीकडं उत्पादनाचं प्रमाण प्रतिदिनी घटत चालल्यानं त्याच्या उलाढालीवर व नफ्यावर होणारा परिणाम त्याला चांगलाच जाणवू लागलेला असतो. त्यामुळं त्यातली कुठलीही समस्या असली, तरी त्याच्या डोक्यातलं विचारचक्र ती अखंड फिरवीत राहाते.

कामगारांतल्या कुरबुरीची कारणं तो जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. ही नव्यानं निर्माण झाली आहेत का, आजवर तशीच परिस्थिती असेल तर ती पूर्वी का निर्माण झाली नाहीत, यात कुणी हेतुपुरःसर काम करतं आहे का, त्याचं उद्दिष्ट

कामगारांचं हित हे आहे की, काही व्यक्तिगत लाभाची त्याला अपेक्षा आहे, अशा उपद्रवी व्यक्तीला भीक घालणं कितपत योग्य ठरेल,आपल्या होत असलेल्या नुकसानीच्या मानानं यावरच्या तोडग्याचा खर्च कितपत परवडण्यासारखा आहे, उत्पादनातल्या घटीचा या कामगारांच्या असंतोषाशी काही संबंध आहे का, तसा तो जोडणं कितपत योग्य होईल, असंतोषावरच्या उपाययोजनेनं तो असंतोष दूर होण्याबरोबरच उत्पादनवाढ नक्की साधेल काय-अशा एक ना दोन अनेक दृष्टींनी त्या माणसाचं विचारविश्व व्यापलेलं असतं, असं दिसून येईल.

त्यातही स्वतः हा सारा विचार करण्याबरोबरच तो त्याच्या समव्यावसायिकांचे अनुभव जाणून घेईल, या विषयातल्या एखाद्या तज्ज्ञाचा सल्ला विचारात घेईल, एखादा सुचलेला मार्ग अंमलात आणून, त्याचा प्रयोग करून पाहील - एकूण तसं पाहाता एखाद्या शाळकरी मुलाचं आणि त्याचं 'विचारां'चं जग वरवर पाहाता वेगळं दिसलं, तरी त्यात आपापल्या पातळीवर पडलेल्या प्रश्नांना उत्तर शोधून काढण्याचं एक समान सूत्र असल्याचं आपल्याला आढळेल. त्यातूनच आणखीही एक गोष्ट आपल्या लक्षात येईल की, एखादा प्रश्न पडणं, त्याच्या उत्तरासाठी धडपड करणं, उत्तरं गवसणं, प्रश्न नाहीसा होणं या साऱ्या प्रक्रियेत प्रत्येक ठिकाणी 'विचार'हा आहेच.

प्रश्न पडतो, तो आपण समजून घेतो, सोडवण्यासाठी प्रयत्न करतो - अशा साऱ्या टप्प्यांमध्ये आपल्याला 'विचारा'चं बोट धरूनच जावं लागतं. 'विचार' म्हणजे फक्त उत्तर शोधताना उपयोगी असतो असं नसून, तो त्यातल्या प्रत्येक टप्प्यातच उपयोगी असतो. याचाच दुसरा अर्थ असा नाही का की, जर यातल्या कुठल्याही ठिकाणी विचार कमी पडला, चुकला, न झाला तर खचितच आपलं नुकसान होईल. म्हणूनच प्रश्न समजून घेतानासुद्धा पुरेसा विचार करावाच लागतो. तो नुसताच उत्तर शोधताना करून चालत नाही.

एकूण आपल्या 'विचारविश्वा'चा परिचय घडवून घ्यायला गेलं तर विचारांचा बराचसा वावर हा आपल्याआपल्या आयुष्यातल्या विविध प्रकारच्या प्रश्नांनी उत्तरं शोधण्याच्या प्रयत्नात केलेल्या विचारासंबंधी आहे, हे आपल्या लक्षात येतं.

******

३. ओळखीची गरज

गेल्या प्रकरणातल्या 'विचारविश्वा'च्या परिचयातून एक लक्षात येतं की, आपल्या आयुष्यातले बरेचसे विचार हे विविध विषयांत, वेगवेगळ्या वेळी आपल्याला पडणारे प्रश्न सोडवण्यासाठी सुरू असतात. असं जर आहे तर एक प्रश्न ओघानंच येतो की, हे जर आधीच सुरू असेल तर मग त्यावर वेगळा विचार करायची गरज आहे का ?

म्हणजे आपल्याला सर्वांना हरघडी सारखे प्रश्न पडत असतात नि विचार करकरून आपण ते सोडवीत असतो. हे जर असं बिनबोभाट आणि आपोआप चालत असेल तर या 'विचारविश्वा'च्या अभ्यासानं म्हणा, परिचयानं म्हणा वेगळं काय साध्य होणार ? प्रश्न तर आत्ताही सुटताहेत !

तसं पाहिलं, तर वरवर हा प्रश्न अगदी बरोबर व बिनतोड वाटतो खरा, पण तो खरा नाही अशासाठी की, प्रत्येकजण जरी आपापल्या परीनं प्रश्नाला उत्तर शोधीत असला आणि विचारांच्या वापरानं त्याला ते मिळत असलं तरी त्याचा अर्थ असा नव्हे की, सर्व प्रश्न समाधानकारकपणे नि योग्य प्रकारे नि सर्वांकडूनच सुटत असतात. अनेकदा अनेक माणसं चुकीच्या, अपुऱ्या विचारामुळं त्यांच्यापरीनं जरी प्रश्न सोडवून मोकळी झाल्यासारखी दिसली तरी वस्तुस्थिती तशी नसते. उलट 'विचाराच्या विश्वा'चा थोडाही परिचय करून न घेतल्यानं चुकीचा, अपुरा विचार करून अशा माणसांनी शोधलेल्या उत्तरांमुळे परिस्थितीतून, प्रश्नांतून मार्ग न निघता उलट प्रश्नांची गुंतागुंत आणखीनच वाढल्याचं आपल्याला आढळतं.

उदाहरणार्थ, एखाद्या माणसाला धंद्यात जोरदार अपयश येतं, तो खचतो, 'आत्महत्ये'चा मार्ग खूप विचार करकरून काढतो, त्यानुसार त्याच्या प्रश्नाला मिळालेलं ते उत्तर तो अंमलात आणतो. अशा वेळी त्याच्या त्या उत्तरानं प्रश्न सुटलेला असतो की आणखी वाढलेला असतो, हे आपण सहज सांगू शकू.

गेल्या प्रकरणात आपण पाहिलं तशी कामगारांच्या प्रश्नानं निर्माण झालेली

परिस्थिती आहे, कामगारांत असंतोष आहे - त्यावर त्या मालकानं विचार केला, असंतोष कुणामुळं पसरला ते शोधून काढलं, तो मूळ कामगार त्याला कळला. त्याच्या परीनं त्यानं विचार केला की, या कामगाराला बाजूला केलं की हे सारं सुधारेल. म्हणून त्यानं त्या कामगारनेत्याला कामावरून कमी केल्याची नोटीस दिली आणि आपण प्रश्न सोडवल्याच्या विचारात झोपी गेला.

दुसरे दिवशी पाहतो, तर मागचा कामगारांचा असंतोष बरा म्हणायची पाळी आली. कारण त्या वेळी असंतोष असला तरी कामगार कामावर हजर होते. पण या उपायानंतर दुसरे दिवशी सारे काम बंद करून रस्त्यावर ठिय्या देऊन बसले होते, असं त्याला आढळून आलं.

अशा वेळी आपल्या लक्षात येईल, प्रत्येक माणसाला विचार करता येतो किंवा विचार करून प्रश्न सोडवता येतात असं वाटतं खरं, पण हे प्रकरण वाटतं इतकं सोपं नाही. कुठलाही प्रश्न सोडवताना होणारी 'विचारशक्ती'ची मदत मोलाची असली, तरी त्या शक्तीची जर खरोखरीच व बिनचूक मदत व्हायला हवी असेल, तर या 'विचारविश्वा'च्या जरा खोलात जावं लागेल. कारण नुसता विचार करणं वेगळं आणि अचूक, आवश्यक विचार करणं वेगळं!

या बाबतीत एका मनोरंजक कोड्याचा प्रयोग आपण पाहू. विद्यार्थ्यांच्या एका गटाला प्रश्न सोडवायला दिला गेला. तो असा की,'२१, १२७ व ३ लिटरची तीन भांडी आहेत. १०० लिटर पाणी मोजण्यासाठी ती कशी वापरता येतील ?' मुलांनी विचार करकरून प्रश्नसोडवला आणि असा क्रम सांगितला की, प्रथम १२७ लिटरचं भांडं भरायचं, त्यातून २१ लिटरच्या भांड्यानं पाणी काढायचं आणि मग ३ लिटरच्या भांड्यानं दोनदा पाणी काढायचं म्हणजे बरोबर १०० लिटर पाणी शिल्लक राहिलं. हे उत्तर अर्थातच बरोबर आहे. पुढं अशाच पद्धतीचे ५, ६ प्रश्न त्यांना सोडवायला दिले गेले. तेही त्यांनी त्याच पद्धतीनं आणि अर्थातच हळूहळू अधिक लवकर सोडवले.

त्यानंतर एक प्रश्न देण्यात आला. '२३, ४० व ३ लिटरची भांडी दिली आहेत. ती वापरून आता आपल्याला वीस लिटर पाणी बाजूला काढायचं आहे, ते कसं काढता येईल ?' मुलांनी लगेच पुढीलप्रमाणं उत्तर सांगितलं,'प्रथम ४० लिटरचं भांडं भरायचं,त्यातून २३ लिटर पाणी बाहेर काढायचं,

मग तीन लिटर पाणी त्यात ओतायचं.' उत्तर तर बरोबरच आहे. पण हाच प्रश्न ज्यांनी आधी वरचे प्रश्न सोडवले नव्हते, अशा विद्यार्थ्यांच्या नव्या गटाला देताच, त्यांनी त्याचं उत्तर दिलं,'प्रथम २३ लिटरचं भांडं भरायचं आणि त्यातून ३ लिटरच्या भांड्यानं पाणी काढून घ्यायचं. म्हणजे २० लिटर पाणी राहील.' हे उत्तर अर्थातच अत्यंत सोपं, सरळ व कमी त्रासाचं आहे, हे उघडच आहे.

इतकंच नाही, तर पुढं असा प्रश्न देण्यात आला की,'तुम्हाला ६४, ३ व २९ लिटरची तीन भांडी देण्यात आली व तुम्हाला ३ लिटर पाणी बाजूला काढायचं आहे, तर कसं काढाल ?' त्याचं उत्तर देताना पाच-सात प्रश्न सोडवलेल्या विद्यार्थ्यांच्या पहिल्या गटानं सांगितलं,'प्रथम ६४ लिटरचं भांडं भरायचं, त्यातून २९ लिटरचं भांडं दोन वेळा, तर ३ लिटरचं भांडं एकदा काढल्यानंतर बरोबर ३ लिटर पाणी शिल्लक राहील !' हेच प्रथमच प्रश्न सोडवणाऱ्या दुसऱ्या गटानं 'सरळ ३ लिटरचं भांडं भरून घ्यावं' इतकं साधं, सुटसुटीत उत्तर देऊन प्रश्न तत्काळ सोडवला.

हा सगळा प्रयोग सांगण्याचं एक कारण आहे, ते असं की, पहिला गटही विचार करूनच प्रश्न सोडवीत होता, त्याला तसे प्रश्न सोडवण्याचा अनुभव, सरावही जास्त होता. दुसरा गटही विचार करूनच प्रश्न सोडवीत होता. मग उलट पहिल्या गटाची उत्तरं सुटसुटीत व बरोबर यायला हवी, ती अशी बरोबर असूनही किचकट पद्धतीची, लांबलचक, विनाकारण गोंधळाची आणि या साऱ्या अर्थानं चुकीची का यावी ? याचं कारण प्रश्न सोडवताना होणारी वैचारिक हालचाल एकदा सरावानं खोल गेली की, तिचा एक साचा तयार होतो आणि पुढचे प्रश्न सोडवताना नकळत विचारप्रक्रिया त्याच साच्यातून पुढं सरकते, जे अनेकदा अनावश्यक असतं, चुकीचं ठरतं. हे मानसशास्त्रीय सत्य वैचारिक विश्वाचा अभ्यास केला, त्याची माहिती घेतली तरच गवसेल ना ?

पहिल्या उदाहरणात विचारपूर्वक काढलेला त्या कामगारनेत्याला नोकरीतून काढण्याचा मार्ग यशस्वी का ठरत नाही, याचंही असंच काही कारण असलं पाहिजे, नाही का ?

******

४. विचारशलाकेचं सामर्थ्य

विचारांच्या विश्वाशी पहिला परिचय झाल्या झाल्या एक दोन महत्त्वाच्या गोष्टी आपल्या लक्षात आल्या असतील.

१. प्रत्येक माणसाचं एक स्वतंत्र विचारविश्व आहे. तसंच प्रत्येकाला विचारशक्ती आहे.

२. या विचारविश्वाच्या साहाय्यानंच माणसाचा व्यवहार आयुष्यभर सुरू असतो. फक्त बहुतांशी ही हालचाल नकळत सुरू असते. काहीच माणसं या विचारविश्वाचा ठाव घेण्याचा, त्याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करतात. या अभ्यासाचंही एक शास्त्र आहे. ज्यात मानसशास्त्राचा संबंध आहे, तत्त्वज्ञानाचा आहे, तर्काचा आहे - अनेक क्षेत्रांचा आहे.

३. एक नक्की आहे की, जितका 'विचारविश्वा'चा परिचय होईल, अभ्यास होईल तितके परिस्थितीला तोंड देण्याचे, परिस्थितीतून - अडचणीतून कोणतंही नुकसान न होता किंवा निदान कमीत कमी हानी होऊन बाहेर पडण्याचे पर्याय माणसाला उपलब्ध होतात.

४. बाह्य परिस्थिती दिवसेंदिवस अधिकाधिक गुंतागुंतीची होत चालल्यानं त्यातून बाहेर पडण्यासाठी वैचारिक तयारी-कुवतही दिवसेंदिवस मोठी लागणार आहे. म्हणून या 'विचारविश्वा'च्या परिचयाची नि अभ्यासाची गरज कदाचित कालच्यापेक्षाही आज व आजच्यापेक्षाही उद्या अधिक लागेल.

५. आपल्याला विविध विषयांवर विचार करण्याची, विचार गोळा करण्याची, साठवण्याची कल्पना आहे. मग तो नागरिकशास्त्राचा विचार असो, वा अर्थशास्त्राचा विचार असो. पण आपल्याला कशाविषयी तरी विचार करण्यापूर्वी आधी विचारच मुळात कसा घडतो, कसा करावा, कसा केला जातो - हे सारं जाणण्याची आत्यंतिक गरज नाही का ?

तो बरोबर होत असेल, तर मग एखाद्या विषयाबद्दलच्या विचारांचा प्रश्न ! आणि तोच जर बरोबर होत नसेल तर मग एखाद्या विषयाबद्दलच्या विचारांचा प्रश्न गौण वाटेल, पुढचा ठरेल व तो नंतर खचितच मार्गीही लागेल.

माणसाची विचारशक्ती जर खरोखरच प्रगल्भ बनेल, ती चाकोरीतून - तसाच वेळी चाकोरीचा त्याग करून, वेळी प्रतिभेचा, सर्जनशीलतेचा वापर करून विचार करायचं ठरवील, तर कितीही अडचणीच्या नि अंध:कारमय वाटणाऱ्या परिस्थितीतूनही कसा अचूक मार्ग काढू शकेल, हे पाहिलं तर आपण थक्क होऊ !

एडवर्ड बोनोच्या पुस्तकातल्या अशा विलक्षण सर्जक विचारशील मुलीची ही हकिकत खरोखर लक्षणीय वाटते. दुष्टांतल्या दुष्ट माणसाशी नि विचित्रांतल्या विचित्र परिस्थितीशीसुद्धा शौर्यानंच नव्हे तर, यशस्वीपणे, चातुर्यानं मार्ग काढण्याची क्षमता असलेला हा 'सामर्थ्यवान विचार' काय करू शकतो, हे पाहून आनंदानं थक्क व्हायला होतं.

लंडनमधल्या एका व्यापाऱ्याची, त्याच्या मुलीची नि सावकाराची ही गोष्ट आहे. त्या काळी जर एखाद्याचं कर्ज एखाद्यानं बुडवलं तर, अशा कर्जबुडव्याला तत्काळ तुरुंगात टाकता येत असे. या व्यापाऱ्यानं त्याच्या धंद्यासाठी या लोभी, धूर्त अशा सावकाराकडून कर्ज काढलं होतं. वेळोवेळी अडीनडीनं हे कर्ज वाढतच गेलं. शेवटी तो डोंगर या व्यापाऱ्याच्या हाताबाहेर गेला. सावकार अशा संधीची वाटच पाहात होता.

त्याचा अंत:स्थ हेतू वेगळाच होता. पैशाची त्याला कमी नव्हती, पण त्याची नजर या व्यापाऱ्याच्या मुलीकडं लागलेली होती. अशी सुस्वरूप मुलगी आपल्याला पत्नी म्हणून मिळावी, अशी त्याची फार दिवसांची इच्छा होती. याचं प्रौढ वय, याचा धूर्त, लोभी स्वभाव पाहाता, अशी लहान कोवळी पोर व्यापारी त्याला द्यायला तयार होणं, ही गोष्ट एरवी अशक्य होती. पण सावकाराला त्याचा मतलबी, स्वार्थी विचार गप्प बसू देणार नव्हता. त्यात आता अशी संधी चालून आलेली.

सावकारानं व्यापाऱ्याची, त्याच्या कन्येसमक्ष घरीच गाठ घेतली आणि थेट आपला मनोदय कानावर घातला. त्यानं मुलीचं लग्न त्याच्याशी लावून दिल्यास व्यापाऱ्याचं सारं कर्ज माफ करण्याचं वचन द्यायलाही तो विसरला नाही. त्याचबरोबर, हा प्रस्ताव व्यापाऱ्यानं ठोकरल्यास त्या वेळच्या कायद्यानुसार, व्यापाऱ्याला तत्काळ गजाआड करण्याची तयारी करूनच तो आला

असल्याचंही बजावायला सावकार विसरला नाही.

हा प्रस्ताव ऐकताच तो व्यापारी व त्याची कन्या स्तंभितच झाले. असलं काही हा म्हणेल, हे त्यांच्या स्वप्नातही नव्हतं. आपल्या बंगल्याबाहेरच्या वाळूतून अस्वस्थपणे येरझाऱ्या घालूनही व्यापाऱ्याला त्यातून कोणतीही तोड सुचत नव्हती. कन्याही दिङ्मूढ झाली होती. पण तिला त्या धर्मसंकटाची आता कल्पना आली होती. यांच्याकडून कोणताच प्रतिसाद येत नाही हे पाहून, सावकारानं मानभावीपणानं एक शेवटचा डाव टाकला.

तो म्हणाला,'हे बघ, तुला हे अवघड वाटत असेल तर आपण ते सरळ दैवावर सोपवू. मी तुला तीन पर्याय देतो. निकाल मुलगी करेल. या वाळूतला एक पांढरा आणि एक काळा शिंपला मी या पिशवीत टाकतो. तुझीच मुलगी कुठलाही एक शिंपला उचलेल. तिनं काळा उचलला, तर तिचं लग्न माझ्याशी करून द्यायचं, मी सारं कर्ज माफ करेन. तिनं पांढरा उचलला, तर मात्र तिचं लग्न माझ्याशी करण्याची आवश्यकता नाही आणि तरीही मी तुझं सारं कर्ज माफ करेन. दैवाचीच तशी इच्छा म्हणायची. ते मला मंजूर राहील. मात्र तिनं कुठलाच शिंपला उचलायला नकार दिला तर मात्र, मी तुझ्या कर्जापोटी तुला लगेच तुरुंगात टाकीन आणि तिला उपाशी मरावं लागेल, आहे मंजूर ?'

यात जरा तरी आशेचा किरण होता, शिवाय पर्याय नव्हताच. मुलगी अत्यंत सावध, पण प्रगल्भ विचाराची होती. मंजूर म्हटल्याबरोबर धूर्त सावकारानं खाली वाकून दोन शिंपले उचलून पिशवीत टाकताना, ते दोनही काळेच उचलण्याची केलेली शिताफी तिच्या क्षणार्धात लक्षात आली होती.

पण तिच्यासमोर सध्याचे तीनही पर्याय तिला आता तर पूर्ण अडचणीचे झाले होते. तिच्या विचारशक्तीची कसोटी होती. तिचा पर्याय कुणालाच उघडं न पाडता, तिला नि तिच्या वडिलांना वाचवणारा व त्याच वेळी धूर्त सावकाराला न बोलता अद्दल घडवणारा, असा हवा होता. तिनं पिशवी हातात घेतली. शिंपला मुठीत धरून बाहेर काढला, काढताना अडखळल्याचं दर्शविलं आणि खाली वाळूत घरंगळू दिला. खाली सारे शिंपलेच शिंपले होते.

ती सर्वांची क्षमा मागत म्हणाली, 'मी उचललेला शिंपला दुर्दैवानं पडला खरा, पण या पिशवीत राहिलेल्या शिंपल्यावरून मी उचललेला शिंपला कोणता होता, हे सहज ठरवता येईल.' असं म्हणून तिनं पिशवी सावकारासमोर धरली. आत अर्थातच काळा शिंपला असल्यानं, तिनं उचललेला व पडलेला पांढरा होता, असं म्हणण्याव्यतिरिक्त पर्याय नव्हता !

या मुलीच्या गोष्टीवरून लक्षात येईल की, इतक्या अडचणीच्या क्षणीही आपल्या आयुष्यातला अंधार पुसून टाकून तिथं प्रकाश पसरवण्याचं सामर्थ्य या विचारात आहे.

या अशा 'विचारविश्वा'चा नि 'विचारशक्ती'चा परिचय आपण पुढल्या प्रकरणातून टप्प्याटप्प्यानं नि विस्तारानं करून घेऊ या.

******

५. शक्ती आणि शस्त्र

आपण हे पाहिलंच की, प्रत्येक माणसाजवळ अशी विचार करण्याची शक्ती आहे. तो ती रोज वापरीत असतो. भले विचार पुरा असो-अपुरा असो, हिताचा असो-अहिताचा असो, थोडा असो-अति असो. आपण या साऱ्यावर, पूर्वी विचार केलेला असो किंवा नसो, या 'विचारशक्ती'चा परिचय मात्र आपल्याला नक्की असतो, ते कसं ते मात्र मोठं गंमतशीर आहे.

त्यातही मौज ही की, नुसताच आपणाला त्या शक्तीचा परिचय नाही, तर त्याच शक्तीचा वापर वेळी 'शस्त्रा'सारखा करण्यातसुद्धा आपण मागंपुढं पाहात नाही. कळत, नकळत या शक्तीचं 'शस्त्र' करून आपण व्यवहारात कशा गमतीजमती - वेळी जीवघेण्यासुद्धा - करीत असतो, ते पाहिलं तर, आश्चर्य वाटेल.

अगदी लहान मुलाचं पाहा. त्याला खेळायला जायचं असतं. आपल्या मतानं त्याचा अभ्यास व्हायचा असतो, त्यामुळं त्यानं आत्ता तिकडं जाऊ नये असं असतं. पण तशी सक्ती करण्याऐवजी आपण त्यालाच सांगतो, तू ठरव, तूच विचार कर. अशा वेळी 'बराच विचार करून' तो ठरवतो की 'आत्ता तरी' खेळायला जाणंच योग्य होईल.

त्यासाठी तो खूप कारणंही देऊ शकतो - खेळ आत्ता दिवसाउजेडीच शक्य आहे, मित्रमंडळी पुन्हा रात्री जमणार नाहीत, अभ्यास काय, रात्रीसुद्धा भरून काढता येईल - एक ना दोन. अशा वेळी आपल्या लक्षात येईल, त्यानं आता विचारशक्तीचा वापर 'संरक्षक शस्त्रा'सारखा केला आहे.

मध्यम वयाचा एखादा मुलगा जेव्हा कुठल्या शाखेला जावं, कुठली साईड घ्यावी, याचा विचार करीत असतो, त्या वेळी अनेकदा त्याच्या मनातला निर्णय झालेला असतो. फक्त बहुतेक वेळा जसं घडतं, तसा त्याचा हाही निर्णय मोठ्यांच्या मताच्या विरुद्ध असतो. त्यांच्या मतानं, त्यानं 'अ'साईडकडं जावं असं असतं आणि तो मात्र 'ब'साईडकडं जाण्याच्या निर्णयाला आलेला असतो - अर्थातच मनानं - आतून. बराच खल-चर्चा घरात घडते. अखेर निर्णय काय तो

त्यानं घ्यावा असं ठरतं.

'अ'ची ॲडमिशनची तारीख आधी येते, 'ब'ची नंतरची असते. मुलगा विचार करीत राहातो. 'अ'ची तारीख टळेपर्यंत किंवा तसं वाटू नये म्हणून ती तारीख उजाडता उजाडता किंवा मग त्या शेवटच्या दिवशी आपण अमक्याचं एकदा मत घेण्याचा एक 'नवीन विचार' तो मांडतो. अर्थात हे 'अमकेतमके' त्याच्या 'सोयीचे'च असतात.

एक तर, मुद्दाम वेळ घालवून ती 'तारीख' टळवतील किंवा त्याच्या सुरात सूर मिसळतील - असा काहीसा हा 'नवा विचार' असतो. तर काही वेळा 'अ'ची तारीख टळेपर्यंत मुलाचा विचार सुरू राहातो आणि मग एका सुंदर सकाळी मुलगा घरच्यांना सांगतो, मला 'अ' वा 'ब' किंवा वेळी 'क' कुठलीही साईड चालेल ! आता विचार ही नुसतीच 'शक्ती' उरलेली नाही, तर तिचं 'शस्त्र'ही कसं झालं आहे, हे आपल्या लक्षात येतं.

तीच गोष्ट मुलाच्या लग्नाच्या वेळी मुलगी निवडताना घडताना आपण पाहिली असेल. त्याच्या मनात असलेल्या मुलीचं प्रपोजल दाखल होण्यात काही कारणानं वेळ होत असेल तर, 'रीतीप्रमाणं' 'थोरामोठ्यांच्या सल्ल्यानुसार' तो दहा मुली 'पाहात राहातो'. त्यांच्यावर 'विचार करीत राहातो'. अर्थात तो म्हणतो आणि इतरांनाही ते पटतं की,'या बाबतीत गडबडीनं निर्णय घेऊन चालणार नाही. खूप विचार करून ठरवावं लागेल.'

त्यामुळं तो 'खूप विचार' करीत राहातो. इतरांशी वेगवेगळ्या मुद्यांवर चर्चा करतो. इकडं अपेक्षित मुलीचा प्रस्ताव आईवडिलांना सादर होतो आणि त्याचा हा 'लांबलेला, साधकबाधक, शहाण्यासारखा, खूप विचार' एकदम संपतो आणि त्या 'अपेक्षित, पण इतरांना अनपेक्षित' प्रस्तावाच्या बाजूनं तो पूर्ण विचारांती 'ताबडतोब' निर्णय घेतो. आता विचाराची शक्ती एका वेगळ्या शस्त्राचं रूप धारण करून आपल्या साऱ्याच माणसांच्या आयुष्यात कशी वावरत असते, ते आपल्याला जाणवेल.

साऱ्यांच्या आयुष्यात असं म्हटलं ते एवढ्यासाठीच की, कुठं ना कुठंतरी आपला या 'विचारांच्या शस्त्रा'शी परिचय, सामना घडतोच. आपण स्वत:ही ते जाणीवपूर्वक, नकळत कसंही वापरतो किंवा इतरजण ते वापरतात

आणि त्याला आपल्याला सामोरं जावंच लागतं. त्याचे परिणाम, त्याचा संपर्क करावाच लागतो.

वर सांगितलेल्या त्या गोष्टी लहान-मोठ्या मुलांशीच निगडित आहेत, असं थोडंच आहे, त्या तितक्याच लहान-मोठ्या मुलींशी निगडित आहेत, मोठ्या माणसांशी - स्त्री असो, पुरुष असो - निगडित आहेत. यात सुशिक्षित-अशिक्षितपणाचाही फार संबंध आहे, असं नाही. सुशिक्षित माणूस कदाचित अधिक सफाईदारपणे ते शस्त्र वापरील, अडाणी माणूस कदाचित थोड्या धसमुसळेपणानं तेच शस्त्र हाताळील. हे थोडा विचार केला तर आपल्या लक्षात येईल.

अर्थात अशी 'शक्ती' शस्त्र म्हणून वापरणं नेहमी नुकसानीचं असतं का ? तर तसंच असतं असं नाही, असं म्हणता येईल. 'अशुभस्य कालहरणं' अशा पद्धतीनं एखादा युद्धाचा विध्वंसक विचार किंवा घरातली एखादी अप्रिय घटना हीसुद्धा असं 'शस्त्र' वापरून टाळता येऊ शकेल. तसं घडल्याचंही आपण पाहातो. फक्त संकुचित स्वार्थासाठी, हीन उद्दिष्टासाठी हे 'शस्त्र' आपण वापरीत नाही ना, हे पाहिलं तरी खूप झालं.

मग हेच 'शस्त्र' चांगल्या कामी आपण वापरू शकलो तर उत्तमच!

******

६. सक्तीचा मामला

एखाद्या बागेच्या कोपऱ्यातल्या बाकावर, शांतपणे बसून राहिलेला एखादा माणूस, नदीकाठावर संध्याकाळच्या शांत वेळी पाण्यातली प्रतिबिंब पाहात बसलेला एखादा माणूस, वेगानं, पण एका गतीनं चाललेल्या रेल्वेच्या एखाद्या खिडकीत बसून शांतपणे सतत बदलत असणारं बाहेरचं दृश्य पाहाणारा एखादा प्रवासी, हे सारे कसे हेवा वाटावा इतक्या शांतपणे बसल्यासारखे दिसतात. बाहेरून पाहिलं तर खरंच त्यांची कुठली कृती, कुठली हालचाल सुरू नसते. ते अगदी 'रिलॅक्स्ड' वाटतात, 'निवांत' वाटतात.

पण अनेकदा घडतं ते असं की, अशा तऱ्हेनं एक तास दोन तास घालवल्यावर अशी माणसं एकदम एखाद्या क्षणी उठतात, ताडकन चालू लागतात, क्षणभर एकदम उद्‌गारतात,'ठरलं, अमुक एक गोष्ट करायचीच' किंवा 'नाही, ते आपल्याला शक्य नाही !'

सिनेमात तर आपण असं दृश्य अनेकदा पाहिलं असेल की, अशा वरवर एकदम संथ, शांत वाटणाऱ्या माणसाचा काही काळानंतर सारा नूरच क्षणात जणू पालटतो आणि तो आत्तापर्यंतच्या त्याच्या शांत बसण्याला लाजवील इतक्या वेगानं त्याच्या समोरच्या कामाला लागतो.

म्हणून असं आढळेल की, वरवर पाहाता अशा तऱ्हेनं माणूस अनेकदा निष्क्रिय, वेळी शांत, वेळी विश्रांती घेत असलेला असा काहीसा दिसत असला, तरी आत तो क्वचितच तसा निष्क्रिय, शांत असतो. त्याची शारीरिक हालचाल जरी बाहेर दिसत नसली तरी, एका वेगळ्या पातळीवर - अंतर्यामी त्याची एक मोठी हालचाल कायम सुरूच असते. ती म्हणजे, ही वैचारिक हालचाल होय.

म्हणून अनेकदा असं घडतं की, शत्रूची सतत टेहळणी करणाऱ्या राजाला शत्रूच्या गोटातल्या हालचाली एकदम थंडावलेल्या दिसतात, सगळे सैनिक शिबिरात गोळा झालेले दिसतात, शस्त्रास्त्रांच्या हालचाली कुठं दिसत नाहीत - असं सारं चित्र बघून हा राजाही स्वत: विसावतो आणि प्रत्यक्षात मात्र ते टेहळणीतलं दृश्य हे

फक्त बाह्य दृश्यच उरतं.

दुसऱ्या क्षणी, एका नव्या आक्रमक विचारानं, नव्या जोमानं, नव्या निर्णयानं सारे सैनिक मोहोळ उठावं, तसे झपाझप बाहेर पडतात, अत्यंत वेगानं हालचाली होतात आणि या बाह्य दृश्यावर अवलंबून विसावलेल्या राजावर बेसावध गाठून हल्ला होतो.

माणसांच्याही बाबतीत - बाह्यतः कुठली कृती न करणारा तो निष्क्रिय माणूस एकदम कुठलातरी नोकरीचा, नव्या व्यावसायिक धाडसाचा, कुणाला आत्यंतिक विरोध करण्याचा, लग्न-घरदार-जमीनजुमला - अशा बाबतीतला कुठलातरी निर्णय घेऊन अंमलबजावणी सुरू करतो. याचं कारण, बाह्यतः माणूस सारं थांबवू शकला तरी, तो एकच गोष्ट पूर्णपणे थांबवू शकत नाही. (अर्थात याचे सन्मान्य अपवाद सोडून देऊ) आणि ती म्हणजे 'विचार'!

विचार ही त्याच्या मागं लागलेली अशी काही चीज, असा काही उद्योग आहे की, तो करणं एक वेळ त्याच्या हातात आहे, पण न करणं मात्र त्याच्या हातात नाही. आपण आपला अनुभव पाहा ना !

एखादी गोष्ट आपल्या मनाविरुद्ध घडते. मुलगा घरादाराचा व्यवहार करतो, एखादी वस्तू घेतो, कर्जबाजार करतो - तशी तोशीस आपल्याला त्यापासून असो वा नसो - आपल्याला तो व्यवहार पसंत नसतो. आपण ठरवतो की जाऊ दे, त्याच्या जबाबदारीवर तो करतो आहे ना, करू दे. आपण त्याचा 'विचार' करायचा नाही. पण आपल्याला जगातल्या नव्व्याण्णव गोष्टी अशा वेळी जमतील, पण ही 'विचार न करण्याची' एक गोष्ट काही जमत नाही. रस्त्यानं जाताना जसं ठरवलं की, उजवीकडं अजिबात बघायचं नाही, तर साऱ्या दिशा टाळता येतात, पण उजवीकडंच लक्ष जातं आणि ते टाळता येत नाही. तसाच काहीसा हा प्रकार आहे.

पण हे एवढ्यावर मर्यादित नाही बरं का ! एखाद्या विषयावर आपण विचार करायचा नाही किंवा करायचा आहे, याबद्दल जसं आपल्या हातात नाही, तसंच मुळातच आपण विचार करायचा की नाही, हेही आपल्या हातात नाही. विषय कुठलाही असो, आपण त्यावर विचारच करायचा नाही म्हटलं, तर तेही आपल्याला शक्य नाही, असं आपल्या लक्षात येईल.

किंबहुना अधिक विचार केला तर आपल्या हे लक्षात येईल की, 'आता आपण विचार करणं थांबवावं किंवा मी कुठलाही, कोणाचाही विचार करायचा नाही असं ठरवलं आहे' हेसुद्धा सारे पुन्हा एक 'विचारच' आहेत. या साऱ्या अर्थानं पाहिलं तर एकंदरीत माणसाच्या बाबतीत 'विचार' ही एक प्रकारची 'सक्ती'च आहे. कळत-नकळत, मनापासून-मनाविरुद्ध त्याला 'विचार' हा करावाच लागतो. फक्त त्याला आणखी एक बाजूही आहे.

जसं एका माणसाची गोष्ट सांगतात की, त्याला मरायचं होतं - त्याचे जे हुकमी उपाय आहेत ते सारे त्यानं करून पाहिले. पण काय कुणास ठाऊक कुठलाच यशस्वी झाला नाही. 'मृत्यू अटळ आहे', प्रत्येक जन्मलेल्याला 'मृत्यूची सक्ती' आहे, एवढंच त्याला आजवर ठाऊक होतं, पण प्रत्येक जन्मलेल्याला मृत्यूपर्यंत जगण्याचीही सक्ती आहे, हेही आता त्याला ठाऊक झालं. एकदा जगायचंय म्हटल्यावर मात्र आता 'कसं जगावं' ही सक्ती आपल्यावर नाही. उलट एका चांगल्या अर्थानं 'कसंही जगण्याची संधी' आपल्याला आहे, हे त्याला कळलं.

तीच अवस्था या 'विचारांच्या सक्ती'ची आहे. ती 'सक्ती' बरोबरच 'संधी'ही कशी आहे, ते आपण पुढल्या भागात पाहू या.

******

७. सक्ती की संधी ?

साधारण माणूस हा बऱ्याचशा गोष्टी आपल्यावर अवलंबून आहेत, आपल्या हातात आहेत, अशा (गोड) समजुतीत असतो. एरवी त्याची ही समजूत खरी की खोटी ते तो फारसं तपासतही नाही. फक्त काही वेळा खूप प्रयत्न करून व अगदी सहज वाटणारं काम असूनही झालं नाही, तर त्याच्या मनात विचार चमकून जातो.

त्याहीपेक्षा अकाली घडणारे, अपघाती मृत्यू पाहिले की, मात्र सामान्य माणसाचा त्याच्या स्वत:च्या कर्तृत्वावरचा नि काही वेळा गृहीत धरलेल्या स्वत:च्या शे-शंभर वर्षांच्या अस्तित्वावरचा विश्वास डळमळतो. मृत्यूची अगदी आतुरतेनं वाट पाहाणाऱ्या, किंबहुना, सर्वांचा निरोप अनेकदा घेऊन झालेल्या तरीही परत धुगधुगी वाढून पुन्हा चौकात काठी टेकीत फिरू लागलेल्या माणसांकडं बघितल्यावरही त्याचा विश्वास असाच पुन्हा डळमळतो.

तीच गोष्ट कधी काहींच्या आयुष्यात मोठमोठ्या उलथापालथींमुळंही घडते. एखाद्याला केवळ तो विशिष्ट तारखेच्या आधी किंवा कुणापेक्षा आधी जन्माला आला म्हणून एखादी आयुष्याची दिशा बदलून टाकणारी संधी मिळते किंवा गमवावी लागते.

तेव्हा ही जन्माची बाबही त्याचा स्वत:वरचा, स्वत:च्या कर्तुम्अकर्तुम्पणावरचा विश्वास डळमळवते. एकूण दोन्ही अनुभव घेणाऱ्या माणसाच्या हे लक्षात येतं की, कसं, कुठं, केव्हा, कुणाच्या पोटी जन्माला यावं हे जसं हाती नाही, तसंच कसं, कुठं, केव्हा, कुणाच्या दारी मरावं हेही आपल्या हाती नाही. जसा जन्म एकप्रकारे सक्तीचा, तसा मृत्यूही एकप्रकारे सक्तीचाच आहे.

तीच बाब काही प्रमाणात विचार करण्याबाबत माणसाच्या बाबतीत आहे, नाही का ? एखाद्या गोष्टीचा विचार सुरू करावा म्हटलं, तर हाती नसतं किंवा एखाद्या गोष्टीचा विचार डोक्यात अगदी थांबवून टाकावा म्हटलं, तर तेही हाती नसतं. इच्छा नसताना एखाद्या गोष्टीचे विचार सुरू होतात, इच्छा

नसताना बंदही होतात. याउलट घडतानाही आपण पाहातो. एकूण विचाराचा मामला कसा सक्तीचा वाटतो, हे आपण पाहातो.

पण असं आयुष्याच्या बाबतीत आहे, तसं ते विचारांच्या बाबतीतही आहे. आयुष्य सुरू करणं नि ते संपवणं याबाबतीत सारा सक्तीचा मामला दिसला, तरी याचा अर्थ सारं आयुष्य म्हणजे माणसावरची सक्ती आहे, असं मात्र समजायचं काही कारण नाही.

भले सुरुवात अन् शेवट सक्तीचा असू द्या, पण मधलं आयुष्य कसं घालवावं, हा मात्र मानवी स्वातंत्र्याचा विषय आहे. इतकंच नव्हे तर, त्या स्वातंत्र्याचा उपयोग करून अक्षरशः हजारो प्रकारे तेच आयुष्य, पण भिन्नभिन्नपणे कोट्यवधी माणसं जगताना आपण पाहात नाही का ?

आयुष्याचा एवढा मोठा साठ-सत्तर वर्षांचा पट हाती घेऊन त्याचं सोनंसोनं करून टाकलेली किती महानुभाव माणसं आपल्याला सांगता येतील की, ज्यांनी या आयुष्य जगण्याचं माणसाला मिळालेलं स्वातंत्र्य, नव्हे दुर्लभ संधीच जणू सार्थकी लावली, आपलीआपली निवडलेली कार्यक्षेत्रं उजळून टाकली - मग ते संगीत असो, चित्रकला असो, समाजकारण असो, साहित्यक्षेत्र असो !

त्याचबरोबर हेही आढळणं शक्य आहे की, याच स्वातंत्र्याचा दुरुपयोग करून काहींनी आपल्या आयुष्याची राखरांगोळी केली आहे, इतकंच नव्हे तर, आपल्याबरोबर आपल्या घरादाराची, त्यातल्या जवळच्या माणसांची, साऱ्यांची वाताहात लावली आहे. कसं जगावं हे भले त्यांना कळलं नसेल, पण ते कसं जगावं हे आपल्या हातात आहे, याचा पुरावाच हे सारे देत आहेत, हे मात्र खरं.

तीच गोष्ट या विचाराबद्दल आहे, असं आपल्या लक्षात येईल. भले विचाराची सुरुवात नि शेवट आपल्या हातात नसू द्या नि तो भलेही सक्तीचा मामला असू द्यात, पण एकदा का विचार करणं सुरू आहे, हे गृहीत धरलं की, मग मात्र कसा विचार करावा, कुणाचा करावा - अशा अनेक गोष्टी मात्र आपल्या हातात आहेत, हे आपल्या लक्षात येईल. जणू सतत टेप ऐकण्याची एखाद्यावर सक्ती असावी, पण कॅसेट कोणती, केवढ्यांदा, किती ऐकावी हे

सारं त्याच्यावर सोपवलेलं असावं, तसं हे आहे.

पण विचार करण्याची आपल्यावर जशी सक्ती आहे, ती तशी कशाचा विचार करावा, कुणाचा विचार करावा ही पण सक्ती आहे, असं आपण उगीचच गृहीत धरतो. तसं तर ते नाहीच, उलट आपल्याला विचार सुरू करणं-बंद करणं भले 'सक्तीचं' असलं तरी, बाकी बाबतीत आपण 'स्वतंत्र' आहोत. इतकंच नव्हे तर, विचाराला निश्चित, विधायक, वेगळी दिशा देऊन आपल्या आयुष्याचं सार्थक करण्याची 'संधी' आपल्याला आहे.

अनेक महानुभावांनी ती तशी वापरली आहे, त्या 'संधी'चा पुरेपूर फायदा घेऊन त्यांनी ज्ञानाच्या क्षेत्रात मोलाची भर घातली आहे, समाजव्यवस्थेत मोठमोठे बदल घडवले आहेत, राजकारणात फार मोठ्या उलाढाली घडवल्या आहेत, यशाची एव्हरेस्ट सर केली आहेत.

पण या साऱ्यांनी एक गोष्ट केली आहे, ती म्हणजे विचारांची 'सक्ती' तर ओळखलीच, पण कशाचा, काय, किती व कसा विचार करायचा या बाबतीतली 'संधी'ही ओळखली.

माणूस म्हटल्यावर तो विचार करणारच, हे त्यांनाही माहीत होतं, फक्त माणूस म्हटल्यावर तो 'स्वत:च्या सुखाचा विचार करणारच' ही सक्ती त्यांना वाटली नाही. 'माणूस म्हटल्यावर इतरांच्या सुखाचा, एखाद्या समाजहिताच्या प्रश्नाचा, देशाच्या पारतंत्र्याचा' कशाचाही विचार करू शकणार - यांतलं स्वातंत्र्य नि संधी त्यांनी ओळखली. विचारांचे विषय बदलले, सातत्य टिकवलं, सतत पुढंच जात राहिले, त्यामुळं असे लोक अजरामर झाले.

म्हणून विचारांबद्दलची 'सक्ती' जशी समजून घ्यायला हवी तशी त्यातली - 'स्वातंत्र्य नि संधी'सुद्धा !

******

८. सावधतेची गरज

आपल्याला त्या भिकाऱ्याची गोष्ट माहीत असेल. आयुष्यभर जवळचा एक कटोरा लोकांपुढं पसरून, येणाऱ्या जाणाऱ्यापुढं गयावया करून, याचना करून तो एकदोन पैसे मागून घेई. तो एका मोडक्या लाकडी पेटीवर बसत असे. त्याचे फाटकेतुटके कपडे, उन्हापावसाला डोक्यावर धरण्यासाठी प्लॅस्टिकचे फाटके कागद, रुमाल, वाडगा, जुनापुराणा अंगरखा असल्या वस्तू त्या मोडक्या पेटीत असत. मिळत त्या चार आठ आण्यांत दिवसभरापुरते चहा भजी - कधी पोटभर, कधी अर्ध्या पोटापुरते -मिळत, त्यावर गुजराण होई.

एक दिवशी तो गेला. साहजिकच त्याच्याबरोबर त्याच्या त्या मोडक्या पेटीचीही उचलबांगडी झाली. पण तिला तळाशी वाळवी लागून, ती वाळवी जमिनीत पसरली असल्यानं जागा स्वच्छ करण्यासाठी त्याच्या त्या बसण्याच्या जागेखालच्या जमिनीचाही उद्धार झाला. थोडीफार खुदाई झाली. माती सारखी करण्यात आली.

त्या वेळी कुदळीला खणकन आवाज आला म्हणून जरा जास्त खोदण्यात आलं. तेव्हा त्याच जागेखाली सोन्याच्या मोहरांचा जुना हंडा सापडला. ज्या जागेवर बसून माणसानं पोटाची चिंता करण्यात नि भीक मागून कशीबशी गुजराण करण्यात आयुष्य घालवलं, त्याला त्याच्या त्या भीक मागणाऱ्या दीन हातांपासून नि चिंताग्रस्त चित्तापासून केवळ काही फुटांच्या अंतरावरच्या, अपार धनाची कुठलीच कल्पना नव्हती ! कारणं अनेक असतील - कल्पना नव्हती, प्रयत्न नव्हते, दिशा नव्हती, सावधानता नव्हती, आपल्या मालकीच्याच एवढ्या साठ्याची कुठली जाणीव त्याला आयुष्यभर नव्हती - एक ना दोन !

एखादी संधी जरी चालून आली, आपल्याला उपलब्ध असली, तरी तिचा फायदा घेण्यासाठीसुद्धा अशा अनेक गोष्टींची गरज असते. ती एक मोठी 'विकासाची संधी' आहे, हीच कल्पना आधी अनेकदा आपल्याला येत नाही. या 'विकासाच्या संधी'चा फायदा होण्यापूर्वी ज्या वर सांगितलेल्या अनेक

गोष्टींची गरज आहे, त्यांतली सर्वांत पहिली नि महत्त्वाची गोष्ट 'सावधानता'ही आहे, कशी नि का ते आपण पाहू या.

एका शहरात फुलांना मोठी मागणी असे. शेजारच्या खेडोपाड्यातून अगदी पडेल तो भाव देऊन फुलं गोळा करून आणली जात. एका खेड्यात एका माणसाची अशीच फुलांची मोठी बाग होती. त्याला आजूबाजूच्यांकडून या मागणीबद्दल नि फुलांच्या व्यापारातल्या फायद्याबद्दल कळल्यावर त्यानं या संधीचा फायदा घ्यायचं ठरवलं.

त्यानं ठरवलं की, सकाळी उठल्यावर प्रथम सगळ्या बागेत हिंडून भरपूर फुलं रोज गोळा करायची नि त्या गावी येऊन फुलं घेऊन जाणाऱ्या ठेकेदाराला ती पुरवायची. हे ठरलं खरं, पण होई असं की, सकाळी तो जागा झाल्यावर बागेत जाई तोवर बरीचशी ताजी फुलं खुडलेली असत. फारच थोडी फुलं त्याच्या हाती उरत. सरळ होतं की, कुणीतरी तो उठण्यापूर्वी हा कारभार करीत होतं. त्यानं थोडंफार लक्ष ठेवायचा, दारं लावायचा, कुंपण ठाकठीक करायचा प्रयत्न केला, पण ही चोरी काही नियंत्रणात येईना. अखेर त्यानं ठरवलं की, आपण रात्रभर सावध राहायचं, जागं राहायचं नि बागेवर पूर्ण लक्ष ठेवूनच बसायचं. ही मात्रा मात्र लागू पडली.

रात्रभर बागेत पूर्ण प्रकाश नि मालक रात्रभर सावध, कोणत्याही प्रकाराला वावच राहिला नाही. सकाळी झुंजूमुंजू झालं, तेव्हा थोड्या तारवटलेल्या डोळ्यांनी त्यानं साऱ्या बागेत चक्कर टाकली. सर्व झाडांवर, वेलींवर फुललेली त्याची पुष्पसंपत्ती जशीच्या तशी होती. त्या दिवशी फुलांच्या व्यापारातल्या फायद्याच्या संधीचा पहिला दिवस उगवला होता. त्याला तसे जागरणाचे, सावध राहाण्याचे थोडेफार कष्ट सोसावे लागले होते, हे खरंच. पण या सावधतेनं त्याच्या बाबतीत फायद्याचा श्रीगणेशाही केला होता.

हीच गोष्ट थोडीफार विचारशक्तीच्या संदर्भात खरी आहे. ती एक संधी आहे. तिचा फायदा करून घेता येणं प्रत्येकालाच शक्यही आहे. पण आजची अवस्था ही, सर्व फुलं सकाळी गायब असणाऱ्या फुलांच्या शेतीवाल्यासारखी आहे. फुलं खूपच येत होती, पण फायदा शून्य, फायदा काही पुढंही दृष्टिपथात नाही. तसे विचार खूप येतात, खूप जातात, शक्ती

खूप, वापरही खूप, पण विचारशक्तीचा फायदा पाहावा तर मात्र पदरी जवळजवळ काहीच नाही.

याचं कारण असं की, विचारांच्या या अमर्याद, सामर्थ्यवान, विशाल विश्वाबद्दल सावधता म्हणावी, तर जवळजवळ नाही. म्हणून या एवढ्या प्रभावी शक्तीपासून फायदा म्हणावा, तर जवळपास नाही. उलट डोक्याला फुकट शीण आहे. डोकं पिकलं तरी विचारांचा भुंगा काही थांबत नाही. असला तोटा मात्र अनेकदा अनुभवायला येतो आहे.

भगवान बुद्धांची एक गोष्ट प्रसिद्ध आहे. एकाशी ते बराच वेळ बोलत होते. त्याला काही समजावून देत होते. बुद्धांच्या मनात एक गोष्ट वारंवार येत होती. अखेर त्यांनी त्या समोर बसलेल्या माणसाला विचारलं, 'तू माझ्याबरोबर इतका वेळ संभाषण करतो आहेस, ऐकतो आहेस, त्या वेळी तू तुझा पाय का हलवतो आहेस ?'

तेव्हा तो माणूस एकदम चकित होऊन उद्‌गारला, 'छे, असं काही मी करीत नव्हतो. मी तुमच्याशी बोलतो आहे', असं म्हणून त्यानं स्वत:च्या पायाकडं पाहिलं. तेव्हा त्याच्या लक्षात आलं की, त्याचा पाय अजूनही हालतच होता. तेव्हा तो खजीलही झाला नि सावधही झाला. त्याच्या जगण्याला आता एक साधी, पण नवी दिशा लाभली - सावधतेची. तिच्यामुळं आपली अनाठायी जाणारी शक्ती नि त्यामुळं मूळ कामाला कमी पडणारी एकाग्रता यांचा बोध त्याला झाला. एक सावधानता आली आणि तिनं अनेक दारं उघडली.

आपल्या विचारांच्या सततच्या हालचालीबद्दल, व्यापाराबद्दल सावधानता आपल्याला आली तर ?

******

९. काही वैशिष्ट्यं

विचारांच्या विशाल विश्वाबद्दल जर आपल्याला सावधानता आली, तर अनेक गोष्टी लक्षात येऊ शकतील, असं आपण पाहिलं. एखादं मोठं निसर्गचित्र आपल्यासमोर भिंतीवर लावलेलं असलं आणि आपण बराच वेळ तिथं बसलेले असलो, पण आपलं त्याकडं लक्ष नसलं तर काय घडेल, तसा काहीसा हा प्रकार आहे.

पण काही कारणानं, आपली तंद्री भंग पावून म्हणा किंवा आपण सावध होऊन म्हणा, जर का आपलं लक्ष त्या भिंतीवरच्या निसर्गचित्राकडं एकदम गेलं, तर ती साधी सावधानता, ते साधं लक्ष आपल्या एकेक गोष्ट सहज लक्षात आणून देतं. मग त्या चित्रातल्या दृश्यातले तपशील कळतील, रंग, रेखीवपणा, तपशिलातली मार्मिकता, चित्रकाराच्या हातची सफाई, कौशल्य अनेक गोष्टी लक्षात येतील. तसंच काहीसं एक सावधता आली तर या 'विचारविश्वा'बद्दल होईल.

आपणच आपल्या या विचारांबद्दल सावध राहून पाहिलं की, आपल्या लक्षात अक्षरशः अनेक गोष्टी, विचारांची अनेक वैशिष्ट्यं येतात. सर्वांत पहिलं जर काही लक्षात येईल तर विचारांची अखंड चाललेली हालचाल. मुंबईतल्या दादरसारख्या एखाद्या भागातल्या रस्त्यावर किंवा रेल्वे स्टेशनवरच्या फलाटावर अविरतपणे माणसं जशी अतिशय लगबगीनं नुसती पळताना दिसतात, आपल्याला त्या माणसांची काही ओळखसुद्धा पटत नाही, ती नीट दिसूही शकत नाहीत, जरा दिसतात तोवर ती गर्दीत हरवून जातात - तसली अवस्था आत आपल्या विचारांच्या विश्वात असलेली दिसेल. इतक्या प्रकारचे विचार आत अखंडपणे येत नि जात असतात, की आश्चर्य वाटावं.

याच विचारविश्वाचं आणखी एक वैशिष्ट्य आपल्या सहज लक्षात येईल. त्या फलाटावरच्या गर्दीतली माणसं खूप वेगानं जेव्हा पळतात नि नाहीशी होताना दिसतात, तसेच अनेक विचार अक्षरशः वेगानं इकडून तिकडं जाताना दिसतात. त्या वेळी प्रथमदर्शनी नुसताच गोंधळ माजलेला आत दिसतो.

पण गर्दीतली माणसं जशी अस्ताव्यस्तपणे कशीही, कुठंही, दिशाहीनपणे पळताहेत असं वाटलं तरीसुद्धा, जर त्यातला एखादा प्रवासी आपण गाठला नि त्याला विचारलं किंवा आपणच त्याचा मागोवा घेऊन तपासलं तर नक्कीच असं आढळतं की, तो प्रवासी निश्चित अशा कुठल्यातरी ठिकाणाहून तिथं आलेला असतो आणि त्याच्यात्याच्या डोक्यातल्या कामानुसार एका कुठल्यातरी ठिकाणी तो चाललेला असतो.

तसे हे गोंधळाचे, नाना तऱ्हेचे, दिशाहीनपणे भरकटताहेत असे वाटणारे विचार, थोडं खोलात जाऊन पाहिलं तर, या प्रवाशांसारखे असतात. ते कुठूनतरी आलेले असतात नि आपल्याआपल्या परीनं ते कुठंतरी जायच्या प्रयत्नांत असतात. अर्थात, स्वतंत्र मन, बुद्धी, क्षमता, दिशा असलेला एखादा प्रवासी जितका निश्चितपणे निघतो-जातो-पोचतो, तितकं त्या विचारांना जमणं अत्यंत कठीण आहे. पण या गोंधळाच्या वाटणाऱ्या विचारांनाही काही उगम असतो आणि काही लक्ष्यही असतं. तिकडून ते येतात आणि अशा काही दिशेकडं ते जात असतात.

आणखी एक वैशिष्ट्यही आपल्या लक्षात येईल की, अनेकदा विचारांची काही साखळीही आपल्याला अनुभवायला येते. म्हणजे असं की, एखाद्या विशिष्ट विषयाबद्दल, विशिष्ट माणसाबद्दल, घटनेबद्दल आपले विचार सुरू होतात, त्याला धरून काही काळ ते सुरू राहातात. पुन्हा काही कारणानं तो विषय खंडित होतो. दुसरा विषय पुढं येतो. पुन्हा साखळी सुरू होते. काही काळ चालते. पुन्हा तुटते. पुन्हा तिसरा विषय सुरू होतो.

असे विचार कुठल्या विषयावरून कुठल्या विषयाकडं जातात, याविषयी आपण सावधपणे पाहिलं तर असं लक्षात येईल की, तसं वरवर पाहाता क्षणात एक विषय तर क्षणात दुसरा, तिसऱ्या क्षणी तिसरा असं चाललेलं दिसतं खरं, पण तसं घडण्याला काही तात्कालिक कारणं असतात.

समोर दिसणाऱ्या चित्राबद्दल विचार करणाऱ्या माणसाच्या कानावर जर समजा, एखाद्या जुन्या हिंदी सिनेमातल्या गाण्याची ओळ आली तर तत्क्षणी त्या चित्राचा विचार थांबून त्या गाण्याशी संबंधित विचार त्याच्या मनात सुरू होतात. मग त्या सिनेमातलं त्या गाण्याच्या वेळचं दृश्य त्याला आठवेल,जिथं त्यानं

तो सिनेमा पाहिला ते थिएटर आठवेल इ. पण हा विचार तिथंच तुटून पेपरवाला, तो आणतो तो पेपर, त्यातले विषय अशा दिशेनं हीच विचारांची साखळी पळायला लागते.

यातूनच आणखीही एक महत्त्वाचं वैशिष्ट्य आपल्या लक्षात येईल की, आपल्या विचारांना थोडीफार दिशा, संदर्भ असला तरी ते सारे अल्पजीवी आहेत. अनेकदा त्यांना सर्वच दृष्टीनं अपूर्णत्वानं ग्रासलेलं आहे. ना तो विचार स्वत:च्या परीनं पूर्ण विकसित होत, ना तो विचार एखादा विषय पूर्णत्वाला नेत.

यांसारखी आणखी काही महत्त्वाची वैशिष्ट्यं आणि त्यांचा आपल्या आयुष्यावर होणारा परिणाम आपण पुढल्या काही भागात पाहू या.

******

१०. टिकाऊ विचार

विचारांची काही वैशिष्ट्यं पाहाताना गेल्या भागात आपण एका वैशिष्ट्याचा उल्लेख केला की, आपले विचार साधारणपणे 'अल्पजीवी' असतात. विचारांना हे 'अल्पजीवी'पण, 'योग्यजीवी'पण किंवा 'दीर्घजीवी'पण कसं येतं आणि त्याचा आपल्यावर, आपल्या कुटुंबियांच्या, आजूबाजूच्या समाजाच्या आयुष्यावर कसा कसा परिणाम घडत असतो, ते आपण अधिक तपशिलात पाहू.

एखाद्या माणसाच्या मनात घर बांधण्याचा विचार येतो. तो का येतो याची अनेक कारणं असतात, याची आपल्याला कल्पना असते. त्याला राहायला - स्वत:ची, हक्काची, आवश्यक त्या सुखसोयीची जागा हवी असते इत्यादी इत्यादी. मग त्याची त्या घर बांधण्याच्या किंवा घेण्याच्या दिशेनं हालचाल सुरू होते. तो अनेक संबंधित माणसांना भेटतो, त्यांच्या ओळखी काढतो, त्यांच्याकडून माहिती गोळा करतो, घर घेतलेल्या लोकांचे अनुभव - अडीअडचणी, धोक्याचे इशारे - सारं विचारतो, प्रत्यक्ष जागा -प्लॉटपासून, जुन्या पडीक - स्वस्तातल्या घरापर्यंत सारी पायपीट होते.

यात स्वाभाविकपणे रोज सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत त्याचा नोकरीधंद्याचा मुख्य वेळ सोडला तर, उरलेल्या साऱ्या वेळात त्याचा हा एकच उद्योग होऊन बसतो. इतकंच नाही, तर त्याच्या घरातली इतर मोठी माणसं, आईवडील किंवा विशेषत: पत्नी, मुलं यांच्या रोजच्या आयुष्यातही सकाळ-संध्याकाळ या 'घर प्रकरणाला' हळूहळू मोठं महत्त्व येऊन, त्यांचाही यातला सहभाग वाढत जातो.

अशा तऱ्हेनं, मूळ 'घर घेणं' हा विचार जितका दीर्घजीवी, टिकणारा ठरेल, तितका काळ त्या माणसाच्या व त्याच्या परिवाराच्या आयुष्याला व्यापून टाकू शकतो. किंबहुना, कशाही पद्धतीचं 'घर' असो - म्हणजे ते छोटं-मोठं, स्वस्त-महाग कसंही असो - ते घेण्यासाठी जितका काळ तो विचार मनात टिकून राहणं आवश्यक असतं, तितका काळ तो जर टिकून राहिला, तर त्या माणसाच्या आयुष्यात 'घर' ही गोष्ट पूर्ण होते, तडीला जाते.

म्हणजे आपल्या लक्षात येईल की, विचार आवश्यक तेवढा 'दीर्घजीवी' असेल, तर तो उपयोगी ठरतो, नव्हे गरजेचाच असतो. पण काहीकाही माणसांच्या बाबतीत किंवा काहीकाही विषयांच्या बाबतीत विचारांच्या या टिकण्याचं जे प्रमाण आहे, ते आवश्यकतेपेक्षा कमी वा जास्ती असतं. त्याचेही कसेकसे परिणाम होत असतात, ते पाहाणं उद्‌बोधक ठरेल.

समजा, आपल्या घरापासून एक फर्लांग अंतरावरच्या एका दुकानात जाऊन आपल्याला एका वस्तूची चौकशी करून यायची आहे. म्हणून आपण घरातून निघालो आणि अर्धा फर्लांग चालून परतलो. अर्ध्या फर्लांगावर गेल्यावर ती वस्तूची चौकशी करण्याचा आपला विचार थांबला, बदलला, विसरला आणि जर आपण त्या अर्ध्या फर्लांगावरून परतून घरी आलो, तर त्यावेळी ते मूळ काम घडत नाही. उलट, आपले अर्धा फर्लांग जाण्यायेण्याचे श्रम नि वेळ मात्र वाया जातात.

पण तीच अवस्था काहींची वेगळ्या बाबतीत होते. ते हाच विचार घेऊन बाहेर पडतात, एक फर्लांग जातात, दुकानात चौकशी करतात. वास्तविक, काम संपलेलं असतं, तरीही डोक्यातला 'विचार' गेलेला नसतो. त्यामुळं आणखी पुढंपुढं गेलो तर कदाचित आणखी चार दुकानं लागतील, आणखी चार ठिकाणी विचारू, अशा विचारानं ते दोन, तीन, चार फर्लांग जातच राहतात. घरी येण्याचं परतीचं अंतर विनाकारण वाढत असतं, श्रम, वेळ वाढत असतो. पण विचार योग्य त्या ठिकाणी न थांबल्यानं किंवा तो आवश्यकतेपेक्षा जास्त काळ जगल्यानं आता हा सारा 'अपव्यय' सुरू राहातो आणि विसाव्या मिनिटाला ते काम पुरं करू शकणारा माणूस तास झाला, तरी ते काम पुरं करू शकत नाही.

आपल्याला क्षणभर असं वाटेल की, असं कुठं आपण करतो ? पण ही प्रक्रिया साधारणत: सगळीकडं सुरू असते. फक्त स्वरूप, प्रसंग, स्थिती, विषय अनेक गोष्टी वेगळ्या वेगळ्या रूपात असतात. नियमानं व्यायाम करण्याचं ठरवणारा माणूस कधी तो अर्ध्या तासाच्या 'खऱ्या' आवश्यकतेपेक्षा अगदी कमी पाचच मिनिटं करताना दिसतो, तर कधीकधी तो त्याच व्यायामाचं आकर्षण लागून गरजेपेक्षा जास्तीच वेळ त्याला देताना दिसतो. नवा विवाहित

माणूस किंवा कधी प्रपंचाची अतिआवड लागलेला जुना विवाहित माणूससुद्धा घरात द्यायच्या आवश्यक वेळेपेक्षा कधीकधी घरात अगदीच कमी थांबतो आणि प्रश्न निर्माण होतात, तर घरात कधीकधी अतिच थांबतो आणि घरातलं स्वास्थ्य बिघडावं, इतके प्रश्न निर्माण होतात.

यात प्रश्नांचं स्वरूप वेगवेगळं असलं, तरी जो संबंधित मूळ विचार असतो तो जगण्याचा, टिकून राहण्याचा जो योग्य-आवश्यक कालावधी असतो, तो त्या त्या विचारानं कधी 'कमी' तर कधी 'जास्त' केलेला असतो. त्याचा परिणाम हा अखेर माणसाचं स्वास्थ्य, त्याचं ध्येय या दृष्टीनं धोक्याचाच ठरतो.

आपण सुरुवातीला घर बांधणाऱ्या माणसाच्या बाबतीत जसं पाहिलं, तसं आवश्यक तो काळ, तो विचार जसा टिकून राहणं गरजेचं असतं, तसंच पुढं तो थांबणंही गरजेचंच असतं ! नाहीतर घर बांधून झालं, तरी त्यात अजूनही हे करता येईल, ते करता येईल किंवा असं घर झालं, आता त्यापेक्षा सोयीचं, आकाराचं तसं घर घेऊ, असे विचार 'घरघर' लागेपर्यंत करीत राहणारी माणसं आपल्याला भेटत नाहीत का ?

अशी माणसं या विचारांचं अल्पजीवित्व, योग्यजीवित्व आणि दीर्घजीवित्व वा अतिजीवित्व ओळखत नाहीत. परिणामी स्वतःचं, कुटुंबाचं स्वास्थ्य बिघडवून टाकतात, हा अनुभव घराच्या नसेल, पण प्रपंचाच्या, छंदाच्या, नोकरी-धंद्याच्या,आवडीनिवडीच्या-कुठल्या ना कुठल्या बाबतीत आपल्याला जरूर आला असेल, येईल.

अर्थात 'विचारां'च्या या जगण्याकडं थोडं सावधानतेनं पाहिलं तर, आपल्या आपल्या आयुष्यातील निरर्थकता, ताण, व्यग्रता थोडी तरी आपण कमी करू शकू, हे खचितच.

******

११. विचारांचे प्रकार

गेल्या भागात आपण पाहिलं त्याप्रमाणं, एखादा विचार आपल्या मनात किती काळ टिकू शकतो - भले कमी, योग्य, जास्ती - असा किती काळ टिकतो, यावर आपल्या आयुष्यात घडणाऱ्या गोष्टींची दिशा व त्यांच्यामुळं आपल्यावर होणारे सुखदुःखाचे परिणाम अवलंबून असतात. हे विचाराचं सातत्य जसं परिणाम घडवतं, तसं विचारांचं आणखीही एक वैशिष्ट्य आपल्याआपल्या आयुष्यात सुखदुःख आणीत असतं आणि ते म्हणजे 'पूर्ण विचार !'

बाहेरच्या कोणत्याही उद्दीपकानं सुरू होणारा विचार दुसऱ्या अशाच एखाद्या वेगळ्या उद्दीपकानं किंवा घटनेनं थांबावा, म्हणजे - बस दिसल्यावर बसचा, ती समोरून निघून गेल्यावर एकदम सिनेमाच्या जाहिराती दिसल्यावर सिनेमाचा - असा कुठल्या ना कुठल्या उद्दीपकानं सुरू होणारा विचार बदलावा, थांबावा इथपर्यंत ठीक आहे. पण आपण जेव्हा ठरवून एखाद्या गोष्टीवर विचार करीत असतो किंवा त्या विचारांच्या साहाय्यानं काही दिशा आपल्याला पकडायची असते, तेव्हा मात्र असे उद्दीपक येणं, जाणं किंवा विचार स्थिर न होणं किंवा पूर्ण न होणं जर घडलं, तर ते हानीचं ठरेल.

आत्तापर्यंत आपण जो 'विचारांचा विचार' करीत आहोत, त्यात विचारांचं शास्त्र किंवा शास्त्रीय विचार या दृष्टीनं आपण तांत्रिक भाग मुद्दामच टाळीत आलो आहोत. पण या व यापुढील काही भागात आपण त्याचा सर्वसामान्य व्यवहाराला उपयोगी व मदतीचा ठरेल इतपत भाग जाताजाता पाहाणार आहोत.

त्या दृष्टीनं आपलं वरचं उदाहरण पाहिलं, तर बस दिसल्यावर बसचा किंवा सिनेमाची जाहिरात दिसल्यावर सिनेमाचा, असे विचार सतत साखळीसारखे मनात येऊन आपल्याला व्यग्र ठेवीत असले आणि हे तसं थोडंसं शक्तीची हानी घडवणारं असलं, तरी ते विचार आणि आपण मुद्दाम ठरवून विचार करीत असताना येणारे विचार - त्यात निर्माण होणारी व्यग्रता, होणारे आयुष्यावरचे परिणाम, यांत मात्र फारच फरक आहे.

कसा ते पाहू. रस्त्यानं जाताना बस पाहिल्यावर अनेक प्रकारचे विचार मनात येतील. ते - काल पाहिलेल्या बसच्या अपघातापासून ते आपल्याला दुपारी याच बसनं ज्या ठिकाणी जायचं आहे तिथपर्यंत - कोणत्याही स्वरूपाचे असू शकतील. यामध्ये आपल्याला काही आठवण होऊन आपण हातातलं दुसरं कमी महत्त्वाचं काम सोडून तीच बस पकडण्याचा एखादा परिणाम वगळला, तर बाकीच्या बसच्या निमित्तानं आलेल्या विचारांचा तसा फारसा उपयोगही नसतो आणि आयुष्यावर परिणामही होत नाही.

पण याऐवजी दुसरं एक उदाहरण पाहू या. स्वामी विवेकानंद अमेरिकेत असताना एका दुकानात सफरचंद घ्यायला गेले, त्या फळवाल्यानं सांगितलेली किंमत त्यांनी दिली. सफरचंदं एका पाकिटात टाकली आणि ते पाकीट हातात घेऊन ते बाहेर पडले. एक मुलगा हा व्यवहार पाहत होता. तो धावतधावत त्यांच्यामागून आला आणि त्यांना थांबवून म्हणाला,'स्वामीजी, मला ही सफरचंदं विकत हवी आहेत, तुम्ही ती द्याल का ?' त्यांना क्षणभर काही कळेना. ते म्हणाले,'समोरच्या दुकानात अजूनही खूप आहेत, तिथं घे !' त्यावर तो अजीजीनं, पण आग्रहानं म्हणाला,'मला तीच हवी आहेत नि मी त्याची किंमत देतो ना !' तेव्हा त्यांनी उत्सुकतेनं विचारलं,'अरे, पण मला सफरचंदं हवीत म्हणून मी ती घेतलीत, तुला विकून मी काय करू?' त्यावर तो म्हणाला,'समोर ते दुसरं दुकान दिसतं ना, तिथून तुम्ही घ्या ना !'

तेव्हा मग स्वामीजींना राहवेना. त्यांनी स्पष्टच विचारलं,'मग तूच तिथून घे, तुला हीच सफरचंदं का हवीत, तीही विकत ?' त्यावर त्यानं सांगितलं,'स्वामीजी, खरं सांगायचं तर मला स्वत:ला सफरचंदांची फारशी गरज नाही आहे, पण तुम्ही जी सफरचंदं घेतली आहेत, ती खराब आहेत, त्या दुकानदारानं तुमची फसवणूक केली आहे. तुम्ही परदेशातून आलेले आहात, पुढं फळं खाताना तुमच्या लक्षात ही फसवणूक येईलच. पण जेव्हा तुम्ही तुमच्या देशात जाल, तेव्हा तुम्ही स्वत: तर या देशातल्या लोकांना फसवेगिरी करणारे मानालच, पण तुमच्या देशातल्या लोकांनाही तुम्ही सांगाल की, या देशातले लोक लफंगे, फसवेगिरी करणारे आहेत. माझ्या देशाची ही मानहानी एखाद्या फळवाल्याच्या चुकीपोटी मी सहन करू शकत नाही, मला त्याची किंमत

मोजावी लागली, त्रास सहन करावा लागला तरी चालेल !'

स्वामीजींच्या हातातली खराब फळं पाहिल्यानंतर त्या देशप्रेमी मुलाच्या मनात आलेले विचार आणि रस्त्यातून जाताना आपल्या मनात आलेले विचार यांमध्ये खूपच फरक आहे, असं आपल्या लक्षात येईल. आपल्या दहा विचारांपैकी नऊ विचारांनी विचार करण्यात होणाऱ्या शक्तीचा ऱ्हास वगळता, काहीच परिणाम आयुष्यावर घडवला नाही. पण ती सफरचंदं पाहाताच निर्माण झालेल्या विचारांनी मुलाच्याच नव्हे, तर स्वामीजींच्या मनातही अनेक विचार जागृत झाले. इतकंच नव्हे तर, मुलाला एका महत्त्वाच्या कृतीलाही प्रवृत्त केलं. त्यातून पुढं एक मोठा 'अर्थपूर्ण', 'टिकाऊ' विचारही आला - जो त्या मुलाच्या मनात आधीपासूनच एखाद्या मार्गदर्शक तत्त्वासारखा घुसून बसलेला होता, स्थिर झालेला होता.

अशा आणि यांसारख्या अनेक प्रकारच्या विचारांचं काही वर्गीकरण किंवा व्यवस्था असते का, तिचं आपल्या आयुष्यात स्थान कोणतं, उपयोग काय, याचा विचार आपण पुढल्या भागात करू या.

******

१२. विचारांचं वर्गीकरण

आपण व्यवहारात अगदी सहजपणे वर्गीकरण करीत असतो. तांत्रिकदृष्ट्या वर्गीकरण राहू द्यात, पण पिशवीभर वस्तू एखाद्या 'बझार'मधून आणल्या आणि घरात टेबलावर ओतल्या तर चटकन आणि सहजपणानं आपण त्यांतल्या साबणाच्या चारपाच वड्या एका बाजूला, पेस्टची छोटीछोटी खोकी एका बाजूला, चहा पावडरची पॅकिंग एका बाजूला - बाजार आणणारी गृहिणी इतक्या चटकन हे काम करीत असते की, ही एक 'प्रक्रिया' आहे, असा भावही त्यात नसतो. स्वाभाविकपणेच या वर्गीकरणामुळं वस्तू कमी जागेत, व्यवस्थितपणे ठेवणं, त्या आवश्यक तेव्हा लगेच सापडणं - हे सारं सुलभ होतं - हा आपला अनुभवच आहे.

तसं जरा लक्ष देऊन पाहिलं तर, आपली 'विचारांच्या विश्वा'बद्दलची स्थिती पिशवीतल्या असंख्य वस्तूंसारखी आहे खरी ! बाजारातून खूप प्रकारच्या, लहान-मोठ्या आकाराच्या, वजनाच्या, किमतीच्या वस्तू एकत्रितपणे आणून कोंबून ठेवाव्या, तशी अवस्था या विश्वात झाल्याचं आपल्याला अनेकदा आढळेल. बाजार आणलेल्या पिशवीत जशी एखादी वस्तू शोधायला गेलं, तर बरीच ढवळाढवळ करूनसुद्धा अनेकदा ती हाती लागत नाही, तशी आपली अवस्था होते. कारण त्यांची कुठलीच व्यवस्था लावण्याचा आपण जाणीवपूर्वक प्रयत्न केलेला नसतो.

वाचनालयात गेलो आणि तिथं जर टेबलावर पुस्तकांचा एक प्रचंड ढीग ठेवला असेल आणि आपल्याला खात्री दिली की, तुम्हाला हवं असलेलं पुस्तक यात आहे, फक्त जरा तुमचं तुम्ही बघून घ्या, तर ते एक विनाकारणच आव्हान होऊन बसेल. तेच 'व्यवस्था' असलेल्या एखाद्या वाचनालयात गेलो आणि विशिष्ट पुस्तक मागितलं, तर क्षणार्धात पुढील गोष्टी होतात. तिथं पुस्तकाच्या प्रकाराप्रमाणं सूची असते किंवा पुस्तकाच्या नावाप्रमाणं सूची असते. क्षणात त्याचा रॅकनंबर व पुस्तक क्रमांक कळतो. त्या विशिष्ट रॅकवर त्या नंबरला ते पुस्तक मिळतं.

अशी आणि इतकी व्यवस्था विचारांसारख्या न दिसणाऱ्या बाबतीत

अवघड असेल, पण व्यवस्था असण्याची गरज व शक्यता नक्कीच आहे. किंबहुना, ती असेल तर होणारे परिणाम आणि ती नसेल तर होणारे परिणाम आपल्याला आपल्या नेहमीच्या आयुष्यात दिसतच असतात.

खोलीची दारं लावून अभ्यासाला म्हणून बसलेल्या मुलांचे थोड्या वेळानं जेव्हा खेळण्याचे आवाज ऐकू येऊ लागतात, तेव्हा ते काही त्यांचा अभ्यास पुरा झाल्याचं लक्षण नसतं, तर अभ्यास करणं आणि खेळणं या दोन्ही गोष्टींना आधारभूत असलेल्या विचारांतल्या एका फरकाचं-व्यवस्थेचं एक निदर्शक असतं. आपल्याला वाटत असतं की, अभ्यास करण्याच्या निर्णयानं मुलं खोलीत गेली आहेत. पण मुलं मात्र अभ्यास करण्याच्या 'विचारानं' खोलीत जातात आणि काही खल करून खेळण्याच्या 'निर्णया'वर येतात. पुढं जे खेळण्याचे आवाज येतात, ती फक्त त्या 'निर्णया'ची अंमलबजावणी असते.

अशा तऱ्हेनं आपण सुरुवातीला पाहिल्याप्रमाणं आणि पूर्वी एका भागात पाहिल्याप्रमाणं, आपण जरा सावधतेनं या विचारांकडं पाहिलं, तर असं लक्षात येईल की, या वर्गीकरणाची, व्यवस्थेची आपल्याला अत्यंत गरज आहे. ती न कळली तर मुलांच्या बाबतीत घडलं तसं अनेक बाबतीत आपलं घडण्याची शक्यता आहे, प्रत्यक्ष घडत असतं-आपलं नुकसानही होत असतं. त्या दृष्टीनं पाहिलं तर, अनेक प्रकारांनी आपापल्या गरजेनुसार या विचारांचं वर्गीकरण करता येतं, आपल्याला त्या विचारांचे प्रकार जाणवत असतात.

कुणीतरी घरात आजारी असतं. त्यासाठी आपण गडबडीत औषध आणायला निघालेले असतो. रात्रीची वेळ असते, दुकानं बंद होण्याची शक्यता असते. अशा वेळी आपल्याला धाडधाड जिना उतरताना थांबवून एखाद्या शेजाऱ्यानं जर सोसायटीचा केरवाला कसा जबाबदारीनं काम करीत नाही, परवा जिन्याच्या कोपऱ्यात केर कसा राहिला होता, हे सांगायला सुरुवात केली, तर आपण क्षणात म्हणू की,'फालतू' विचार करीत बसायला मला वेळ नाही. इकडं माणूस आजारी आहे, औषधाची वाट पाहातो आहे, औषधाचं दुकान बंद व्हायची वेळ झाली आहे इत्यादी इत्यादी.

त्यामुळं व्यवहारानंसुद्धा अनेक विचार आपण 'फालतू'- कमी महत्त्वाचे

मानतो, तर काही विचार 'महत्त्वाचे' मानतो. वर्गीकरण चुकलं किंवा महत्त्वाचा विचार 'फालतू' - कमी महत्त्वाचा समजला गेला, तर होणारे परिणाम आपल्याला माहिती असतात. अनेकदा काही विचार आपण 'स्पष्ट' मानतो, काही 'गोंधळाचे-अस्पष्ट' मानतो. काही 'पक्षपाती' मानतो, काही 'निःपक्षपाती' मानतो. काही 'नवे' काही 'जुने' मानतो. अशी अनेक वर्गीकरणं आपण करीत असतो. उदाहरणार्थ, डावे-उजवे, सरळ-वाकडे, विधायक-विघातक, पुरोगामी-प्रतिगामी, कालातीत-कालबाह्य, दिशा असलेले-दिशाहीन असलेले इत्यादी इत्यादी.

अशी वर्गीकरणं अनेक असली तरी, एक नक्की की ती महत्त्वाची आहेत आणि तो तो विचार आपण कुठं टाकणार यानुसार आपल्या आयुष्यात काही दिशा, काही घटना अवलंबून असतात.

मग हे वर्गीकरण असं वेगवेगळ्या प्रकारे का घडतं आणि ते समजून घेण्यानं आपल्याला उपयोग कोणता, ते आपण पुढल्या भागात पाहू या.

******

१३. वर्गीकरणाची कारणं

आपण पाहिलंच की, बरेचसे विचार आपल्या मनात असले तरी त्यांची काही व्यवस्था लागली असली, काही वर्गीकरण, काही दिशा असली तर उपयोग अधिक होतो. असे थोडेफार प्रकार, विभाग आपण कळत-नकळत करीतच असतो. उदाहरणार्थ, विचार खूप असले तरी काही विचार महत्त्वाचे, तर काही गौण हे वर्गीकरण आपण करीतच असतो. एक नक्की की, हे वर्गीकरण वरवर पाहाता साधं वाटत असलं, निरुपद्रवी वाटत असलं, तरी त्यानुसार पुढं कृतीची दिशा ठरते, त्यानुसार दिवस जातो, इतकंच काय, आयुष्याची दिशा ठरते, असं आपल्या लक्षात येईल. त्यामुळंच हे वर्गीकरण कसं ठरतं, ते पाहाणं उद्‌बोधक ठरतं.

शाळकरी वयात खेळ-मौजमजा असे विचार महत्त्वाचे नि आवश्यक वाटतात, हा अनुभव आपण घेतला असेल. पण त्याचबरोबर आपण हाही अनुभव घेतला असेल की, त्याच वेळी खरं सांगायचं तर शाळा कॉलेजच्या वयात 'अभ्यास' हा महत्त्वाचा विचार असतो, हेही मत आपण ऐकलं असेल. मग यामुळं असा प्रश्न निर्माण होईल की, खेळ आणि अभ्यास यांतला नक्की 'महत्त्वाचा विचार' कुठला ?

याचं उत्तर ठरवण्यापूर्वी आपल्याला आणखी एक गोष्ट विचारात घ्यावी लागेल की, दोन्ही विचार मांडणाऱ्या व्यक्ती एकच आहेत काय ? बरेचदा आपल्या असं लक्षात येईल की, हे दोन जरा विरोधी वाटणारे विचार मांडणाऱ्या व्यक्ती वेगवेगळ्या असतात. या उदाहरणात 'अभ्यास' महत्त्वाचा हा विचार मांडणारी व्यक्ती पालक असते आणि 'खेळ' महत्त्वाचा हा विचार मांडणारी व्यक्ती शाळकरी मुलगा असतो. त्यामुळं पालकाच्या मतानुसार 'अभ्यास' हा विचार 'महत्त्वाचा', तर 'खेळ' हा विचार 'गौण' आणि मुलाच्या मतानुसार 'खेळ' हा विचार 'महत्त्वाचा' आणि 'अभ्यास' हा विचार 'गौण' असं वर्गीकरण असतं.

आता थोडं पुढं जाऊन पाहिलं की, हे असं वर्गीकरण त्यांनी त्यांनी का केलं आहे ? तर असं लक्षात येईल की, त्यांचं त्यांचं 'अनुभवविश्व' त्याला

कारण आहे. मुलाच्या अनुभवविश्वामध्ये त्यानं पाहिलेले प्रसिद्धीच्या झोतातले, सतत दूरदर्शनवर चमकणारे, हजारो माणसांना वेड लावणारे खेळाडू व त्यांचा खेळ-त्याचं आकर्षण हे भरलेलं आहे. त्यामानानं 'अभ्यास' ही त्रासाची आणि अनाकर्षक गोष्ट आहे. खेळात मनाला खिळवून ठेवण्याचं नि विसर पाडण्याचं सामर्थ्य आहे नि त्या मुलाच्या ते प्रत्ययाला आलेलं आहे. त्याच्याचबरोबर, अभ्यासामुळं मनाला येणारा कंटाळाही त्याच्या अनुभवाला आलेला आहे. परंतु त्याच्या अनुभवविश्वामध्ये या वयात अभ्यास 'गौण' समजल्याचे नि खेळ 'महत्त्वाचा' समजल्याचे परिणाम अजून समाविष्ट झालेले नाहीत आणि इथंच नेमका महत्त्वाचा मुद्दा आहे.

पालकांच्या अनुभवविश्वामध्ये त्यांनी त्यांनी वय-परिस्थितीपरत्वे अनुभवलेले या वर्गीकरणामुळे होणारे परिणामही समाविष्ट झालेले आहेत. त्यामुळं त्यांना 'अभ्यास करणं' हा विचार महत्त्वाचा वाटतो. इतकंच नव्हे, तर खिलाडूवृत्ती, शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्वास्थ्य अशा अनेक कारणांमुळं 'खेळ' या विचाराचंही महत्त्व त्यांच्या अनुभवविश्वात समाविष्ट झालेलं आहे. प्रश्न फक्त 'महत्त्वाचं' नि 'गौण' एवढी विचारांची दोनच वर्गीकरणं दिल्यास निर्माण होतो आहे. त्यांना जर तीन किंवा चार प्रकार दिले - जसं अत्यंत महत्त्वाचा, महत्त्वाचा, कमी महत्त्वाचा व अत्यंत गौण - तर हाच 'खेळ' हा विचार ते उचलून नंबर दोनच्या 'महत्त्वाचा' या प्रकारात टाकतील.

म्हणजे आपल्या एक लक्षात येईल की, मुलाला 'खेळणं' हा विचार अत्यंत महत्त्वाचा वाटत असला, तर त्याला बदडून काढण्यापेक्षा किंवा तुला अक्कल दिली नाही, म्हणून काही लागट बोलण्यापेक्षा हा बदल त्यामागच्या अनुभवविश्वामुळं होतो आहे, हे लक्षात घेणं आणि लहानच काय मोठ्या माणसाचंसुद्धा अनुभवविश्व जर मर्यादित असेल, तर तो विचारांची वेळी अशी चुकीची किंवा अयोग्य वर्गीकरणं करू शकेल व त्यानुसार वागूही शकेल, हे लक्षात घेणं आवश्यक आहे.

त्याच्याचबरोबर आणखीही एक गोष्ट लक्षात घेणं आवश्यक ठरेल की, अनुभवविश्व ज्याचं जेवढं विशाल राहील, तेवढं त्याचं विचारांचं वर्गीकरण स्वाभाविकपणे प्रगल्भ राहील, अचूक राहील.

आता हेही पाहावं लागेल की, एखादा विचार एखाद्या प्रकारात टाकायला, म्हणजेच उदाहरणार्थ 'महत्त्वाचा' किंवा 'कमी महत्त्वाचा' ठरवायला आणि अर्थातच त्यानुसार आयुष्य जगायला 'अनुभवविश्व' हे एकच कारण असेल काय ? तर त्याचबरोबर आपल्यावरचे संस्कार, आपले आग्रह, आपली वैचारिक किंवा सैद्धांतिक, पक्षीय वगैरे बांधिलकी, आपली व्यक्तिगत आर्थिक वा तत्सम लाभहानी इ. कारणंसुद्धा हे वर्गीकरण करताना त्यामागं असू शकतात. 'वरच्या'आदेशानुसार कालपर्यंत कमी महत्त्वाचा असलेला विचार सकाळसकाळी एकदम 'महत्त्वाचा' ठरून त्यानुसार सारी मंडळी कार्यवाही सुरू करू शकतात, विरोधी पक्षांच्या दृष्टीनं बजेट नेहमीच 'निराशाजनक, दिशाहीन व प्रतिगामी' तर सत्ताधारी पक्षाला तेच 'अत्यंत आशाजनक, नवी दिशा देणारं, पुरोगामी' असं, तेच पक्ष इकडचे तिकडं असले तरी, का वाटतं या साऱ्याची उत्तरं या वर सांगितलेल्या कारणांत आहेत.

त्यामुळं या वर्गीकरणामागची कारणं कळली तर आपल्याला विनाकारण निर्माण होणारे ताण कमी होतात, विरोध कमी होतात, परिस्थितीत मार्गही सुचतात, लोकांच्या म्हणण्यामागची खरी कारणं ओळखता येतात, संघर्ष टळतात, हे मात्र खरं !

******

१४. आणखी एक वर्गीकरण

घरातला कर्ता माणूस किंवा कुटुंबातले 'बाबा' 'वडील' दिवाणखान्यात बसलेले असतात. त्यांच्याकडं त्यांचे कुणी मित्र आलेले असतात. त्यांच्या बरोबर वडिलांच्या त्यांच्यात्यांच्या व्यवसाय-नोकरीतल्या गप्पा होतात. कामकाजाचं बोलणं झाल्यावर मग वैयक्तिक, घरगुती गप्पा सुरू होतात. नाटक-सिनेमा-करमणुकीचा विषय निघतो. सहज बोलताबोलता वडील त्यांच्या मित्रांकडून एखाद्या सिनेमाची तारीफ ऐकल्यावर बोलून जातात, मीही आज संध्याकाळी तो सिनेमा पाहावा असं म्हणतो. विषय तिथंच संपतो. मित्रमंडळी उठतात. त्यांना दाराशी सोडून घरात येईपर्यंत घरात लहान मुलांकरवी बातमी पोचलेली असते की, बाबा आज संध्याकाळी अमुकअमुक सिनेमाला जाणार. संध्याकाळी सहा ते नऊच्या खेळाला जाणार.

घरात शांत असतं. आई जेवायला वाढताना कटाक्षानं विषय काढीत नाही. कारण आधी काढते तेव्हा, नकार-नाराजी सर्व झालेलं असतं. मुलं एकमेकांकडं अर्थपूर्ण नजरेनं पाहातात. पण न बोलायचं ठरवतात. बाबा जेवून आपल्या व्यवसाय-कामासाठी निघूनही जातात. संध्याकाळी ते नेहमीप्रमाणंच घरी येतात, उलट थोडे लवकरच. आल्यावरही त्यांची कुठली गडबड दिसत नाही. तेव्हा मात्र या मुलांच्या आईला राहवत नाही. ती विचारते, 'आम्हाला वाटलं की आज तुम्हाला उशीर होईल !' त्यांच्या काही लक्षातच येत नाही. ते विचारतात, 'का बुवा? माझं तर आज काही जादा काम वगैरे नव्हतं किंवा मी तर असं काही बोलल्याचंसुद्धा आठवत नाही !'

तेव्हा आई खुलासा करते, 'नाही, आम्हाला वाटलं तुम्ही आज कुठल्यातरी सिनेमाला जाणार आहात.' त्यावर ते आणखीच बुचकळ्यात पडून म्हणतात, 'नाही! मी तर असं काहीच ठरवलेलं नाही. मग असं कुणी सांगितलं ?' 'मुलं म्हणत होती, तुमचं असं ठरलंय असं तुम्ही तुमच्या मित्रांनासुद्धा सांगत होता सकाळी. त्यावर मुलं जरा रागावूनच बसलीत. कारण त्यांना तुम्ही एकटेच कसे जाणार, त्यांना नेणार नाही, विचारलं पण नाही, असं वाटलं.' इति आई.

हा खुलासा ऐकल्यावर मात्र बाबांना त्यांच्या सकाळच्या गप्पांतल्या उल्लेखाची आठवण होते. त्यांना क्षणभर हसूही येतं, आश्चर्यही वाटतं. मग तेही सांगतात की माझा तसा 'विचार' आहे, असं मी म्हणालो होतो खरा, पण माझा काही तसा 'पक्का विचार' झाला नव्हता.

हा किंवा असे प्रसंग घडतात. ते जोपर्यंत इतके साधे असतात तोपर्यंत ठीक असतं. तरीही अशा साध्यासुध्या प्रसंगातसुद्धा लाभहानी - तशी हानीच बहुधा - सोसावीच लागते, गैरसमज होतात. एवढ्या साध्याशा बाबतीतसुद्धा बाबांचं एकट्याचंच जायचं ठरलं असूनही ते आपल्याला काही बोलले नाहीत, आपल्याला बरोबर नेणार नाहीत - असे अनेक तऱ्हेचे विचार येणं, त्यानुसार ज्याच्या त्याच्या प्रतिक्रिया व मनाच्या ठेवणीनुसार त्याला त्रास होणं, अशा तऱ्हेची हानी होतच असते.

परंतु हेच जेव्हा अधिकअधिक मोठ्या बाबतीत घडतं - तेव्हा होणारे समज-गैरसमज-मतं ही अधिकाधिक त्रासाची, हानिकारक असतात, हे आपणही अनुभवलं असेल. मग तो प्रसंग एखादी नोकरी करण्याचा किंवा सोडण्याचा असो, एखाद्याला एखादी आर्थिक किंवा तत्सम मदत करण्याचा किंवा नाकारण्याचा असो, एखाद्या व्यवसायातलं नवं पाऊल असो, एखाद्याचं एखाद्यावरचं प्रेम असो वा द्वेष असो - अशासारख्या कुठल्याही मोठ्या स्वरूपाच्या घटनेत जर याऐवजी ते वाटलं किंवा समज झाला तर पुढं मोठमोठ्या घटनांना, समज-गैरसमजांना सामोरं जावं लागतं. अनेकदा त्याचे परिणाम, विशेषतः दुष्परिणाम पुढं कित्येक वर्षं सहन करावे लागतात. किंबहुना काही वेळा ते इतके दूरगामी असतात की, अनेकांच्या आयुष्याची मांडणीच त्यामुळं बदलते, माणसं दुरावतात, वेगळ्या वाटा स्वीकाराव्या लागतात.

हे घडण्याचं कारण तपासून पाहिलं, तर आपण विचारांच्या वर्गीकरणाच्या बाबतीत आणखी एका पैलूशी परिचित होतो. गेल्या भागात जसं विचाराचं वर्गीकरण करताना आपल्याला नवा-जुना, महत्त्वाचा-गौण अशा स्वरूपाचं विचारांचं वर्गीकरण लक्षात आलं, तसंच विचाराच्या अवस्थांच्या दृष्टीनं आणखी एक वर्गीकरण या उदाहरणाच्या निमित्तानं लक्षात येईल.

तसं पाहिलं तर सिनेमाला जाणं, न जाणं - हे सारे विचारच असले

तरी त्यात थोडासा भेद करावा लागतो, जसा तो या उदाहरणातल्या वडिलांनी 'विचार आणि पक्का विचार' या शब्दांनी केला. त्यांचा सिनेमाला जाण्याचा 'विचार' होता, पण जावंच असा 'पक्का विचार' नव्हता. म्हणजेच तांत्रिकदृष्ट्या 'निर्णय' झाला नव्हता. 'विचार' करून अखेर घेतला जाणारा 'निर्णय' किंवा काढला जाणारा 'निष्कर्ष' हे सारे 'विचारविश्वा'तलेच घटक असले, तरी ते विचारांची विकासाच्या दृष्टीनं वेगवेगळी अवस्था दर्शवतात.

या अर्थानं आपल्याला विचारांच्या आणखी एका वर्गीकरणाचा विचार करणं आवश्यक ठरतं - ते म्हणजे विचारांच्या टप्प्यांच्या दृष्टीनं. साधे माहितीवजा विचार, त्यांची आवश्यक ती सुसंगत मांडणी करून केलेले विचार, त्यावरून अनुमानित परिस्थितीचे विचार, त्यातली निवड, त्याचे विचार, अखेर निष्कर्षात्मक व निर्णयात्मक विचार - अशा टप्प्यांतून हा 'विचार' प्रवास करत असतो.

आपण एखादा 'विचार' करतो किंवा एखाद्या गोष्टीविषयी एखाद्याचा 'विचार' ऐकतो, पाहातो, त्यावेळी या वर्गीकरणाच्या दृष्टीनं तो नेमक्या कुठल्या टप्प्यात आहे, हे कळणं आवश्यक असतं. नाहीतर पुढं देदीप्यमान विजयाऐवजी दणदणीत पराभव किंवा मीलनाच्या मधुर कालखंडाऐवजी प्रेमभंगाचा दारुण भोग वाट्याला येऊ शकतो. इतर समज-गैरसमज तर अनंतच !

अशा या 'आणखी एका वर्गीकरणा'विषयी अधिक माहिती आपण पुढल्या भागात पाहू या.

******

१५. पहिला टप्पा

आपण पाहिलंच की, विचार सारे एकच वाटत असले, तरी त्यांची दोन प्रकारांनी वर्गीकरणं करता येऊ शकतात. पहिलं प्रकार म्हणून आणि दुसरं त्या विचारांच्या अवस्थेचा टप्पा म्हणून. पहिल्यामध्ये नवा-जुना, महत्त्वाचा-गौण, पुरोगामी-प्रतिगामी असे अनेक प्रकार दिसतात, तर दुसऱ्या वर्गीकरणामध्ये विचाराचा विकास होत तो पक्का किंवा परिपक्व होण्यातले टप्पे दिसतात. त्यांचा अधिक विचार आपण यापुढं काही भागात करू या.

आपण अशी वाक्यं नेहमी ऐकतो की, अमुक माणूस अगदी देवमाणूस आहे, अमका माणूस फार स्वार्थी आहे, दुनिया खऱ्याची नाही, जगात माणुसकी राहिली नाही इत्यादी इत्यादी. ही नुसतीच वाक्यं नसतात. त्यामधलं वजन काही वेगळंच वाटतं, नाही का? तो एक साधा विचार वाटत नाही. एखादा माणूस समोर आला आणि हा विचार सुचला किंवा हे मत मांडलं असं होत नाही, होऊही नये.

रस्त्यानं जाताना एखादा माणूस समोर दिसला की, त्याविषयी मत व्यक्त करण्याची काहींना सवय असते. अशा वेळी असं मत आपण फारसं ग्राह्य धरीत नाही. उलट असं नुसतं आणि तेही पाहाताक्षणी मत देणाऱ्यालाच आपण अपरिपक्व समजतो. कारण 'अमका माणूस देवमाणूस आहे' असं आपण मानतो तेव्हा त्यामागं बराच अनुभव असतो. तो नुसता विचार उरत नाही, त्याला 'निष्कर्षा'चं स्वरूप आलेलं असतं.

थोडं पुढं जाऊन पाहिलं, तर असं 'निष्कर्षा'चं स्वरूप त्या विचाराला येण्यापूर्वी किंवा त्या टप्प्याला तो विचार येण्यापूर्वी त्या विचारानं आणखी काही टप्पे पार केलेले असतात, असायला हवेत. पहिल्यांदा त्या माणसाविषयी वेगवेगळ्या प्रसंगात अनुभव मनानं गोळा केलेले असतात. या साऱ्या अनुभवांची मांडणी एकत्रितपणे व सुसंगतपणे केली जाते. नंतरच्या टप्प्यात आपली 'देवत्वा'बद्दलची कल्पना त्याच्याशी जुळते आणि म्हणून जोडली जाते. शेवटच्या टप्प्यात या साऱ्याचा संबंध जोडून 'अमुक माणूस देवमाणूस आहे'

असा निष्कर्ष काढला जातो.

आपण ही जी प्रक्रिया केली ती मोठी सावधगिरीनं, मुद्दाम किंवा कळूनच करतो असं नाही. तेवढ्या टप्प्यातून आपण अनेकजण अनेकदा नकळतच जातो. पण हे सारं जर थोडं व्यवस्थितपणे आणि सुटंसुटं लक्षात आलं, तर या 'विचारांच्या विकासा'च्या माहितीचा वा अभ्यासाचा उपयोग कसा होतो, हे लक्षात येतं. त्याचबरोबर आपल्या दैनंदिन आयुष्यातसुद्धा या टप्प्यांच्या थोड्याशा परिचयानं किंवा अभ्यासानं कसा विधायक फरक पडतो, ते आपल्या ध्यानी येऊ शकतं.

ज्या वेळी एखाद्या माणसाबद्दल आपण असं म्हणतो की, तो देवमाणूस आहे, तेव्हा सर्वांत पहिला टप्पा असतो की, त्याच्या 'देवपणा'च्या काही खुणा आपल्या अनुभवाला आल्या पाहिजेत. किमानपक्षी ज्या खुणांच्या किंवा अनुभवांच्या आधारानं आपण पुढं जाणार ते अनुभव सर्व स्वत:चे नसतील, तर निदान खात्रीलायक तरी असायला हवेत. त्याचबरोबर असा निष्कर्ष काढण्यासाठी ते पुरेसेही हवेत. म्हणजे या टप्प्यातल्या दोन अतिशय महत्त्वाच्या गोष्टींकडं आपलं लक्ष असायला हवं. त्या या की, अनुभवांची 'विश्वासार्हता आणि पर्याप्तता'. यांतल्या कुठल्याही मुद्याकडं दुर्लक्ष झालं, तर अर्थातच आपल्या निष्कर्षात घोटाळा होण्याची शक्यता असते. आपण एक गंमतशीर निष्कर्ष पाहू या.

एका तळ्यावर नेहमी मासे पकडणारा माणूस नव्यानंच ते तळं पाहायला आलेल्या दुसऱ्या माणसाला तळ्याविषयी आणि त्यातल्या माशांविषयी सांगताना म्हणाला की, या तळ्याचं एक वैशिष्ट्य आहे की, इथं सारे मासे मोठेच आहेत. या तळ्यात एक इंचाच्या खालचा मासाच मिळणार नाही.

तो दुसरा माणूस जिज्ञासू होता, तसाच चाणाक्षही होता. त्यानं त्या कोळ्याला विचारलं की, 'तू असं कशावरून म्हणतोस ?' त्यावर तो कोळी म्हणाला,'हा काही काल परवाचा अनुभव नाही. अनेक वर्षं मी या तळ्यात मासे पकडतो आहे. एकदाही असा एक इंचापेक्षा कमी मासा जाळ्यात आलेला नाही. इथली माशांची जातच मोठ्या आकाराची आहे. काल आज नव्हे, आत्तासुद्धा तुम्ही पाहू शकता, मी म्हणतो ते खरं आहे की नाही !'

असं म्हणून त्यानं पाण्यातलं जाळं खेचून जमिनीवर टाकलं. त्यातले सारेच मासे मोठे होते. त्या दुसऱ्या हुशार प्रवाशानं त्याच्याकडं, त्याच्या त्या जाळ्याकडं नि तळ्याकडं एकवार पाहिलं आणि मनाशी काय ते समजला. तो उद्‌गारला,'अरे मित्रा, तू ज्या जाळ्यानं मासे पकडतो आहेस, त्यातली वीणच मुळात एका इंचापेक्षा जास्त व्यासाची आहे. त्यामुळं त्यापेक्षा म्हणजे एक इंचापेक्षा लहान मासे त्यात कसे सापडतील ? ते नेहमीच त्यातून निसटून जातात. पण म्हणून या तळ्यात तसे छोटे मासेच नाहीत, असं कसं म्हणता येईल ?'

हे उदाहरण दिसतं साधंसंच, पण त्यातून आपण जी मतं - म्हणजेच निष्कर्ष जगाबद्दल, इतरांबद्दल, घटनांबद्दल, वस्तूंबद्दल ठामपणे मांडत असतो, त्यापोटी अनेकदा इतरांचा रोषही पत्करतो - तसे निष्कर्ष मांडण्यापूर्वीच्या साऱ्या टप्प्यांची आपण योग्य ती काळजी घेतली आहे का, एवढं पाहायची तसदी घेण्याची किती गरज आहे, हे लक्षात येतं. कोळ्याचा अनुभव हा 'पर्याप्तता' किंवा पुरेसेपणा या दृष्टीनं ठीक असला, तरी तो अनुभव खरा किंवा विश्वासार्ह मानण्यासाठी अनुभव घेताना वापरलेली साधनं हीसुद्धा सक्षम आणि विश्वासार्ह असली पाहिजेत.

ही कसोटी लक्षात न घेतल्यानं अर्थातच सपशेल चुकीचा 'निष्कर्ष' निघू शकतो. तीच अवस्था अनेकदा आपली जगात होत नाही का ? 'देवमाणूस' वाटणारा असा वागेल असं वाटलं नव्हतं किंवा 'स्वार्थी' समजतो तो माणूस अगदी 'नि:स्वार्थी'पणे वागल्याचं दिसतं - असल्या गफलती निदान या 'पहिल्या टप्प्या'च्या अभ्यासानं तरी आपण टाळू शकू.

******

१६. गृहीत धरण्यातले धोके

ज्याच्या आधारावर आपण सारे निष्कर्ष आयुष्यभर काढीत असतो, त्या 'गृहीतका'च्या पहिल्या टप्प्यावर थोडासा विचार आपण यापूर्वीच्या भागात केला. हा टप्पा फारच महत्त्वाचा असल्यानं अधिक विचार या भागात करू या.

आपण हे पाहिलंच की, आपण काही निष्कर्ष, उदाहरणार्थ, 'अमुक माणूस वाईट आहे'- हा निष्कर्ष काढण्यापूर्वी काही गोष्टींचा आधार घेतच असतो, त्या म्हणजे आपले किंवा काही बाबतींत आवश्यक तिथं इतरांचे प्रत्यक्ष अनुभव, आधीच उपलब्ध असलेली माहिती इत्यादी. जर आपला निष्कर्ष आपण या गोष्टींवर अवलंबून ठेवणार असू, तर या आधाराबद्दल विचार करणं हेही ओघानंच आवश्यक ठरतं.

वरच्याच उदाहरणात 'अमुक माणूस वाईट आहे' असा निष्कर्ष काढताना त्याच्या 'वाईटपणा'चा किंवा 'चांगुलपणा'चा अनुभव आपण गृहीत धरलेला असतो. हे वाक्य जरी साधं वाटलं तरी, त्यातसुद्धा किती विचार करण्यासारख्या गोष्टी एकत्र आलेल्या आहेत, ते पाहा. यात 'तो माणूस' आपल्याला कळलेला आहे, 'चांगलं नि वाईट' आपल्याला कळतं आहे, त्याच्या बाबतीत जो अनुभव आपल्याला आलेला आहे, तो अनुभव घेणारी आपली अनुभवयंत्रणा सक्षम व विश्वासार्ह आहे आणि शेवटी या साऱ्याचा संकलित व बिनचूक अर्थ लावणारी प्रगल्भ विचारशक्ती आपल्याजवळ आहे व कार्यरत आहे - हे सारं आपण गृहीत धरलेलं आहे.

जरा विचार करण्यासाठी यांतली एकेक बाब घेऊ या.एखाद्या माणसाला आपण ओळखतो, असं आपण म्हणतो, तेव्हा त्याचा चेहरामोहरा, त्याचं नाव, गाव, पत्ता अशी वरवरची जी माहिती आपल्याला आहे तीच आपण पुरेशी समजतो. ती माहिती तशी बिनचूक मिळवणं, साठवणं हे फारसं अवघडही नाही. पण जेव्हा आपण त्याच्या चांगुलपणा, वाईटपणाविषयी काही निष्कर्ष काढणार, ती ओळख मात्र नावपत्त्याएवढी सोपी नाही, हे लक्षात येईल. कारण ती अशी इतकी जुजबी-निश्चित आणि बाह्य स्वरूपाची नाही.ती आतली आहे. तिची ओळख आहे,

असं म्हणणं किती धाडसाचं आहे, हे प्रामाणिकपणे विचार करणारा जाणू शकेल.

दुसरी बाब 'चांगलेपणा-वाईटपणा' कळण्याची आहे. सर्वसाधारणपणे प्रत्येकाला आपापल्यापरीनं चांगलं-वाईट काय ते कळतं, असं आपल्याला वाटतं. पण या दोन्ही गोष्टी इतक्या सापेक्ष आहेत, असं आपल्या अनुभवाला येईल की, दहा वर्षांपूर्वी जे 'चांगलं' असं आपल्याला वाटत होतं, तेच आजही वाटतं, असं म्हणणं कठीण आहे. काही कालातीत व निर्विवाद गोष्टींचा अपवाद सोडून दिला, तर उरलेल्या असंख्य चांगल्या गोष्टी काल चांगल्या होत्या, उद्या चांगल्याच राहतील, याची खात्री नाही.

तद्वतच जे मला चांगलं ते तुम्हाला किंवा आणखी कुणाला चांगलंच असेल, असं सांगता येत नाही. जे लहानाच्या बाबतीत चांगलं, तेच मोठ्यांच्या किंवा वृद्धांच्या बाबतीत चांगलं असेल, असं सांगता येत नाही. या भौगोलिक परिस्थितीत जे चांगलं ते दुसऱ्या वा भिन्न प्रकारच्या परिस्थितीत चांगलं ठरेल, असंही सांगता येत नाही. माझ्याच बाबतीत एका मन:स्थितीत जे चांगलं वाटतं ते दुसऱ्या प्रकारच्या मन:स्थितीत चांगलं वाटत नाही. त्यामुळं ज्या वेळी 'मला चांगलं-वाईट कळतं' असं म्हणतो, तेव्हा आपण केवढं धाडसी विधान करतो आहोत, ते ध्यानात घेण्यासारखं आहे.

तिसरी बाब तर याहीपेक्षा गोंधळाची नि आपल्याला विचार करायला लावणारी आहे. ती म्हणजे आपली 'अनुभव घेणारी यंत्रणा'. तिच्या आधारानं तर आपण विचारांच्या 'निष्कर्षां'चा तिसरा निर्णायक टप्पा आयुष्यभर अनेकदा पार पाडीत असतो. तिचा विचार करायला लागलं, तर मात्र आपला प्रवास किती 'निसरड्या'वर चाललेला असतो, हे लक्षात येतं.

अनुभव घेण्याची आपली मुख्य यंत्रणा पंचेंद्रियांची आहे. त्यांच्यावर आपली एवढी भिस्त आहे की, त्यांच्या आधारानंच आपण अशी अनेक विधानं स्वत: करीत असतो किंवा इतरांना करताना पाहातो - 'मी स्वत: डोळ्यांनी पाहिलंय, खरंच आहे, यात तिळमात्र शंका नाही.','मी नुसतं ऐकलं नव्हे, साक्षात हात लावून पाहिलंय, म्हणून खात्रीनं सांगू शकतो की, ते पाणी गारच आहे.','मी त्या माणसाबद्दल इतके दिवस नुसतं ऐकूनच होतो काहीबाही, पण मी परवा प्रत्यक्ष त्याला बाटली नि ग्लास घेऊन बसलेला बघितला, तेव्हा मात्र खात्री

पटली. आता तुम्ही बाकीचं काही सांगूच नका' - अशी अनेक विधानं आपण प्रत्यही करीत असतो, ऐकत असतो. इंद्रियांच्या अनुभवानं आपल्याला किती ठामपणा नि खात्री वाटते, याची ती द्योतकच आहेत.

आपण एक गोष्ट पाहू. एक साधू नेहमी ईश्वरचिंतनात मग्न असे. हळूहळू त्याची माहिती कळून त्याच्याकडं लोकांची रीघ लागायला लागली. सततच्या या वर्दळीनं त्याला मिळणारा व हवा असलेला एकान्त इतका दुर्मीळ व्हायला लागला की, त्यानं मनाशी काही निर्णय घेतला. दुसऱ्या दिवसापासून लोक दर्शनाला आलेले असताना तो मुद्दाम उठून आत जाऊन काही पिऊन येई. पुढंपुढं त्याच्यासमोर ग्लास दिसायला लागला. नंतर तर तो एक रंगीत बाटली नि ग्लासच हाताशी ठेवायला लागला. प्रथम लोकांत कुजबूज - मग शंका - मग चर्चा होऊन हा साधू आता बिघडला, असं वाटून लोकांची गर्दी हळूहळू कमी झाली. त्याची मोजकी चार माणसं सोडली तर कुणी फिरकेना.

तो आता ईशचिंतनात पूर्वीसारखा तासन्‌तास मग्न राहायला लागला. जवळच्या शिष्यानं जिज्ञासेनं ती बाटली ओतून पाहिली तर त्यात साधं शुद्ध पाणी होतं. एका आवश्यक गोष्टीसाठी एका सात्त्विक व्यक्तीनं काढलेल्या या मार्गाबद्दल आपला कदाचित मतभेद असला तरी, आपल्या निष्कर्षांच्या यंत्रणेतले कच्चे दुवे तो दोन्ही मार्गांनी दाखवतो.

डोळ्यांच्या साहाय्यानं आपल्याला येणारा अनुभव कितपत विश्वासार्ह असतो आणि त्यामुळं सामान्य माणूस म्हणून आपण त्या आधारानं काढलेला निष्कर्ष कितपत खरा असतो, हे दाखवणारी ही गोष्ट आपण पाहिली. त्यावर दुसऱ्या बाजूनं अधिक विचार आणि चौथ्या घटकावरचा विचार आपण पुढल्या भागात करू.

******

१७. इंद्रियानुभवांच्या मर्यादा

कोणताही विचार करून पुढं निष्कर्ष काढण्याच्या टप्प्याला येताना चार घटक किंवा बाबी आपण गृहीत धरलेल्या असतात. त्या बाबींचा थोडा परिचय आपण मागल्या भागात पाहिला. 'अमुक माणूस वाईट आहे' हा निष्कर्ष काढताना 'त्या माणसाच्या ठिकाणच्या चांगुलपणा- वाईटपणाबद्दल आपण ओळखतो' ही पहिली, 'मुळात चांगुलपणा- वाईटपणा म्हणजे काय याची आपल्याला नक्की कल्पना आहे' ही दुसरी, आणि 'त्या माणसाविषयीचा अनुभव घेणारी आपली यंत्रणा पुरेशी व सक्षम आहे' ही तिसरी बाब. या बाबी आपण कशा गृहीत धरतो आणि त्यामुळं काय होऊ शकतं, याचा तपशिलात परिचय आपण करून घेतला. त्यांतला तिसरा घटक अधिक तपशिलात आपण आता पाहू आणि मग चौथ्या घटकाचा परिचय करून घेऊ.

आपल्या निष्कर्षाचा महत्त्वाचा आधार आपल्या इंद्रियांची अनुभवयंत्रणा हा आहे. इंद्रियांनी - मग तो डोळा असो, कान असो - येणारा अनुभव हा आपल्याला अगदी साक्षात, प्रत्यक्ष असल्यानं फार खरा वाटतो, विश्वासार्ह वाटतो. परंतु जनसंपर्क कमी करू इच्छिणाऱ्या साधूनं साध्या रंगीत बाटलीच्या आणि त्यात असलेल्या साध्या शुद्ध पाण्याच्या साहाय्यानं सामान्य माणसांना कसा विचार करायला लावला आणि आपल्यामागची गर्दी कशी कमी करून घेतली, हे आपण एका गोष्टीत पाहिलं.

त्यावरून आपल्या एक लक्षात येईल की, समोर दिसतं आहे, तुम्ही किंवा कुणी ते प्रत्यक्ष पाहिलं आहे, एवढा - एरवी खरा वाटणारा आधार - निष्कर्षाचे विचार मांडायला पुरेसा नाही. मुळात या इंद्रियानुभवाचाच आधार ठिसूळ आहे. ज्या दोन गोष्टी एखाद्याजवळ दिसल्या म्हणजे तो माणूस व्यसनी झाला, हे जसं इंद्रियानुभवामुळं आपण खरं समजतो, त्याला एक दुसरी बाजूही आहे. हा एक नकारात्मक अनुभव आहे. पण आपण नेहमी येणारा, चांगला वाटणारा किंवा सकारात्मक अनुभव पाहू.

एखादी शांत ठिकाणची जागा. कुणी भला माणूस येतो. झोपडी उभी

करतो. पूजा-पाठ-ध्यान-जप करताना दिसतो. आत कापूर-उदबत्ती-मूर्ती-फुलं-माळा-हार सारं दिसतं. सामान्य माणसाला इंद्रियावर आधारलेला अनुभव चांगलंच सांगतो. माणसांची पावलं अनायास वळतात. भल्या माणसाकडं हळूहळू गर्दी वाढते. निरपेक्षपणे चाललेला उद्योग खूप लोक खेचतो. इंद्रियं 'इथलं वातावरण, माणसं चांगली-सात्त्विक-आदर्श असल्याचा' निष्कर्ष काढतात. पण एक दिवस कुणीतरी गोष्टी उघड करतो. तिथली तस्करी, स्मगलिंग, बुवाबाजी सारं समोर येतं. आजच्या काळात हेही अनुभव दुर्मीळ नाहीत.

अशा वेळी इंद्रियांनी समोरचे पूजा-पाठ आदी बाह्य दृश्य भागाचा अनुभव घेऊन काढलेले 'सात्त्विकतेचे-चांगुलपणाचे-आदर्शा'चे निष्कर्ष नि विचार का आणि कसे चुकले असतील, याचा विचार करण्याची गरज नाही का? इंद्रियांनी दिलेल्या माहितीवरचा निष्कर्ष चांगला असो वा वाईट असो, सकारात्मक असो वा नकारात्मक असो - त्याचा आधार जोपर्यंत असा इंद्रियांच्याच अनुभवाचा आहे, तोवर तो चुकीचा ठरण्याची शक्यता गृहीत धरावी लागते.

याच इंद्रियांच्या अनुभवावर आणखीही एका बाबतीत सावध राहाण्याची गरज आहे. अनुभव घेण्याची 'इंद्रियांची जी यंत्रणा' पुरेशी आहे, असा आपला आयुष्यभर नकळत विश्वास असतो, ती पुरेशी नाही ही ती बाब होय. पाचही इंद्रियांच्या कक्षेत न येणारे आणि तरीही सत्यच नव्हे तर आपल्या दृष्टीनं अत्यंत महत्त्वाचे असलेले असे कित्येक अनुभव आहेत व ते विचारात घेता न आल्यानं होणारं नुकसान आपलंच आहे. थोडं उदाहरणानं पाहू.

अत्यंत धनाढ्य घरातला एकुलता एक बुद्धिमान, बलवान मुलगा. इंद्रियं पाहून सांगतील की परिस्थिती उत्तम-तो सुखी आहे. पण आपला देश पारतंत्र्यात पिचतो, यामुळं तोच मुलगा अत्यंत दुःखी. दुसऱ्या चित्रात परकीय सत्तेच्या न्यायाधीशांनी मुलाला देशद्रोहावरून फाशी दिली आहे. कैद्याचं जीवन. कैद्याचा वेश घालून साखळदंडांनी त्याला वधस्तंभाकडं नेलं जात आहे. इंद्रियं म्हणतील, दयनीय, दुःखी अवस्था, निकृष्ट जीवन इ.इ. प्रत्यक्षात मात्र देशासाठी प्राण वेचण्याचं दुर्मीळ भाग्य वाट्याला आल्यानं तोच मुलगा अत्यंत आनंदी, साफल्याच्या स्थितीत.

हे दोन्ही इंद्रियांचे अनुभव एक सांगतात, पण परिस्थिती मात्र वेगळीच अनुभवाला येते. कारण देशभक्ती काय, साफल्य काय, सार्थक काय - हे सारं त्या इंद्रियानुभवांच्या पलीकडचं आहे. मूल्यांचं एक मोठं जग आहे, जे त्यांच्या कक्षेतही येत नाही. पण तीच मूल्यं माणसाच्या आयुष्याला वळण देतात, क्रांती घडवतात. त्यामुळं ती मूल्यं खरी नि विचारात घेणं गरजेची असलेली आहेत. न घ्यावी तर निष्कर्ष अपुरा, चुकीचा, विपरीत निघतो.

मग इंद्रियांचा आधारच न घेता विचार करावा किंवा निष्कर्ष काढावा का ? तर अर्थातच नाही. कारण आपल्या अनुभवांचा, एकूण व्यवहाराचा आधार तर तोच आहे. फक्त एक करण्याची आवश्यकता आहे की, त्यांच्या मर्यादा आपण लक्षात ठेवू आणि मगच त्यांचा आधार घेऊ. जो विषय त्यांच्या कक्षेत येतो आहे, तिथवर त्यांचा आधार घेऊ, मत घेऊ. पण जिथं आपल्या लक्षात येईल की, हा विषय त्यांचा नाही किंवा त्यांच्या कक्षेच्या, क्षमतेच्या बाहेरचा आहे, तेव्हा मात्र पूर्णपणे त्यांच्या अनुभवावर आपण निष्कर्ष काढणार नाही, निदान जपून निष्कर्ष काढू किंवा निदान ठाम राहाणार नाही, तो निष्कर्ष चुकेल हे तरी गृहीत धरू.

आता निष्कर्ष काढण्याच्या बाबतीत आपण नकळत गृहीत धरलेला, पण ज्यावर विचार करण्याची गरज आहे, असा जो चौथा घटक 'विचारशक्ती'चा - त्याचा विचार आपण पुढल्या भागात करू या.

******

१८. चौथा घटक

आपण या पूर्वीच्या भागांत पाहिलं की, एखादं असं विधान किंवा विचार किंवा साधासा वाटणारा निष्कर्ष आपण काढीत असलो, तरी ती वाटते तेवढी सरळ सोपी गोष्ट नाही. 'अमका माणूस वाईट आहे' हा आपला साधासाधा वाटणारा निष्कर्ष वा विचार किती गोष्टी नकळत गृहीत धरतो, हे विचार केला तरच लक्षात येतं.

हे लक्षात येण्यानं आपण सावध होतो. चुकीचे, अवाजवी, अनाठायी निष्कर्ष तर टळतातच, पण त्यामुळं विनाकारण निर्माण होणारे वैचारिक, मतामतांचे, संबंधांचे - कौटुंबिक-सामाजिक गोंधळही टळतात, गैरसमजुती, वितुष्टं टळतात - सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, या साऱ्यांत होणारा स्वत:चा मूल्यवान वेळ व शक्तीचा अपव्यय टळतो. त्या दृष्टीनं जे सर्वसाधारण चार घटक आपण गृहीत धरतो, त्यांतल्या चौथ्या अर्थातच अखेरच्या 'विचारशक्ती'च्या घटकाचा विचार आपण इथं करू या.

वरील उदाहरणात 'अमुक माणूस वाईट आहे' असा निष्कर्ष काढताना, त्यात एक प्रक्रिया आपण नकळत पूर्ण केलेली असते, असं आपल्या लक्षात येईल. फार खोलात न जाता आपण असं म्हणू शकतो की, 'अशा वाईट गोष्टी त्या माणसानं केल्या आहेत, म्हणून तो माणूस वाईट आहे' एवढी तरी वैचारिक प्रक्रिया आपण सहजपणे पूर्ण केलेली असते. ही जी वैचारिक प्रक्रिया आपण पूर्ण करतो, रोज दिवसातून अनेकदासुद्धा पूर्ण करतो - आयुष्यभर करीत असतो, ती करण्याला लागणारी 'सक्षम, निर्दोष विचारशक्ती' आपल्याला आहे, असं आपण गृहीत धरतो, असं म्हणणं भाग आहे, नाही का ?

कारण अशी विचारशक्ती आपल्याकडं नाही म्हणणं म्हणजेच वर सांगितले तसले निष्कर्ष चुकीचे असू शकतील, असं म्हणण्यासारखं आहे. ते तर आपण म्हणू शकणार नाही, निदान मान्य करणं अवघड ! मग या शक्ती आणि प्रक्रिया आपल्यात आहेतच असं म्हणणं भाग पडतं आणि ते सोपंही असतं.

आपल्याला त्या जुन्या उदाहरणात डोळे मिटून दूध पिणाऱ्या मांजराची परिस्थितीही माहीत आहे. कुणी पाहू नये असं त्याला वाटतं, पण पाहाणाऱ्या साऱ्यांना हाकलणं किंवा यायला मज्जाव करणं यांतलं काहीच त्याला शक्य नसतं. बरं, ते दूध चोरून प्यायचं तेही टाळणं शक्य नसतं. मग ते 'कुणी पाहू नये म्हणून स्वत:चेच डोळे मिटून घेणं' हाच एक 'खरा नसला तरी सोपा वाटणारा' पर्याय स्वीकारतं ! तसं काहीसं हे सारं होतं. त्यासंबंधी एक छोटंसं उदाहरण पाहू या.

गणपतरावांचा मुलगा मोठा - कॉलेजचं शिक्षण संपत आलेला, स्वत:चं मित्रमंडळ असलेला. गणपतरावांनी त्याला एरवी स्वातंत्र्य व शिक्षणाची आवश्यक ती संधी व सुविधाही दिल्या. पण एके दिवशी त्याला सावध करताना त्यांनी सांगितलं की, 'तुझ्या अमुकअमुक मित्रांची संगत तू सोड, त्यांचं वर्तन चांगलं नाही.'

मुलाला जरा धक्काच बसला. वडील अनुभवी, वयानं-शिक्षणानं-अधिकारानं थोर म्हणून त्यांना न दुखवता त्यानं त्यांचा हा निष्कर्ष कशावर आधारलेला असावा, याचा शोध घेतला. तेव्हा त्याच्या काही गोष्टी लक्षात आल्या त्या अशा की, हे मित्र कुप्रसिद्ध झोपडपट्टीच्या परिसरातून येताजाताना वडिलांनी प्रत्यक्ष पाहिले होते. त्याचबरोबर सिनेमागृहासमोर गर्दीत तर पानपट्टीच्या दुकानासमोरही ते अनेकदा आढळले इत्यादी इत्यादी. अर्थात ही माहिती मुलांच्या वाईटपणाविषयीचा निष्कर्ष काढायला वडिलांना आधार म्हणून तशी पुरेशी वाटणारी असली, तरी मुलाच्या दृष्टीनं त्यांत पुढील महत्त्वाच्या बाबी नव्हत्या.

पहिली म्हणजे, ही मुलं वाईट मानल्या जाणाऱ्या झोपडपट्टीच्या परिसरात का फिरत होती, याची कारणं फारच वेगळी होती आणि ती विचारातच घेतली गेली नव्हती. ती मुलं एका समाजसेवी संघटनेची सभासद होती आणि अशा प्रतिकूल वातावरणातल्या लहान मुलांना एकत्र करून शिक्षण-प्रबोधन अशा कामासाठी ते मित्र तिथं जात होते. ही वस्तुस्थिती होती.

हीच परिस्थिती थोड्याफार फरकानं इतर निरीक्षणांच्या बाबतीत होती.

त्यातही शिक्षण-समाजसेवा-स्वावलंबनासाठी नोकरी हे सारं करणाऱ्या त्या मुलांना कुठंतरी योग्य मनोरंजन-करमणूक याचाही रास्त अधिकार होता. पण ते जे मनोरंजन समजत होते, त्याला बालिशपणा किंवा बाष्कळपणा म्हणावं, असं वडिलांचं मत-विचार होता.

वडील काय किंवा ते मित्र काय-दोघांच्याही वस्तुस्थितीचा यथायोग्य विचार केल्यानं मुलानं मात्र परिस्थितीतून बरोबर व मध्यम मार्ग काढला-निष्कर्ष काढला. या साऱ्या प्रक्रिया-विचारांची जी साखळी वडिलांनी व मुलानं वापरली ती साखळी म्हणून एकच असली, तरी आपण हे सहजच ओळखू शकू किंवा वडिलांच्या वय-अनुभवाविषयी आदर राखूनही आपण म्हणू शकू की, त्यांतल्या त्यात मुलाची विचारशक्ती ही अधिक प्रगल्भ होती. दोघांकडंही विचारक्षमता आहेच. पण मुलाच्या क्षमतेचा विकास अधिक झालेला आढळतो. त्याची विचारयंत्रणा 'सक्षम व निर्दोष' ठरते. म्हणूनच त्यानं केलेला विचार 'अधिक प्रगल्भ' ठरला. स्वाभाविकच तो अधिक लोकांना पटणारा व उपयोगी ठरणारा आहे.

यामुळंच आपल्याला असं आढळेल की, जगामध्ये आपल्या भोवताली आपल्या स्वत:सकट असंख्य माणसं विचारशक्ती असलेली, अविरत विचार करणारी असली तरी, काहींचेच विचार टिकाऊ, दिशा देणारे, विधायक, हिताचे ठरतात. म्हणूनच आपण या 'विचारशक्ती'च्या विकासाचा अधिक विचार पुढल्या भागात करू या.

******

१९. विचारशास्त्राचा परिचय

नुसता विचार करीत पुढंपुढं जाणं, काही निष्कर्ष काढून मोकळं होणं आणि शुद्ध, योग्य विचार करीत जाणं व काही निष्कर्ष काढणं, यांमधला फरक आपण गेल्या प्रकरणात पाहिला.

त्यामुळंच साधा निष्कर्ष किंवा साधा विचार आणि प्रगल्भ निष्कर्ष, प्रगल्भ विचार यांतला भेदही आपल्याला जाणवला. त्या दृष्टीनं, लहान मुलापासून मोठ्या माणसापर्यंत सर्वत्र ही विचारशक्ती विद्यमान असली, विचारप्रक्रिया सुरू असली तरी, शुद्ध, युक्त अशी प्रक्रिया मात्र फारच थोड्या ठिकाणी सुरू असते, असं दिसून येईल. अशा तऱ्हेच्या शुद्ध विचारांचं काही शास्त्र किंवा अभ्यास आहे आणि तो प्रत्येकाला इतका मोलाचा आहे, याचीही कल्पना अनेकांना नसते.

मुळामध्ये आपली आज 'विचार' म्हणजे कुठल्यातरी विषयाचा, शास्त्राचा विचार अशीच समजूत होते. पण आपण वनस्पतिशास्त्राचा विचार, नागरिकशास्त्राचा विचार, संगणकशास्त्राचा विचार - असे वेगवेगळ्या विषयांचे, शास्त्रांचे विचार करतो किंवा मुलीच्या लग्नाचा विचार, घर बांधण्याचा विचार, ईश्वराचा विचार, मुलाच्या भवितव्याचा विचार - अशा काही अगदी व्यक्तिगत जिव्हाळ्याच्या व दैनंदिन प्रश्नांचा विचार करतो, तेव्हा या साऱ्यात जी 'विचार करण्याची' प्रक्रिया करतो ती सारखीच असते आणि ती स्वतंत्र प्रक्रिया असते, हे लक्षात घेणं आवश्यक असतं, नाही का ?

वनस्पतिशास्त्रज्ञ जरी झाला, तरी त्यानं जर अयुक्त, अपुरा विचार केला तरी त्याचा वनस्पतिशास्त्रातला निष्कर्ष चुकू शकतो, यात वनस्पतिशास्त्राच्या ज्ञानातली त्रुटी नसून 'विचारशास्त्रा'च्या ज्ञानातली त्रुटी आहे, हे म्हणावं लागतं, तीच बाब कुटुंबातल्या वर उल्लेखलेल्या एखाद्या विषयाच्या बाबतीत असू शकते. मुलाच्या भवितव्याचा विचार करताना अयुक्त, अपुरा विचार केला जाऊ शकतो, निष्कर्ष काढला जाऊ शकतो आणि अर्थातच त्यात चूक असल्यानं त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात.

यामध्ये मुलांच्या संगोपन किंवा तत्संबंधी शास्त्राच्या अभ्यासातल्या त्रुटींपेक्षा 'विचारविकासा'च्या,'शुद्ध विचारा'च्या अभ्यासातल्या त्रुटींचाच संबंध जास्त आहे, हे लक्षात घेण्यासारखं आहे. म्हणून 'विचारविश्वा'तली एक महत्त्वाची बाजू या शुद्ध विचार करण्यासंबंधी समजून घेणं ही आहे, यात नवल नाही. त्यासंबंधी थोडक्यात व सामान्य परिचय आपण करून घेऊ. त्यातली शास्त्रीयता, परिभाषा यांचा वापर आपण मुद्दामच टाळीत आहोत.

आपल्या हे सहजच लक्षात येईल की,'आता बाहेर पाऊस पडत आहे' आणि 'आज संध्याकाळी पाऊस पडणार आहे' या दोन गोष्टींमध्ये ज्ञान म्हणून नुसताच काळाचा फरक नाही. एखादी गोष्ट समोर घडते आहे आणि एखादी गोष्ट भविष्यात - संध्याकाळी, उद्या घडेल अशा तऱ्हेचा नुसता वर्तमानकाळ किंवा भविष्यकाळ एवढाच फरक त्यात नाही, तर आपली माहिती किंवा ज्ञान म्हणूनही त्या गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

किंबहुना, पहिल्या गोष्टीपेक्षासुद्धा तसा विचार केला, तर दुसरी गोष्ट ज्ञान म्हणून अधिक महत्त्वाची आहे. कारण समोर वस्तुस्थिती असताना तिचं ज्ञान होणं, सांगणं वेगळं आणि ती घडायची असताना घडण्यापूर्वीच तिचं ज्ञान होणं, ते सांगणं वेगळं. आत्ता पाऊस पडत असेल तर मी छत्री घेऊन बाहेर पडू शकतोच, पण संध्याकाळी पडणार आहे, याचं ज्ञान जर मला असेल तर आत्ता पाऊस नसतानासुद्धा छत्रीची व्यवस्था करून बाहेर पडण्यानं मी संध्याकाळी होणारी माझी धावपळ, नुकसान, त्रास वाचवू शकेन आणि अशा ज्ञानाचं मोल अर्थातच मोठं आहे.

तीच गोष्ट व्यवहारामध्ये अनेक बाबतीत आणि सारखी सुरू असलेली आपल्या अनुभवाला येत असेल. उदाहरणार्थ, एखादे दिवशी बाबा म्हणतात की, आज संध्याकाळी आपण मेन रोडनं फिरायला जाऊ. फिरायला जाण्याचा कटाक्ष रोजचा असतो, इच्छाही असते. रोज पत्नी, मुलं फिरायला जाण्याची आठवण करून देतात. जातायेता मेन रोडवरची काही महत्त्वाची कामंही व्हायची असतात. पण त्या गर्दीला कंटाळून तो निर्णय काही अंमलात येत नसतो.

पण आज मात्र बाबा आपण होऊन सांगतात, इतकंच नव्हे, सर्व मंडळी चक्क मेन रोडवरून फिरून येतात, रस्ते निवांत असतात, गर्दीचा त्रास होत नाही,

आश्चर्य व आनंद वाटून सर्व कुटुंब परत येतं. घरी परतल्यावर कुणी सहज विचारतं, तेव्हा बाबा सांगतात की, आज टीव्हीवर अमकाअमका फार चांगला, कध्धी न लागणारा सिनेमा लागणार होता ना ! त्यामुळं मला खात्री होती, गर्दी नसणार.

अशा वेळी आज संध्याकाळी घडणाऱ्या घटनेचं सकाळीच ज्ञान होऊन, त्यामुळं त्यानुसार आपले सर्व दिवसाचे कार्यक्रम आखून त्याप्रमाणं ते अंमलात आणणं, वेगवेगळ्या गोष्टी वेळेवर पार पाडणं किंवा जास्तीत जास्त गोष्टी पार पाडणं, या गोष्टी शक्य झाल्या किंवा होत असतात. त्यामध्ये विचारांच्या शास्त्रातली एक महत्त्वाची प्रक्रिया आपण उपयोगात आणीत असतो. याची कदाचित आपल्याला कल्पना नसेल. परंतु अशी प्रक्रिया म्हणजे शुद्ध विचारांच्या शास्त्रातलं अत्यंत महत्त्वाचं स्थान असलेली 'अनुमाना'ची प्रक्रिया होय. तिलाच साध्या व परिचयाच्या भाषेत आपण 'तर्क करणं' म्हणतो. अनेकदा आपण म्हणतोही की,'मी दारावरची बेल वाजवतानाच म्हटलं की, आज तुम्ही घरी असाल - आणि माझा तर्क बरोबर ठरला - अगदी तुम्हीच दार उघडलंत.'

विचारांच्या शास्त्रात आणि अर्थातच आपल्या दैनंदिन जीवनात या तर्काचा किंवा अनुमानाचा काय वावर नि वापर होतो ते आपण पुढल्या भागात पाहू.

******

२०. अनुमानाचा वावर

तरुण मुलगा घरामध्ये असतो. नोकरी करावी की धंदाउद्योग करावा अशा तऱ्हेच्या त्याच्या भावी आयुष्यासंबंधीचा मोठा भेडसावणारा प्रश्न घरात सतत किंवा विशिष्ट प्रसंगी चर्चिला जातो. त्यातही अशी परिस्थिती असते की, मुलाला नोकरीची आवड नसते किंवा बऱ्याच प्रकारे प्रयत्न करूनसुद्धा नोकरी मिळतही नसते.

अशा वेळी तो म्हणतो की, धंदाच करावा असा माझा विचार आहे. धंदा म्हटलं की भांडवलाचा प्रश्न आला. म्हणून तो म्हणतो की, मी बँक किंवा पतसंस्था किंवा असंच कुठून खासगीतून कर्ज काढतो किंवा जर वडिलांची आर्थिक कुवत असेल तर त्यांनी भांडवलापोटी लाख दोन लाख रुपये द्यावे, अशी अपेक्षा करतो.

वडिलांचाही काही अनुभव असतो. त्यांच्या दृष्टीनं तो धंदा चालण्याची शक्यता कमी असते किंवा मुळातच धंदा करण्याविषयी ते अनुकूल नसतात. त्यापेक्षा नोकरी उशीरा लागली तरी चालेल, पण ती करणं हिताचं होईल, असं त्यांना वाटतं. शिवाय ते प्रत्यक्ष बोलून दाखवत नसले, तरी या मुलाच्या कुवतीचा त्यांना अंदाज - अनुभव असतो. त्याला धंद्याची लफडी, व्याप नि उलाढाली झेपणार नाहीत, असं त्यांना वाटतं. म्हणूनही त्यांचं मत त्यानं नोकरी करावी असं असतं. अर्थात हा 'कुवती'चा प्रश्न काढणं मुलाच्या मनाला लागण्याची शक्यता असल्यानं ते कारण तर ते देत नाहीत, पण इतर अर्थातच कमी महत्त्वाची कारणं ते पुढं करतात आणि धंद्याच्या त्याच्या योजनेला विरोध करतात.

मुलाचीही अर्थातच काही बाजू असतेच. कितीही अभ्यास-तयारी केली, तरी फार मोठ्या स्पर्धेमुळं नोकरी लागणं किती मुश्कील आहे, याचा त्यानं विचार केलेला असतो. या प्रयत्नात आपली उमेदीची महत्त्वाची अनेक वर्षं वाया जात आहेत, याची त्याला जाणीव असते. धंद्याची शक्यता त्यानं अजमावून पाहिलेली असते. त्यातल्या लोकांचे अनुभव, संभाव्य अडचणी,

संभाव्य मदतनीस, पर्यायी धंदा - अनेक बाबींचा विचार त्यानं केलेला असतो. अशा वेळी वडिलांची किंवा घरची परिस्थिती अनुकूल असताना विरोध करणं म्हणजे त्याच्या दृष्टीनं अन्याय असतो. मोठ्यांची कोती दृष्टी, धाडस न करण्याची किंवा धाडस दाखवणाऱ्यालासुद्धा पाठबळ न देण्याची भ्याडपणाची वृत्ती असते. असं सारं काही असतं.

हे 'सारं काही' अखेर समुद्रात नियंत्रण सुटलेल्या नावेसारखं कुठल्यातरी भांडणाच्या, गृहत्यागाच्या, कुणीतरी मनाविरुद्ध गोष्टी करण्याच्या कुठल्यातरी खडकावर जाऊन आदळते. त्रास, मन:स्ताप अर्थातच सर्वांनाच होतो. हा अनुभव अशा एखाद्याच बाबतीत किंवा एखाद्यालाच येतो असं नाही. मुलांची शिक्षणं असोत, लग्नकार्याचे निर्णय असोत, घरादाराची खरेदी-विक्री-निवड असो, नोकरी धरणं-सोडणं असो किंवा कुठले सामाजिक किंवा राजकीय क्षेत्रातले निर्णय-प्रसंग असोत, सगळीकडे हे अनुभव रोज येत असतात.

पण आपल्या हे क्वचितच लक्षात येत असेल की, या साऱ्यात ज्या 'तर्काचा' किंवा 'अनुमाना'चा आपण गेल्या भागात परिचय करून घेतला त्याचा केवढा वावर नकळत घडतो आहे ! कारण यातला प्रत्येक माणूस त्याच्याकडं उपलब्ध असलेल्या माहितीच्या किंवा ज्ञानाच्या आधारानं काही निष्कर्ष किंवा निर्णय काढतो आहे. धंदा कसा चालेल किंवा कितपत यशस्वी होईल, याचं ज्ञान त्याला आज थोडंच आहे ! तरीही परिस्थिती, कुवत, आर्थिक पाठबळ, खाचाखोचा - अशा ज्या अनेक घटकांचं आज त्याला जे ज्ञान उपलब्ध आहे, त्याच्या साहाय्यानं तो हा तर्क करतो आहे की, 'त्याचा धंदा यशस्वी होईल.'

विचारांचं सारं शास्त्र या 'अनुमाना'च्या किंवा 'तर्का'च्या प्रश्नाभोवती सारखं का फिरतं, याचं कारणच हे आहे की, आपल्याला जे ज्ञान होतं आहे किंवा आहे, त्या ज्ञानाचा सत्तर-ऐंशी टक्के भाग अशा या 'अनुमानानं' मिळवलेल्या ज्ञानाचा आहे. किंबहुना माणसाचा बराचसा व्यवहार या अनुमानानं मिळवलेल्या ज्ञानावर अवलंबून आहे. सगळे अनुभव स्वत:च्या आयुष्यात आणि स्वत:ला येणं ही गोष्ट तार्किकदृष्ट्यासुद्धा शक्य नाही - प्रत्यक्षात तर नाहीच नाही.

रात्री घरी परतल्यावर बटण दाबूनही लाईट लागत नाही, अशा वेळी अनुमानानंच ठरवावं लागतं की, लाईन गेली की बल्ब गेला की बटणातच काही दोष निर्माण झाला आहे की आणखी काही. अचानकपणे गावातले सर्व रस्ते दुरुस्त होऊन डांबरीकरण झालेलं दिसलं की, मग अतिमहत्त्वाच्या व्यक्तीची भेट किंवा निवडणुकीची अधिसूचना प्रत्यक्ष बघावी लागत नाही, ती अनुमानानंच कळते.

एवढं साधंसाधं ज्ञान असो की अगदी विज्ञानातल्या पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र असो वा इतिहास भूगोलातलं ज्ञान असो - ते अनुमानानंच किंवा तर्क करण्यानंच कसं मिळवलं गेलं आहे, याची कल्पना आपल्याला येऊ शकते. इतकंच काय, पोहायला अजिबात येत नसताना भरलेल्या विहिरीत उडी टाकली, तर काय होईल किंवा हे जहाल कीटकनाशक चुकून किंवा मुद्दाम प्यालं, तर काय होईल - अशा एखाद्या व्यक्तिगतदृष्ट्या गंभीर प्रश्नाच्या उत्तराचं ज्ञान प्रत्यक्ष घेण्याची गरज नाही, कुणी घेतही नाही, अनुमानानंच ते कळतं आणि पुरेसंही असतं.

अशा या सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनाचा प्रचंड भाग व्यापणाऱ्या अनुमानाचा किंवा विचारशास्त्राचा अधिक परिचय करून घेण्याची केवढी गरज आपल्या सर्वांना आहे - कारण या एकाच प्रक्रियेनं येणारा मुलाचा निष्कर्ष 'मुलाचा धंदा यशस्वी होईल' तर 'मुलाचा धंदा अयशस्वी होईल' असा वडिलांचा निष्कर्ष हे परस्परविरोधी आहेत - आणि अर्थातच त्यामुळं तणाव - संघर्ष निर्माण करणारे आहेत !

त्यामुळं या अनुमानाच्या शास्त्राचा अधिक विचार करणं गरजेचं आहे, ते काम आपण पुढील प्रकरणात करू या.

******

२१. निष्कर्षापूर्वी

गेल्या भागात आपण असं पाहिलं की, अनुमानानं आपलं सारं विश्व कसं व्यापलं आहे आणि त्यामुळंच आपल्याला त्या अनुमानाच्या शास्त्राचा निदान थोडाफार परिचय करून घेण्याची कशी आत्यंतिक गरज आहे. विचारांच्या आपल्या विश्वामध्येसुद्धा सुसूत्रता, सुसंबद्धता आणण्यासाठी अशा तऱ्हेच्या परिचयाची गरज आहे. त्याचबरोबर अशा परिचयामुळे वैचारिक गोंधळ टळणं, कुठल्याही विरोधी वाटणाऱ्या, आपल्याला न रुचणाऱ्या, न मानवणाऱ्या निष्कर्षानं विचलित होणं - अशा अनेक गोष्टीही टळतात.

तर्क करताना आपण काही गोष्टी गृहीत धरतो, आधाराला घेतो. त्यावरून पुढं काही निष्कर्ष काढतो. हे काम आपण बरोबर करतो की नाही हे पाहाणारी यंत्रणा म्हणजेच हे विचारासंबंधीचं शास्त्र आहे. या शास्त्रानं अशा तऱ्हेच्या तर्क करण्याचे दोन भाग पाडलेले आहेत आणि त्या दोन्ही भागांचा उपयोग आपण रोज करीत असतो.

उदाहरणार्थ, 'राजकारण हे सरळ माणसाचं काम नाही', 'कॉम्प्युटरमुळं बेकारी वाढणार', अशा स्वरूपाचे निष्कर्ष आपण काढतो, तेव्हा काही वस्तुस्थितीचं आपण निरीक्षण करीत असतो. राजकारणातली अनेक माणसं, त्यातले प्रसंग, त्यात सरळमार्गी माणसांची ससेहोलपट तर छक्केपंजे करणाऱ्या माणसांची चलती - अशा अनेक गोष्टींचं निरीक्षण केल्यावर आपण असा एक सामान्य निष्कर्ष काढतो.

संगणकाच्या बाबतीतसुद्धा असे अनेक संगणक आपण पाहातो. त्याची कामाची पद्धत, उरक पाहातो. एका ठिकाणी दहा माणसं एखादं काम करीत असतील आणि तिथं एक संगणक बसवला तर तो चालवणारा एक माणूस सोडला तर उरलेल्या नऊ लोकांना कामावरून कसं काढून टाकण्यात आलं, अशा काही घटना आपण पाहिलेल्या असतात आणि त्यानंतर आपली अशी प्रतिक्रिया, मत किंवा निष्कर्ष होतो की, 'कॉम्प्युटरमुळं बेकारी वाढणार'. हा निष्कर्ष काढण्याचा एक प्रकार झाला.

तार्किकदृष्ट्या यासाठी, म्हणजे असा निष्कर्ष बरोबर ठरवण्यासाठी, निरीक्षण करणं आणि असे निष्कर्ष काढण्यासाठी ज्या शास्त्रीय पद्धती आहेत, त्यांचं पालन करणं हे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या चारपाच मान्य पद्धती आहेत. तरीही एखादी पद्धत किंवा तिचा वापर का आणि कसा करतात नि तिचा वापर कसा आवश्यक असतो ते पाहाता येईल.

आपण जसा कॉम्प्युटरबद्दल, बेकारीबद्दल निष्कर्ष काढला, तसे निष्कर्ष आपण अनेक गोष्टींबद्दल काढीत असतो. जसं 'भारतात कॉम्प्युटरमुळं बेकारी वाढते आहे' असं आपण ठरवलं, तर ते ठरवताना अनेक गोष्टी विचारात घेण्याची गरज आहे. त्यांतली सर्वांत महत्त्वाची म्हणजे कॉम्प्युटर येणं आणि भारतात प्रचंड बेकारी निर्माण होणं या दोन्ही गोष्टींतला संबंध. बेकारीचं कारण संगणक ठरण्यासाठी त्यापूर्वी - म्हणजे संगणक येण्यापूर्वी - देशात बेकारी नसणं आवश्यक आहे किंवा निदान तिचं प्रमाण नगण्य असणं आणि संगणक आल्यावर ते प्रमाण लक्षणीय वाढणं आवश्यक आहे. बेकारी वाढण्याचं तेच एक कारण आहे का, की नेमका संगणक यायच्याच काळात इतरही अनेक घटना घडल्या आणि त्यातली कुठली घटना याला कारण आहे, हेही बघणं आवश्यक असतं.

'प्रवासात एस्टी बंद पडणं' या एकाच घटनेच्या आधी अनेक गोष्टी घडलेल्या असू शकतात. याचा अर्थ, त्या सर्वच एस्टी बंद पडण्याचं कारण असतील, असं नाही. त्याआधी गाडी मोठ्या खड्ड्यातून गेलेली असेल, गिअर-ब्रेक वगैरेच्या वापरात चूक झाली असेल, डिझेल संपलं असेल, यंत्रणेत बिघाड झाला असेल, ड्रायव्हरचं कुणाशी कडाक्याचं भांडण झालं असेल, संघटनेनं विशिष्ट वेळी संप सुरू करण्याचा आदेश दिलेली वेळ झाली असेल - अशाच काय, पण त्याच दिवशी गाडी चालवायला बसताना ड्रायव्हरनं गाडीला नमस्कार केला नसेल, मांजर आडवं गेलं असेल, असल्या स्वरूपाच्या गोष्टीसुद्धा घडलेल्या असू शकतील.

त्यांतली नक्की कुठली गोष्ट या घटनेचं कारण - पुरेसं, योग्य कारण - आहे, हे न पाहाताच जर आपण निष्कर्ष मांडण्याची गडबड केली किंवा सवय ठेवली, तर वस्तुस्थितीचा विपर्यास होतो, विनाकारण दोषारोप होऊ शकतात किंवा समज-गैरसमजही होऊ शकतात.

उदाहरणार्थ, ज्या अर्थी गाडी बंद पडली त्या अर्थी त्यातलं डिझेल संपलं असलं पाहिजे, कारण डिझेल संपल्यानं गाड्या बंद पडतात - एवढ्याशा आधारावर किंवा निष्कर्षावर जर आपण जाऊ तर ड्रायव्हरला गाडी काढताना बघता येत नव्हतं का, इथंपासून सर्वांचा उद्धार करीपर्यंत कितीतरी ताशेरे मारण्यात पुढच्या मोठ्या संघर्षाला नि भांडणाला आमंत्रण तर आहेच, पण त्यातून आपला बेजबाबदारपणा आणि विचारशास्त्राचं अज्ञानही प्रकट होत असतं, हे आपण विसरून उपयोगाचं नाही, नाही का ?

भारतातल्या बेकारीचं खापर कॉम्प्युटरवर फोडण्यापूर्वी नक्की त्या बेकारीचं ते एकच कारण असल्याची खात्री करणं अत्यावश्यक आहे. इतर कारणं - मग ती वाढती लोकसंख्या असो, मंदीमुळं बंद होणारे इतर उद्योग असोत, इतर नोकरीविषयक धोरणं असोत - ही किंवा इतर कोणतीही कारणं पाहिल्याशिवाय हा निष्कर्ष काढणं धाडसाचं आहे. अशा तऱ्हेचे निष्कर्ष काढण्यापूर्वी त्या दोन गोष्टी नुसत्याच मागेपुढे घडतात, एवढंच पुरेसं न मानता त्यात काही कार्यकारण संबंध आहे का, हे पाहाणंही गरजेचं असतं. नाहीतर गाडी बंद पडण्यापूर्वी गाडीतली दोन माणसं एकमेकांत भांडत होती हेही गाडी बंद पडण्याचं कारण धरलं जायचं !

अशा तऱ्हेनं काही निष्कर्ष काढण्यापूर्वी घटनांमधला संबंध पाहाणं, इतर कोणती कारणं नाहीत ना हे पाहाणं - अशा शास्त्रीय पद्धतींचा अवलंब गरजेचा आहे. निष्कर्षांचा जो दुसरा प्रकार आपण नेहमी वापरतो, त्याचा परिचय पुढल्या भागात करून घेऊ या.

******

२२. निष्कर्षानंतर

अनुमान करून काही निष्कर्ष काढण्याचा एक प्रकार आणि त्यांतले खाचखळगे आणि दैनंदिन जीवनावर त्याचे परिणाम आपण गेल्या प्रकरणात पाहिले. या भागात आपण असे निष्कर्ष काढण्याचा दुसरा प्रसिद्ध प्रकार पाहू या. तो म्हणजे सामान्य नियम गृहीत धरायचा आणि विशिष्ट माणसाला व परिस्थितीला तो लावून त्याबद्दल निष्कर्ष काढायचा. या प्रकाराचा आपल्या विचारविश्वातला व अर्थातच आपल्या दैनंदिन जीवनातला वावर पाहू या.

बरेच दिवसांनी एक मित्र गावाहून भेटीसाठी आले. त्यांच्या गप्पाटप्पा झाल्यावर त्यांना घेऊन फिरत फिरत गावातल्या एका मित्राकडं गेलो. तिथं ओळखपाळख करून दिली. चहापाणी झालं. गप्पा बऱ्याच रंगल्या. पुन्हा एकदा चहाचा राऊंड झाला. बाहेर पडलो. घरी आल्यावर हे परगावचे मित्र जरा त्रासलेले वाटले. म्हणून विचारलं. ते म्हणाले,'हे तुमचे मित्र फार व्यसनी वाटतात. इतका व्यसनीपणा चांगला नाही.' मला काही उलगडेना. स्पष्ट विचारल्यावर ते म्हणाले,'एक-दोन तासात दोनदा चहा ! शिव शिव ! म्हणजे दिवसांत वीसेक कप !' आता त्यांनी या गावातल्या मित्राचं तोंडसुद्धा न बघण्याचा निर्णय एव्हाना घेऊन टाकला होता !

यामागं वैचारिकदृष्ट्या अनुमानाचा एक प्रकार त्यांनी वापरला होता. 'चहा हे व्यसन आहे. हे मित्र चहा घेतात. म्हणून ते व्यसनी आहेत.' इतक्या साध्या पद्धतीनं ते त्यांना 'व्यसनी' ठरवून मोकळे झाले होते. तासाला एक यावरून वीसेक कप वगैरे अनुमान क्षणभर सोडून देऊ. मला ते ऐकल्यावर क्षणभर गंमत वाटली. मागं एकदा एक दुसरे मित्र आले होते. यांच्याचकडं जाऊन आल्यावर त्यांच्या सहज बोलण्यात आलं,'तो माणूस, म्हणजे तुमचा मित्र, मात्र अगदी निर्व्यसनी वाटतो. सुपारीच्या खांडाचं व्यसन नाही.' त्यांनीही एक प्रकार - फॉर्म्युला वापरला होता. तेव्हाही मी त्यांना सुचवलं होतं,'पण ते चहा घेतात.' त्यावर त्यांनी ते झटकून टाकलं होतं. जणू काही 'चहा घेणं निर्व्यसनीपणाचंच लक्षण आहे.' हे मित्र चहा घेतात, अर्थात ते निर्व्यसनी आहेत ! अशा फॉर्म्युल्यानं किंवा साच्यानं ते

निष्कर्ष काढून मोकळे झाले होते.

यात दोन्ही ठिकाणी मुळात आधाराला काही वाक्य - निष्कर्ष गृहीत धरला आहे. त्याप्रमाणं वस्तुस्थितीला तो लावून काही नवा विचार, नवं ज्ञान मिळवलं आहे. हा वापर आपण व्यवहारात नेहमीच करीत असतो. अशी अनेक वाक्यं आपण ऐकली असतील -'माणूस म्हटल्यावर त्याला काळजी लागायचीच, प्रपंच म्हणजे भांड्याला भांडं लागायचंच' - वगैरे आणि याच्या साहाय्यानं आपण अशीही वाक्यं नेहमी ऐकली असतील,'श्रीकांतरावांना काळजी लागायचीच, केदार नि मनालीचं कडाक्याचं भांडण झालं, असं व्हायचंच !'

आपण विचार करण्यासारखा प्रश्न कुठं आहे ? तो इथं आहे की, एका माणसाच्या दृष्टीनं गावातला तोच मित्र 'व्यसनी' आहे, तर दुसऱ्या मित्राच्या दृष्टीनं तोच मित्र 'निर्व्यसनी' आहे. हे निष्कर्ष परस्परविरोधी तर आहेतच, पण माझ्या किंवा इतरांच्या आणि त्या मित्राच्या जीवनावर, आमच्या संबंधांवर ते निष्कर्ष भलाबुरा परिणाम घडवणार आहेत. कदाचित ते आमचे संबंध बिघडवायला किंवा दुरावायला कारणीभूत होतील किंवा ते घनिष्ठ व्हायलाही कारणीभूत होतील.

अशा वेळी मला निदान हे सारं कशातून घडतं हे तरी माहिती असणं आवश्यक नाही का ? कारण मूळ विधानच जर शंकास्पद असलं, तर पुढचा निष्कर्ष चुकीचा निघणं यात विचारशास्त्राचा दोष नसला, तरी असं अपुरं आधारविधान घेणाऱ्याचाच दोष,त्रुटी,अपरिपक्वता,अननुभवीपणा असं काही कारण आहे. याची कल्पना आली, तर आपलं विचारविश्व व्यापक तर होतंच, पण दोन्ही विरोधी निष्कर्ष काढणाऱ्या मित्रांनाही त्यात जागा राहाते. इतकंच नव्हे, ज्याच्याबद्दल निष्कर्ष काढला जातो आहे, त्यालाही त्यात स्थान राहातं.

या दृष्टीनं आपल्याला विचारशास्त्राच्या जुजबी अशा परिचयानं एक लक्षात येईल की,'माणूस म्हटल्यावर त्याला काळजी लागायचीच' या आधारविधानाबद्दल शंका घेण्याची गरज असते. 'श्रीकांतराव माणूस आहेत, म्हणून श्रीकांतरावांना काळजी लागायचीच' या पुढं जाणाऱ्या गाडीच्या दुव्यात जर चूक नसेल, तर हा निष्कर्ष बरोबरच वाटेल. अशा वेळी श्रीकांतरावांची काळजी करण्याची खरी गरज नसून आधी म्हटल्याप्रमाणं आधारविधान

वस्तुस्थितीला धरून आहे का, हेही तपासणं आवश्यक असतं. चिंतामुक्त किंवा काळजीविरहित जीवन जगून दाखवणारीही अनेक माणसं असतात.

तद्वतच प्रपंच म्हणजे त्यात भांडण, कलह, वाद, मतभेद असल्या गोष्टी असल्याच पाहिजेत, असं गृहीत धरण्यापूर्वी अत्यंत समंजसपणे, एकमेकांना-एकमेकांच्या मतांना, वयाला,अनुभवाला आदर देऊन कोणताही वाद न करता, उलट अत्यंत खेळीमेळीनं, एकोप्यानं, एकमेकांवर नि:स्वार्थी प्रेम करीत संसार करून दाखवणाऱ्या अनेक प्रापंचिकांचा, त्यांच्या अनुभवांचा आपण समाधानकारकपणे विचार या विधानात करू शकतो का ? नसेल तर उगीचच कुण्या केदार नि मनालीचं भांडण कायदेशीर नि बरोबर ठरवणं धाडसाचं ठरेल, नाही का ?

तरी यात एवढं नक्की की, आपलं विचारांचं विश्व इतकं विशाल आहे की, त्यात व्यवस्था लावण्याची मोठीच गरज आहे. नाहीतर स्वार्थी, संधिसाधू, आपमतलबी, घातक, फसवे असे विचार कधी त्यात शिरून गोंधळ घालतील, पर्यायानं आपल्या व्यक्तिमत्त्वावर, अर्थात आपल्या संबंधावर तसंच आपल्या भोवतालच्या समाजावर कसा विघातक नि विघटनात्मक परिणम घडवतील, हे सांगता येणार नाही. यासाठी थोडाफार तरी विचारशास्त्राचा परिचय, अभ्यास आवश्यक आहे.

त्याचबरोबर आपल्या हेही लक्षात येतं की, या साऱ्या विचारांच्या भ्रमणाची, शास्त्राचीसुद्धा एक मर्यादा आहे. माणसाच्या व्यवहाराची, मानसिक आंदोलनांची, प्रतिभेची, भावविश्वाची, द्रष्टेपणाची, अतींद्रियानुभवांची, अज्ञाताकडं झेपावण्याची - अनेक गोष्टींची व्याप्ती इतकी मोठी आणि महत्त्वाची आहे की, तिथं अनेकदा हे विचारशास्त्र- विचारशक्ती पोचणं, तिनं ते पकडणं, गवसणंही कठीण जातं.

विचारविश्वाची तसंच त्या पलीकडच्या या विश्वाची सांगड कशी घालायची, मेळ कसा घालायचा, हे आपण पुढल्या भेटीत पंचविसाच्या प्रकरणात पाहू. तत्पूर्वी व या छोट्याशा विचारविश्वाच्या परिचयाचा समारोप करण्यापूर्वी 'विचारां'च्या संदर्भातले दोन महत्त्वाचे मुद्दे - वेगळा विचार व बघेपणाचा धोका - आपण या पुढील प्रकरणात पाहू या.

******

२३. 'वेगळ्या' विचाराचा चकवा

सर्वसाधारणपणे प्रत्येक माणूस महत्त्वाकांक्षी असतो. कुठल्या ना कुठल्या प्रकारे, काही ना काही बाबतीत आपण कुटुंबात म्हणा, समाजात म्हणा 'महत्त्वाचं' असावं, असं त्याला स्वाभाविकपणे वाटतं. त्या दिशेनं त्याची धडपड सतत सुरू असते. ती करताना त्याच्या हेही लक्षात येतं की, हे महत्त्व मिळायचं असेल तर काही 'वेगळं' करण्याची गरज आहे.

अर्थात तो माणूस कशाला महत्त्वाचं समजतो, यावरही या साऱ्या प्रयत्नांची दिशा नि प्रकार अवलंबून आहेत. त्याला 'पैसा' महत्त्वाचा वाटत असेल आणि त्या दृष्टीनं आपण महत्त्वाचं ठरावं, बनावं असं वाटत असेल, तर मग तो मिळवण्याचे त्याचे प्रयत्न राहतात. एखाद्याला 'प्रतिष्ठा' महत्त्वाची वाटत असली, तर मग पैसा किंवा इतर गोष्टींपेक्षा तो 'प्रतिष्ठा' ज्यानं मिळेल, ती गोष्ट करण्याच्या प्रयत्नात राहील.

एखाद्या समाजात सर्वांकडंच भरपूर पैसा असेल, सर्वच श्रीमंत असतील आणि सर्व पैसा समाजाला देऊन टाकून 'निष्कांचन' होणं त्या समाजात 'प्रतिष्ठे'चं असेल, तर असा माणूस जवळचा पैसा देऊन टाकण्याचा प्रयत्न करील. काही काही काळी समाज बराचसा निष्क्रिय असला, आळशीपणानं खूप मागासलेला झाला असला, तर अशा काळी 'सतत कार्यरत राहाणाऱ्यां'चं महत्त्व मोठंच वाढतं. अशा वेळी असा 'महत्त्व' इच्छिणारा माणूस 'सतत कार्यशील अन् कर्मयोगी' बनण्याचा प्रयत्न करताना आढळेल.

याचबरोबर हेही पाहून आपल्याला आश्चर्य वाटेल की, जर खूपच उद्योगी लोकांचा समाज असेल, तर शक्यतो कोणतं कर्म न करता म्हणा किंवा साध्या अर्थानं 'कर्मसंन्यास' घेणाऱ्या माणसाचं म्हणा, मोठं महत्त्व तिथं निर्माण होईल. अशा वेळी 'सतत कर्म करण्याच्या प्रयत्नात' असलेला माणूस आता अशा समाजात 'शक्यतो कोणतं कर्म न करता' राहाण्याचा प्रयत्न करताना दिसेल. अशा वरवर विरोधी वाटणाऱ्या वागण्यामागं मात्र ही 'महत्त्वाकांक्षे'ची प्रेरणा 'सारखीच' असते. त्यामुळंच वेगवेगळ्या समाजात,

वेगवेगळ्या काळी अशा वेगवेगळ्या दिशा-प्रयत्न चाललेले आपल्याला दिसतात.

पण आणखी थोडासा विचार केला, तर या साऱ्या 'महत्त्वाकांक्षे'च्या प्रकरणाची एक खरीच मूलभूत व महत्त्वाची बाजू आपल्या लक्षात येईल. या साऱ्या माणसांच्या कृती वेगवेगळ्या दिसतात. कुणी पैसा जास्तीत जास्त साठवायचा प्रयत्न करतो आहे, कुणी लोकांनी मान द्यावा म्हणून धडपडतो आहे, कुणी तोच मान कुणी आपल्याला देऊ नये म्हणून धडपडतो आहे - या साऱ्या कृतींमागं जर खरंच काही असेल, तर ते म्हणजे त्या त्या माणसांनी घेतलेला निर्णय आणि त्याहीमागं काही असेल, तर त्या त्या माणसांनी केलेला विचार.

जी गोष्ट सर्वांच्याकडं असते, भरपूर असते ती अर्थातच कमी महत्त्वाची ठरते. जी इतरांकडं नाही, कमी प्रमाणात आहे ती अर्थातच महत्त्वाची ठरते. म्हणून ती आपण मिळवली तर आपलं महत्त्व साहजिकच वाढेल, असा एक सुप्त व नकळत घडणारा विचार त्यामागं असतो, हे आपल्या क्वचितच लक्षात येतं. हा एक साचा आहे. त्यामुळं यात तुम्ही कोणतीही गोष्ट टाकली की, त्यानुसार मूर्ती बाहेर येईल. या साऱ्या वेगवेगळ्या कृतींच्या मागच्या आपल्या साच्याचा विचार आपल्याला करण्याची खरी गरज नाही का ?

याचं कारण असं की, माणसाच्या या 'महत्त्व' मिळण्याच्या असो किंवा अन्य कोणत्याही असो - त्याच्या कृतीमागं असलेला त्याचा विचार हा महत्त्वाचा असतो. कारण त्या त्या विचारानुसार ती ती कृती माणूस करतो. कुरुक्षेत्रात युद्ध न करण्याचं ठरवणारा नि हातातलं शस्त्र टाकून देणारा अर्जुन हे विचार व त्यानुसार कृती याचं एक प्रातिनिधिक उदाहरणच आहे. ते कसं ते आपण पाहू.

एरवी अपराजित असणारा, युद्धनिपुण असणारा, कित्येक वर्षं याच युद्धाची प्रतीक्षा करणारा आणि ते युद्ध करण्यासाठीच कुरुक्षेत्रावर आलेला अर्जुन ! त्याच्या हातून शस्त्रच टाकून देण्याची अविश्वसनीय कृती घडते, याला त्याचा 'विचार' बदलला होता, एवढंच उत्तर आहे. ते बदलल्यामुळं त्याची ही कृती घडली. म्हणूनच पुन्हा एकदा इतर कुठला मार्ग न अवलंबता त्याचा हा 'बदललेला, पण अयोग्य विचार' 'पुन्हा बदलण्याचं' काम श्रीकृष्णानं केलं

आणि साहजिकच अर्जुनाची कृती बदलली. तो पुन्हा युद्धाला सज्ज झाला, हे आपण जाणतोच. त्यामुळंच या साऱ्या महत्त्व मिळवण्याच्या कृतींमागचा जो विचाराचा साचा आहे, तो लक्षात येणं गरजेचं आहे.

याला कारण आहे. इतक्या नाना प्रकारच्या कसरती - कसरतीच म्हणू आपण - कारण कधी पैसा देणं, कधी न देणं, कधी विद्या मिळवणं, कधी ती विसरणं अशा उलटसुलट कृती या 'महत्त्व' संपादनासाठी माणूस करतो आहे. ज्या अर्थी या साऱ्या कसरती करूनही माणसाला अपेक्षित महत्त्व मिळताना आणि तो त्यामुळं सुखी होताना दिसत नाही, त्याअर्थी वर सांगितलेल्या ढाच्यातच काही चूक असावी. ती सापडली, तर अर्थातच यावर प्रकाश पडेल. ती कोणती असावी ?

ती ही असू शकेल की, महत्त्व मिळवण्यासाठीचा जो वर सांगितलेला वैचारिक साचा आहे, तो सर्वच जण वापरणार आहेत, तो सर्वांकडंच आहे. हे आपल्या कधी लक्षात येत नाही !'काहीतरी वेगळं करण्या'चा विचार प्रत्येकानंच केला, तर तो विचारच मुळात एक व सर्वत्र असल्यानं 'वेगळा' ठरणार नाही आणि त्यावर आधारलेली कृती मग कायम वेगळी ठरणारी व त्यामुळं महत्त्वाची ठरणारी कशी घडणार ?

म्हणूनच क्षणभर विचार चमकून जाईल की, जगातल्या खऱ्या मोठ्या नि महत्त्वाच्या माणसांनी या साच्याला धरून कधी विचार केला नाही, 'वेगळं' करायचं म्हणून काही केलं नाही आणि म्हणूनच ते खरंच वेगळं नि त्यामुळं खरंच महत्त्वाचं असं काही करू शकले, असं तर नसेल ?

******

२४. बघेपणाचा धोका

आजचं आपलं जग तसं बरंचसं कुठल्या ना कुठल्या ढोबळ मनोरंजनावर जगणारं झालं आहे. घराघरात नि खोलीखोलीत शिरलेल्या, पसरलेल्या टीव्हीच्या व्यापक जाळ्यानं साऱ्या जगातली करमणूक आणि ज्ञान सारं घरात आणून अक्षरशः ओतलं आहे, हे कुणी अमान्य करेल असं वाटत नाही.

ते असू द्या. फक्त त्याचा एक परिणाम आपण नेहमी अनुभवीत असतो, तो म्हणजे 'बघे'पणाचा नि 'रंजना'चा संस्कार. पूर्वीचा माणूस कधी कुस्त्यांचं मैदान किंवा वेळी तमाशाच्या फडावर जातच नव्हता, असं नाही, पण त्याचबरोबर त्याची रोज संध्याकाळी तालमीतली चक्कर नि नदीवरचं पोहणं चुकत नव्हतं, हेही खरं. नाटक, तमाशा, कीर्तन कधी वर्ष - सहामाहीनं येत असेलच, पण त्याचबरोबर त्याचं स्वतःचं पाठांतर, नेहमीचं पठण, दोहा,अभंग गाणं हे नित्याचं होतं.

पण आज परिस्थिती वेगळी दिसते आहे. बॅट घेऊन ग्राऊंडवर खेळायला जाणारी किंवा जिमखान्यावर एखादी फूटबॉल-व्हॉलिबॉलची मॅच खेळायला जाणारी मुलं आज दिसत नाहीत, असं नाही, पण जर टीव्हीवर सलग दहा नाही पंधरा दिवस जरी थेट प्रक्षेपण होत असेल तर, बॅट घेऊन उन्हात घाम गाळण्यापेक्षा घरातच चहा, कॉफी घेत, खात पीत तासन्तास नुसतेच इतरांचे पराक्रम किंवा पराभव पाहात राहणं आज अधिक सोयीचं वाटत आहे, सहज केलं जात आहे. स्वतः त्या खेळाच्या प्रेमापोटी, आवडीपोटी तो शिकण्यासाठी घाम गाळण्यापेक्षा कुणीतरी जिवापाड प्रयत्न केलेले पाहात बसणं त्याला अधिक पसंत पडतं आहे. यात 'बघे'पणाच्या तासन्तासाच्या तपःश्चर्येव्यतिरिक्त आपलं कर्तृत्व खुंटतं आहे, स्वास्थ्य घटतं आहे, मानवी पराक्रमशक्ती शून्य होते आहे, याकडं दुर्लक्ष होतं आहे की काय, असं वाटतं.

याचाच एक परिणाम 'विचारांच्या विश्वा'शीही संबंधित आहे. शक्यतो सारा रेडिमेडचा नि इंस्टंटचा जमाना झाल्यानं, मग तो खेळ असो, स्वयंपाक असो, ऑफिसचं काम असो - कशाहीबद्दलचा विचार करायचा तापही कुणाला स्वतःला नकोसा वाटतो आहे, नाही का ? कारण विषय कुठलाही असला तरी त्यात विचार

अपरिहार्य आहे. तो स्वतंत्रपणे करण्याची गरजही खरं म्हणजे आहेच, पण आजच्या या 'बघे'पणाच्या युगात 'विचार'ही कसे तयार मिळतील, याकडं लक्ष असल्याचं दिसेल.

म्हणून विद्यार्थ्याच्या दृष्टीनंसुद्धा एखादा धडा तुम्ही अगदी बारकाईनं शिकवलात, समजावून दिलात आणि प्रश्न समोर टाकला की, त्यावर त्यानं विचार करावा, अशी आपली अपेक्षा असते. पण विद्यार्थ्याचा बहुतांश कल त्याचं उत्तर धड्यात, मार्गदर्शक पुस्तकात, एखाद्या नोट्समध्ये 'बघायला' मिळेल का, याकडं असलेला दिसेल.

आता या प्रश्नाच्या अनुषंगानं विचार करून उत्तर शोधण्यात 'विचार करण्या'चे कष्ट आहेत, हे खरं. पण त्याचा परिणाम म्हणून आपलं परिस्थितीचं, धड्याचं - त्यातल्या विषयाचं स्वत:चं आकलन पक्कं होण्यात आहे आणि अंतिमत: ते आपल्याच फायद्याचं आहे, हे विसरलं जातं. यात याचबरोबर आपल्याला असलेली विचाराच्या शक्तीची मोठी अलौकिक देणगीही सतत वापरली जाण्यानं तंदुरुस्त नि बलवान राहाते. हा दूरगामी फायदासुद्धा दुर्लक्षित होतो. सूर्यनमस्कार घालताना किंवा असाच काही व्यायाम करताना वरकरणी शारीरिक हालचालींचा त्रास वाटला, तरी त्यातून सर्व स्नायूंना मिळणाऱ्या सरावानं ते सारं शरीरच कार्यक्षम नि निरोगी राहायला मोठी मदत व्हावी, तसं हे आहे.

पण या 'बघे'पणाच्या व्यसनापोटी विचारशक्ती निष्प्रभ होण्याचा मोठा धोका समोर दिसतो. वास्तविक पाहाता, माणूस आणि निसर्गातले इतर प्राणी यांच्यात हाडं, स्नायू, इंद्रियं, रक्त, रोग अशा अनेक बाबतीत फार मोठं साम्य आढळून येतं. तरीही माणसाचं निदान इतर सजीव-निर्जीव सृष्टीवर जे निर्विवाद आधिपत्य आहे, त्यामागं त्याला त्या प्राण्यांपेक्षा दुबळं नि लहान शरीर लाभूनसुद्धा त्याला इतर प्राण्यांपेक्षा मोठा नि विकसित मेंदू लाभल्यानं झालेला फरक कारणीभूत आहे.

अर्थातच, नुसताच असा एखादा भाग शरीरात आहे, म्हणून माणूस त्यांच्यापेक्षा वेगळा नाही, वरचढ ठरलेला नाही, हे उघड आहे. जसं मेंदूत असलेलं भाषाकेंद्र. ते नुसतंच असल्यानं माणूस वरचढ ठरलेला नाही, ठरणारही नाही. त्या

केंद्राचा वापर करून माणूस जेव्हा शब्द-भाषा यांचा उपयोग करतो, त्यांच्या साहाय्यानं ज्ञान संपादन करतो, ते ग्रथित करतो, तेव्हा मात्र तो पशूंच्या फार पुढं कुठंतरी निघून जातो.

त्याच्या वेगळेपणात महत्त्वाची असलेली त्याची ही 'विचारशक्ती' होय. ती तर माणूस म्हणून जन्माला आलेल्या सर्वांमध्ये विद्यमान आहेच. पण एवढ्यानं आपण थोडेच वेगळे ठरणार आहोत ? या विचारांच्या शक्तीचा नि विश्वाचा परिचय करून घेऊन त्यांचा विकास साधून, ती शक्ती अधिकाधिक जागृत ठेवून मात्र आपलं माणूसपण किंवा वेगळेपण सिद्ध करण्याचं आव्हान आपल्याला आहे, आपल्याला तसं पाहिलं तर ती संधीही आहे.

एवढं मोठं जाऊ द्यात. आपण आपल्या नेहमीच्या आयुष्यात हे उद्‌गार अनेकदा ऐकले असतील ना, 'वेळीच विचार केला असता तर ही वेळ आली नसती, माणसानं जराही विचार करायचा नाही म्हटलं म्हणजे असं घडणारच, वेडेवाकडे विचार आले म्हणजे असं व्हायचंच' इ. इ. या साऱ्या गोष्टी, संवाद काय दर्शवतात ? विचारशक्तीच्या बाबतीतसुद्धा आपण 'बघे'पणा दाखवला, तर स्वत:च्याच नुकसानीशिवाय हाती दुसरं काय पडणार, हेच नव्हे का?

******

२५. विचारविश्वापलीकडं

विचारांच्या विशाल विश्वाचा परिचय करून घेताना आपण गेल्या भागात विचारशास्त्राची काही बाबतीत ओळख करून घेतली. त्याचबरोबर अखेरीस आपण या एका विचारापर्यंत आलो की, हे विचारांचं विशाल विश्व जगातल्या प्रत्येक माणसाबरोबर असलेलं दिसतं. ते त्याचं स्वत:चं म्हणून आहे, स्वतंत्र आहे. तरीही त्यात कित्येक साम्यं आहेत, समान सूत्रं आहेत. जगातल्या असंख्य विषयांना हे विचार स्पर्श करतात. कोणताही विषय, ताणतणाव ते उभा करू शकतात. त्याचबरोबर एखादा तणाव ते त्यांच्या उपस्थितीमुळं नाहीसाही करू शकतात.

त्यामुळंच क्षणभर असंही वाटतं की, या विचारांची व्याप्ती, क्षमता, झेप अमर्याद आहे. इतकंच काय, माणसाच्या जीवनाचा असा कुठला कानाकोपरा नसेल की, ज्याला विचार आपल्या कवेत घेऊ शकत नसेल. किंबहुना एका दृष्टीनं असंही वाटतं की, या विचारावाचून माणसाचं चालणारच नाही. विचार मानवी जीवनात प्रत्येक घटनेत अपरिहार्य आहे. आपण गेल्या एका भागात याच मुद्याचा खरेपणा तपासून बघायचं ठरवलं होतं.

आपण आपल्या दैनंदिन आयुष्यातले काही प्रसंग किंवा घटनाचक्रं घेऊ. एक साधंसं चित्र घ्या. जत्रेत किंवा प्रचंड रहदारीच्या चौकात हरवलेलं मूल.. सारं अपरिचित जग भोवताली दिसतं. सारी मोठी मोठी अपरिचित माणसं, क्षणोक्षणी भीती वाढवणारी आजूबाजूची रहदारी नि गोंगाट, आपली चिरपरिचित आई, तिला त्या साऱ्या भयप्रद गोंगाटातून शोधण्याची व्यर्थ धडपड, खचत चाललेला धीर, इवल्याशा दोन पायांतली ताकत संपत चाललेली, हे परक्या क्रूर माणसांचं जग आपल्याला मारणार, आपलं काय होणार - आतून रडू येतं, बाहेरून तर रडं आधीच सुरू असतं.

तिकडं ते एकुलतं एक लेकरू त्या साऱ्या धावपळीत असलेल्या अथांग जनसमुदायात हरवून गेल्यानं आईच्या जिवाची होणारी तगमग, शोधाशोधीचे अयशस्वी प्रयत्न, गर्दीतल्या कुणा माणसाला मदतच काय, सहानुभूती दाखवायला किंवा निदान काय झालंय हे विचारायलासुद्धा फुरसत नाही, हा कोरडेपणा नि

निर्दयता पाहून गर्दीत आकांत करीत सैरावैरा पळणाऱ्या आईचं पायातलं संपत चाललेलं त्राण... आणि एका विलक्षण थकव्याच्या क्षणी पायाला अडखळल्यानं, पाहाताक्षणी त्या गर्दीत हेलपटणारं तिचं लेकरू डोळे मिटून उभं ! क्षणात त्याला जवळ घेताच त्या बाळानं डोळे उघडून पाहावं तर, आपल्या आईच्याच कुशीत आपण आहोत ! दोघांनीही रडतरडत, पण हसतहसतही अविश्वासानं एकमेकांकडं पाहावं. या क्षणी एकमेकांना काय होतं आहे, हे क्षणार्धात एकमेकांना कळतं, साधन म्हणून कुठलाही विचार वापरला जात नाही, त्याची गरजही नाही.

तशीच दोन प्रेमिकांची अवस्था. एकमेकांकडं नुसत्या डोळ्यांनी पाहण्यात एकमेकांचं सारं विश्व एकमेकांना पुरं समजून जातं. ना शब्द ना विचार ! याही चित्रांत हे आढळतं.

असंही चित्र कधी कधी आपण अनुभवलं असेल की, नवी नोकरी, नवं गाव. नोकरीच्या कामाविषयी, तिथल्या माणसांविषयी यत्किंचित पूर्वकल्पना नाही, माहिती नाही. गावाविषयी तर इतके अनभिज्ञ की, त्याचं नावही पूर्वी कधी ऐकलं नाही. त्यामुळं त्याविषयी काहीच माहिती आपल्याकडं नसते. जायचा प्रसंग आला की, नेहमीप्रमाणं त्याविषयी विचार मनात सुरू होतात. पण खरं सांगायचं तर, विचार सुरू करायची नुसती इच्छाच होते. कारण कुठलाच विचार मनात येतच नाही. कितीही प्रयत्न केला, तरी सतत कोराच पडदा समोर येतो.

असंही एक चित्र आपण कधी पाहिलं असण्याची शक्यता आहे - 'स्वत:चा शोध' घेण्याचा मोठा चिवट प्रयत्न आपण करतो. नक्की आपण कोण, कसे आहो, खरे काय आहोत - साऱ्या धार्मिक, अधार्मिक, बुद्धिवादी, श्रद्धावादी - साऱ्या साऱ्या पद्धतींनी विचार करून होतो, पण पत्ता लागत नाही. वेगवेगळी साधनं करून होतात, थोडंसं 'स्वस्वरूपाचं दार' किलकिलं झाल्यासारखं वाटतं. पण क्षणात ते बंद होतं, गूढ पूर्वीपेक्षा वाढतं - विचाराचं सारं शास्त्र नि शस्त्र निष्प्रभ ठरतं.

अशा अनेक चित्रांचा आपला सामना होऊ शकतो. त्यावरून आपल्या काही गोष्टी लक्षात येऊ शकतात. सर्वांत पहिली ही की, विचार हा सर्व मानवी जीवन व्यापतो, असं वाटत असलं तरी, ते पूर्णपणे खरं नाही. आईच्या त्या

वात्सल्यासारख्या, प्रेमिकांच्या त्या अकृत्रिम नि:सीम प्रेमासारख्या अनेक मानवी अवस्थांत विचाराचा कुठं वावरही नसतो.

इतकंच काय, अशा अनेक 'क्षणांचा' - क्षणांचा का होईना - आपण अनुभव घेतलेला असेल की जिथं विचार पोचत नाहीत, आढळत नाहीत, त्यांची आठवणही होत नाही, गरजही वाटत नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट ही की, जिथं कुठं विचार आहे तिथं या ना त्या स्वरूपात भूतकाळाचाच वावर आहे. त्याच भूतकाळातल्या काही कल्पना घेऊन, अनुभव घेऊन, त्याची मोडतोड, घडामोड, जोडाजोड करून, नवे वाटणारे विचार समोर येत असतात. पण त्यांचा हा भूतकाळाचा मालमसाला, पुरवठा थांबला तर विचारच थांबतो, म्हणूनच ज्याच्याविषयी कोणतीच माहिती नाही - असं गाव नि नोकरीविषयी विचार करू गेलं, तर कोरा पडदाच समोर येतो.

तिसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, या भूतकाळातूनच जन्माला येण्यामुळं वर्तमानाशी साक्षात सामना विचाराला करता येत नाही. म्हणूनच 'स्वस्वरूपाचं ज्ञान किंवा स्वज्ञान किंवा ईश्वरस्वरूपाचं ज्ञान' असल्या कामी विचार थांबतो. त्याच्या कक्षेच्या पलीकडं जावं लागतं.

******

२६. विचाराचा विचार

आत्तापर्यंत आपल्या या 'विचारविश्वा'च्या यात्रेत आपण विचारांचे वेगवेगळे पैलू पाहिले. विचाराचा आपल्या जीवनामध्ये वावर किती व्यापक आहे, तेही पाहिलं. त्याचंच एक महत्त्वाचं अंग या भागात आपण पाहाणार आहोत आणि ते आहे, या 'विचारा'च्या वापराच्या साहाय्यानं आपल्यासारख्या सामान्यांच्या जीवनात परस्परविरोधी तत्त्वं आपल्यावर ठसवण्याच्या मोठमोठ्या प्रयत्नांचं.

आपल्याला एक अनुभव दर पाच वर्षांनी, अलीकडे तर वर्ष-दोन वर्षांनी, येत असेल की, निवडणुका जाहीर होतात. एकमेकांच्या ठाम विरोधात असलेल्या पक्षांच्या सभा सुरू होतात. सत्ताधारी येऊन एक तर्कसंगत नि त्यांची बाजू कशी बरोबर आहे, हे सांगणारं भाषण देऊन जातात. मग विरोधी पक्षातलं कुणी मातब्बर व्यक्तित्व येतं नि आपली बाजू कशी बरोबर आहे, हे सांगून जातं. माणूस म्हणून आपल्याला दोन्ही बाजू पटतात. त्यातही दुसरी बाजू पटते, तेव्हा आपल्याला आश्चर्यही वाटतं की, काय हे, आपल्याला काल त्यांचं पटलं होतं, आज यांचंही पटतं आहे. दोन्हीही खरी आहेत की आपणच बुद्दू आहोत ! आपण मत कुणालाही देवो, आपल्याला दोघांनीही पटवल्याची नि गंडवल्याची रुखरुख राहाते खरी.

आता 'विचारविश्वा'चा थोडाफार का होईना, अभ्यास केल्यावर आपल्याला याबद्दल काहीतरी जास्त आकलन व्हायला हवं ना ? निदान दोघांचंही पटत असेल तर असं का होतं, हे तरी वैचारिकदृष्ट्या आपल्याला शोधता यायला हवं, नाही का ? अशा वेळी यावर थोडा विचार केला, तर असं का होतं, याचे काही पर्याय आपल्याला सुचू शकतील.

१) दोन्हीही बाजूंमध्ये काही भाग तथ्याचा आहे. पण काही भाग तथ्य नसलेला आहे. सांगताना मात्र दोन्ही बाजू फक्त तथ्य असलेला भागच सांगत असतील.

२) काही वस्तुस्थिती अशा असतात किंवा काही प्रश्नच असे असतात की, ज्यांचा अंतिम निकाल कोणत्याच बाजूनं कधीच लावता येत नाही. उदाहरणार्थ, कारखानदारी किंवा शेती. नक्की एकाच गोष्टीचा अंमल केल्यानं देशाचं अंतिम किंवा कायमचं भलं होईल, असं सांगणं अवघडच आहे. अशा वेळी, कारखानदारीच्या बाजूच्या पक्षाचं नि शेतकरी बाजूच्या पक्षाचं म्हणणं यात विरोधही राहाणार नि मर्यादित तथ्यही असणार. तीच गोष्ट इतर अनेक मुद्यांच्या बाबतीतही असू शकते. जसं लोकशाही-राजेशाही, लोकशाही-हुकूमशाही, सरकारीकरण-खासगीकरण, ईश्वरवादी-निरीश्वरवादी इ.

३) अनेकदा अशा दोन्हीही बाजू बरोबर नसतानाही, फरक असतो तो केल्या जाणाऱ्या युक्तिवादात किंवा त्यात वापरल्या जाणाऱ्या आधारांच्या, संदर्भांच्या ठिसूळपणात. तो आपल्याला हुडकता येत नसेल. सरकारीकरणाच्या बाजूचा पक्ष सारी आकडेवारी देतो ती सरकारकरणाने भले झालेल्यांची आणि तसंच खासगीकरणवालाही पक्ष आकडेवारी देतो ती फक्त खासगीकरणानं भलं झालेल्यांची. त्यामुळं त्या दोन्ही पटतात. त्याच्याच बरोबर या दुसऱ्या किंवा विरोधी बाजूच्या आकडेवाऱ्या मागवण्याचं किंवा मिळवण्याचं किंवा विचारात घेण्याचं आपण ठरवलं की, मग कुणाच्याच म्हणण्यानं आपण प्रभावित होत नाही. या आकडेवारी प्रकरणात जर टक्केवारीच्या भाषेत काही सांगितलं असेल तर 'विचारविश्वा'शी परिचितांनी तर जरूर सावधच राहायला हवं. कारण त्यातली धूळफेक आपल्या लगेच लक्षात येऊ शकेल.

जाताजाता इथं सॉक्रेटिसची एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. तो फिरतफिरत एका गावातल्या एका मंदिराजवळ पोचला. तेव्हा तिथल्या पुजाऱ्यानं मोठ्या कौतुकानं त्याचं स्वागत करून त्याला सारा परिसर दाखवला. शिवाय वारंवार सांगितलं की, हे एक अतिशय जागृत देवस्थान आहे. सॉक्रेटिसनं कारण विचारल्यावर त्यानं सांगितलं की, या देवाकडं भक्तांनी काही इच्छा व्यक्त केली, तर ती पुरी होते म्हणून. याचा पुरावा म्हणून त्यानं जवळच लावलेले काही फलक दाखवले आणि सांगितलं की, हे मी सांगोवांगीचं सांगत नाही, तर ज्या ज्या लोकांच्या नवसाला हा देव पावला त्यांची ही नामावळीच

इथं बोर्डावर लिहिली आहे. कित्येक नावं त्या बोर्डावर होती.

सामान्य माणसाला त्याच्या विचारशक्तीनुसार इतका पुरावा दिल्यावर विश्वास ठेवणं आणि आपणही चार पैसे ठेवून नवस करणं एवढाच मार्ग होता. पण सॉक्रेटिस विचारशास्त्राचे नियम जाणणारा होता. तो एवढंच म्हणाला की,याच यादीबरोबर ज्यांनी ज्यांनी नवस केले, पण त्याप्रमाणं घडलं नाही, त्यांचीही एक यादी इथं ठेवली असती, तर मग खरं पुराव्यानिशी ठरवता आलं असतं की, हा देव खरंच जागृत आहे की नाही !

अशा तऱ्हेनं, केवळ निवडणुकीत पक्षापक्षांच्याच बाबतीत नव्हे तर अनेक बाबतीत आपला बुद्धिभेद होत असतो, आपण ओढले जातो. कुणाच्या तरी काही 'अंत:स्थ' हेतूंसाठी आपलीच काय समाजाचीही फरफट होऊ शकते.

अशा वेळी विचाराच्या विश्वाविषयी जागरूक राहू, तर आपण निदान अशा प्रचारकांचं म्हणणं - मग ते भले निरीश्वरवाद्यांचे प्रचारक असोत की ईश्वरवाद्यांचे प्रचारक असोत किंवा लोकशाहीवाद्यांचे असोत की हुकूमशाहीवाद्यांचे असोत - समजून घेऊ, तपासून पाहू. निदान आपल्याला स्वत:ला तरी वाचवू शकू.

******

२७. विचारविकास आणि आपलं जीवन

विचारशक्तीच्या अभ्यासाचा एक वापर आपल्यावर लादण्यात येणाऱ्या विविध युक्तिवादांतून, त्यातून आपल्या होणाऱ्या फरफटीतून वाचवण्यासाठी कसा करता येईल, हे आपण पाहिलं. आता याच विचारशक्तीचा वापर आपल्याआपल्या लहान मोठ्या आयुष्यातल्या विविध ताणतणावांच्या प्रसंगांत, निराशेच्या, वैफल्याच्या प्रसंगांत कसा काय करता येतो, याविषयी काही उदाहरणांच्या साहाय्यानं विचार करू या.

१) एक म्हातारे गृहस्थ. अत्यंत दुर्दैवी, अशा अर्थानं की मुलांनी या वयात त्यांना त्यांच्या घराबाहेर जायला सांगितलं. या गृहस्थांचं म्हणणं असं की, मी यांच्या बाबतीत कर्तव्यात कुठं कसूर केली नाही. माझी पत्नी अकाली गेली तरी यांची आबाळ होऊ दिली नाही, यांना त्रास होऊ नये म्हणून दुसरं लग्न केलं नाही. मुलांना स्वत:च्या पायावर उभं राहाता येईल इतकं शिक्षण, पुढं उद्योगधंद्यासाठी पुरेसा पैसा - एवढं सगळं केलं. इतकं मनापासून कर्तव्य करूनही असं विपरीत फळ मला का मिळावं ?

- या क्षणी त्या म्हाताऱ्या गृहस्थांवर अन्याय होतो आहे, शिवाय त्यांची मुलं जे वागताहेत ते बरोबर नाही, हे आपल्यालाही ऐकल्यावर वाटेलच. पण त्यांचा जो 'कर्तव्याचं फळ विपरीत' हा प्रश्न आहे, त्याचा मात्र पुरेसा व वस्तुनिष्ठ विचार न झाल्यानंच तो पडलेला आहे. हे जरा शांतपणे विचार केला तर लक्षात येईल. त्यांनी जे काही आयुष्यभर मुलांसाठी केलं ते 'कर्तव्य' भावनेनं केलं असेल, तर कर्तव्य याची व्याख्या पाहाणं आवश्यक आहे.

तीच मुळी अशी आहे की, स्वत: जे करणं योग्य आहे ते दुसरा काय करतो किंवा करील किंवा स्वत:च्या कृतीला फळ कोणतं येईल हे न पाहाता करणं म्हणजेच कर्तव्य ! मग हे जर 'कर्तव्य' असेल तर ते पूर्ण झालेलं आहे, या आनंदात राहाणंच योग्य होईल. कारण मुलं पुढं काय करतात, याच्याशी या कर्तव्याचा काही संबंधच उरत नाही. हा विचार मनात आला तरी चित्ताला सावधानता येते.

मग आपल्याला दोनच पर्याय उरतात - एक, मी 'कर्तव्य' म्हणत असेन तर आत्ता मुलं कशीही वागत असतील, तरी उलट ती माझ्या 'कर्तव्या'ची कसोटी समजून शांतपणे राहणं आणि दुसरा पर्याय, माझं ते 'कर्तव्य करणं' नव्हतंच असं तरी कबूल करणं. कर्तव्य नसेल तर तो व्यवहार आहे. व्यवहारात कधी आपण फायद्यात येतो, कधी तोट्यात - तसे आपण मुलांशी केलेल्या व्यवहारात फसलो आहोत, हे समजून राहाणं. यातही पुन्हा दु:ख करण्यासारखं काही नाहीच. कारण व्यवहारात आपण फसतो तेव्हा सोसावा लागणारा त्रास हा आपल्या कमी पडलेल्या बुद्धिचातुर्यामुळं असतो. शिवाय ती फसल्याची शिक्षा असते. एकूण शांत राहाणंच क्रमप्राप्त असतं आणि विचारानं हे सारं मनाला उमजतं आणि कुण्या व्यक्तीला दोष न देता आपण शांत राहू शकतो.

२) बढतीच्या परीक्षेचा निकाल येतो. खूप प्रयत्न करूनही आपण त्यात नापास झाल्याचं कळतं. आपण अत्यंत निराश होऊन घर गाठतो. सारी निराशा वा वैफल्य घरच्यांवर निघतं, जगावर निघतं, सहकाऱ्यांवर निघतं. गुणवत्तेची कदर राहिली नाही, वशिलेबाजी, पुढंपुढं करणारे लोक, त्यांचीच चलती आहे वगैरे वगैरे.

- शांतपणे विचार केला तर अनेक गोष्टी समोर येतात.

एक- आपली नोकरी, जिच्यावर आपलं आजचं सारं आयुष्य अवलंबून आहे - ती काही या निकालामुळं संपलेली नसते. उलट, ती नोकरी म्हणजेच त्या अर्थानं आपलं आयुष्य अबाधित असतं.

दोन - नोकरी देताना पगाराची, नोकरीत कायम करण्याची एक हमी दिलेली असते. त्यानुसार सरकार किंवा मालकसंस्था वागलेले असतात. बढतीची कुठलीही हमी मुळातच दिलेली नव्हती.

तीन - आजचा माझा त्रागा, परीक्षापद्धतीचा दोष, वशिलेबाजीला दोष - सारा त्या अपयशापोटी नाही का? पास झालो तर कधी यांतल्या एकाला तरी दोषी धरलं असतं का ?

चार - ही काही आयुष्यातली बढतीची शेवटची संधी नाही. अजून अनेक वेळा ही किंवा या प्रकारची संधी मिळायची असते.

पाच - कोणतीही परीक्षा म्हटलं की पास-नापास गृहीतच नाही का ?

सहा - आपण ज्या वयात बढतीचा विचार करतो आहोत किंवा ती न मिळाल्यानं आज अस्वस्थ होतो आहोत, त्या वयात अनेकांना अजून अशी सरकारी कायम वगैरे नोकरी तर सोडाच, साधी खासगी चांगली नोकरी मिळणंसुद्धा अजून शक्य झालेलं नाही. मग तसा वैतागण्याचा अधिकार त्यांना अधिक की मला अधिक ?
सात - त्या परीक्षेसाठी अपेक्षित असलेली काही एक किमान गुणवत्ता लेखी, तोंडी परीक्षेतून प्राप्त झाली, तर त्यांचं नाव यशस्वींच्या यादीत येणं, हा त्या मूळ व्यवस्थेचा आपणा सर्वांनाच मान्य असलेला भाग नाही का ? मग त्या व्यवस्थेचा भाग असताना मध्येच एकदम काहीतरी अव्यवस्था निर्माण झाल्याचं म्हणणं म्हणजे कांगावा नव्हे काय ? इत्यादी इत्यादी. इतके विचार आपल्यासमोर उभे राहतील की, तो वैताग, निराशा कधीच हद्दपार होईल.

३) आपल्यापेक्षा लहानांचे अकाली मृत्यू घडतात. माणूस त्या साऱ्यानं विषण्ण होतो. पोटच्या मुलामुलींचे अकाली मृत्यू माणसाला खचितच अगदी निराश करतात. अनेकांना वाटतं, देवाच्या दरबारात न्याय नाही. अनेकांना अगदी आयुष्यातून उठल्यासारखं वाटतं. नेहमीची कर्मकर्तव्यं करायलाही अनेक जण नकार देतात. विचार केला तर आपल्या लक्षात येतं की -
एक - प्रत्येक माणसागणिक त्याचंत्याचं आयुष्य नि त्याची मर्यादा आहे. अत्यंत धडधाकट माणूस म्हणून तो जास्त जगतो असं नाही, नि अशक्त आहे म्हणून लवकर जातो असंही नाही. तोच नियम या मुलालाही लागू नाही का ?
दोन - तो इतकी वर्षं जगला, तेव्हा तो जसा मी माझ्या कर्तृत्वाचा आनंद मानण्याचा भाग नाही, तसा तो जाणं हाही माझ्या कुठल्या अपयशाचं दु:ख मानण्याचा भाग नाही.
तीन - आपल्या मनासारखं होतं तेव्हा देव न्यायी आणि मनाविरुद्ध होतं तेव्हा देव अन्यायी, हे सारं म्हणजे माझ्या सोयीचा भाग आहे. इत्यादी इत्यादी.

अशा अनेक प्रकारे तणावात व्यापक, वस्तुनिष्ठ व सर्वांगीण विचार, प्रगल्भ विचार आपल्या नक्की मदतीला येतो. त्याचा हा महत्त्वाचा वापर करण्याइतपत आपल्या ठिकाणी विचारशक्तीचा अभ्यास व विकास मात्र घडवला पाहिजे.

******

२८. विकासातले अडथळे

विचारांचा विचार करणारी जी शास्त्रं आज अनेक वर्षं त्याच्या जास्तीत जास्त पैलूंवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करताहेत, त्यांच्या प्रकाशात नि मुख्यत्वे आपल्याला अनुभवायला येणाऱ्या 'विचारां'च्या विश्वाच्या प्रकाशात, गेल्या काही प्रकरणांतून आपण 'विचारांच्या विश्वा'चा थोडाफार वेध घ्यायचा प्रयत्न केला. त्यात कुठल्याही शास्त्रीय, तांत्रिक माहितीपेक्षा आपल्याला दैनंदिन आयुष्यात पडणारे प्रश्न, आढळणाऱ्या परिस्थिती या साऱ्यांचा उलगडा करण्याचा प्रयत्न आपण केला. त्यातून पुढं येणारे काही महत्त्वाचे मुद्दे इथं अखेरच्या टप्प्यात सारांशानं पाहाणं उपयोगी ठरेल, असं वाटतं.

१) विचार, मानवी जीवनाला, मानवी कृतीचा आधार म्हणून व्यापून आहे.

२) विचार शब्दमय आहे, तसाच नि:शब्दही असू शकतो.

३) बहुतांश मानवी विचार शब्दांच्या साहाय्यानं चालतो.

४) शब्दांच्यातच गुंतलेला विचार त्यामुळंच शब्दांच्याच मर्यादांत राहातो. ज्या गोष्टी शब्दबद्ध करता येत नाहीत, तिथंच विचारही लटका पडतो.

५) विचार कळत वा नकळत घडू शकतो.

६) विचारावर संस्कार, अबोध मन, भावना अशांचा प्रभाव पडून त्याला वळण मिळू शकतं.

७) बराचसा विचार प्रश्नांना उत्तर शोधण्याच्या स्वरूपाचा असतो.

८) विचाराला विकास, विधायकता, व्यापकता, समावेशकता, निश्चितता अशी अनेक परिमाणं देता येतात. त्यामधूनच 'विश्वविचार'सुद्धा जन्माला येऊ शकतो.

९) विचाराच्या साऱ्या प्रगतीवर मानवी ज्ञान, प्रगती इतकंच काय, माणसाची विशालता व स्वास्थ्यसुद्धा अवलंबून आहे.

१०) शुद्ध विचारानं माणसाला आयुष्याचं सार्थक घडवता येतं.

या ठिकाणी, या विषयाचा या छोट्याशा पुस्तकापुरता समारोप करण्यापूर्वी एका महत्त्वाच्या विषयाचा ऊहापोह करणं गरजेचं वाटतं. माणसानं 'विचार' ही शक्ती विकसित करायची ठरवली, तर त्यात काही अडथळे आपोआपच निर्माण होत असतात. असे अडथळे कोणत्या कारणांनी निर्माण होतात आणि त्यासाठी काय उपाययोजना करता येतील, याचा विचार करण्याची गरज आहे. असे 'विचार-विकासा'तले अडथळे दोन स्वरूपाचे असतात.

एक - अबोध मनावर झालेल्या संस्कारापोटी हे अडथळे असतात. हे संस्कार कधी आपल्या नकळत किंवा पूर्वीपासूनचे असतात, कधी आपल्याला कळत्या वयात काही वेळा आपल्या कृतींतूनच किंवा इतरांच्या प्रभावातून, सहवासातूनही निर्माण झालेले असतात.

दोन - दुसऱ्या प्रकारामध्ये विचार करण्याच्या ज्या मर्यादा आपणच स्वत:लाच घालून घेतो, त्यामुळं हे अडथळे निर्माण होतात. स्वतंत्रपणे, विविध पर्यायांचा विचार करण्याची आपलीच क्षमता त्यामुळं गोठून जाते.

आपण रोजच्या व्यवहारात ज्या पद्धतीनं जगतो, ज्या रूढी, परंपरा पाळतो, जी मतं आपल्याला साधारणपणे बरोबर वाटतात, त्यामागं आपल्या आजूबाजूच्या वातावरणाचा नकळत प्रभाव असतो. त्याचा परिणाम आपल्या मनात सखोलपणे होऊन त्या त्या सूचनांनुसार आपण विचार व त्याप्रमाणं नकळत कृतीसुद्धा करायला लागतो.

आपल्या आहाराचं पाहा, वस्तूंच्या वापराचं पाहा. जे आपण एकदा नकळत वळण म्हणून स्वीकारलेलं असतं, त्याच्या पलीकडं काही विचार करणंसुद्धा आपल्याला शक्य होत नाही. यानं आपल्या वैचारिक-विकासाला विनाकारण अडथळा निर्माण होतो.

साधं, त्या सिसिलीतल्या राजानं विचारलेल्या प्रश्नांसारखं घडतं किंवा बेकनच्या घोड्याच्या गोष्टीसारखं होतं. म्हणजे असं की, एखाद्यानं प्रश्न विचारला की, आपण उत्तर शोधून-विचार करून सांगायचं असतं, हा संस्कार इतका नकळत आणि खोलवर असतो की, त्याची कल्पनासुद्धा येत नाही.

राजानं दरबारातल्या पंडितांना विचारलं की,पाण्यानं काठोकाठ भरलेलं भांडं आहे. त्यात जिवंत मासा सोडला तर पाणी बाहेर सांडत नाही आणि मेलेला

मासा सोडला की सांडतं. याचं कारण काय ? अनेकांनी डोकं खाजवून पाहिलं, विचारांची शिकस्त केली, जिवंत मासा प्राणवायू शोषून तरंगत असेल, मेलेला मासा जास्त जड असेल. नाना तऱ्हेनं विचार पुढं आले. पण मूळ ढाच्यातच दोष असल्यानं बरोबर उत्तराचा विकास घडू शकला नाही.

विचारलेल्या प्रश्नात मांडलेली वस्तुस्थिती बरोबरच असते, असं गृहीत धरण्याचा संस्कार इतका बळकट होता की, तोच विचारांना आडवा आला होता. मुळात भांड्यात असं घडूच शकत नाही. या उत्तराचा विचार यायला हा स्वत:चाच अडथळा आड आला.

अनेकदा दुसऱ्या पद्धतीनंही अडथळा कसा येतो, ते प्रत्यक्ष प्रयोगानंही दाखवता येतं. एका खोलीत एका छोट्याशा पुठ्ठ्याच्या खोक्यामध्ये काही मेणबत्त्या, काही टाचण्या, छोटी हातोडी, काड्यापेटी एवढं साहित्य देऊन जर प्रश्न ठेवला की, भिंतीवर मेणबत्ती कशी लावता येईल ? तर खूप वेळ विचार करूनही त्या उभ्या भिंतीवर मेणबत्ती लावणं हा प्रश्न अनेकांना सोडवता येत नाही. त्या टाचण्या, मेणबत्त्या नि काड्यापेट्या या साहित्याच्या आधारानं भिंतीवर मेणबत्ती कशी लागेल, हेच समजत नाही.

इथं विचाराचा विकास आपल्या स्वत:ला असलेल्या मर्यादांमुळं खुंटतो, हे तत्त्व माहीत असेल, तर साऱ्या पूर्वकल्पना बाजूला ठेवून विचार करता येईल. मेणबत्त्या ज्या छोट्या खोक्यात ठेवल्या आहेत त्याचा पर्यायी वापर असू शकतो, हे मुक्त विचारालाच सुचेल. तेच खोकं भिंतीवर टाचण्यांच्या साहाय्यानं अडकवता येतं. मेणबत्ती पेटवून मेणाच्या साहाय्यानं खोक्यावर लावता येते. अशा तऱ्हेनं भिंतीवर मेणबत्ती लावता येऊ शकते - हे उत्तर कळल्यावर सोपं वाटलं, तरी तसा विचार करण्यात आपल्याला कोणता अडथळा येतो, हे शिकण्यासारखं व लक्षात ठेवण्यासारखं आहे.

या दृष्टीनं आपल्या आपल्या 'विचारविश्वा'ला, त्यांतल्या शुद्ध विचाराच्या विकासाला अडथळे आणणारे घटक कोणते आहेत, विचारशक्तीच्या मर्यादा कोणत्या आहेत यांचा नित्य शोध घेत राहिलो तर, या 'विचारविश्वा'च्या प्रगतीचा आलेख उंच करीत नेणं अवघड नाही.

******

२९. विश्वविचार

इतर सर्व सजीवसृष्टीपासून माणसाला वेगळं, वैशिष्ट्यपूर्ण ठरवणारी नि प्रगत करणारी 'विचार' ही विलक्षण शक्ती आपल्या प्रत्येकाच्या ठायी कशी वास करते आहे, हे आपण पाहिलं. तिचा वावर आपल्या दैनंदिन जीवनाला कसा व्यापून उरला आहे, हेही आपण पाहिलं. तसंच आपण हेही पाहिलं की, 'विचारां'च्या पलीकडंही एक विश्व आहे. विचारांच्या विश्वालासुद्धा काही मर्यादा आहेत.

या 'विचारविश्वा'च्या 'ओळखी'चा हा छोटेखानी व प्रारंभिक प्रयत्न आटोपता घेण्यापूर्वी काही महत्त्वाच्या मुद्यांचा उल्लेख करणं आवश्यक वाटतं.

मी ज्या वातावरणात जन्म घेतो, ज्या पद्धतीचे संस्कार माझ्यावर घडतात, जे जे शिक्षण मी घेतो, वाचन करतो, पाहातो, ज्या पद्धतीच्या, संस्कृतीतल्या मित्रपरिवारात सातत्यानं वावरतो - त्याचे सखोल व नकळत परिणाम माझं 'विचारविश्व' घडण्यावर होत असतात.

एखाद्या अगदी निरीश्वरवादी वातावरणात वाढलेला मुलगा इतक्या सहजपणे 'ईश्वर वा तत्संबंधित गोष्टी' फेकून देत, त्यांचा आधार न घेता आयुष्यात विचार करतो, ते पाहाण्यासारखं असतं. तितकंच एखाद्या 'ईश्वरनिष्ठ' वातावरणात वाढलेला मुलगा अगदी सहजपणे 'ईश्वराधिष्ठित विचार' मांडीत आयुष्य जगतो, तेही पाहाण्यासारखं असतं.

'विचारविश्वा'च्या शास्त्राशी नि कलेशी परिचित नसणाऱ्याला यात विरोधाभास वाटतो. त्या एकमेकांनाही असा काही परिचय नसेल तर एकमेकांत मतभेदांची, विसंवादाची दरी जाणवू शकते. हा प्रश्न अशा अनेक विरोधी मतांच्या जोड्यांत आढळतो. इतकंच नव्हे तर, तो मतभेद पती-पत्नी, मित्र-मित्र, भाऊ-भाऊ अशा अनेक प्रकारच्या आजूबाजूच्या संबंधात नेहमी आढळतो. त्यावरून घडणारे ताणतणाव, दुरावे हेही आपल्याला नवीन नसतात.

पण याचा अर्थ असा नव्हे की, ते अपरिहार्य असतात. विचारांच्या उत्पत्तीची, हालचालींची, जडणघडणीची व्यापक पार्श्वभूमी समजून घेता आली, तर असे दुरावे नि तणाव खचितच विरू शकतात.निदान यावरून एक साधा निष्कर्ष

तरी मी माझ्या मनाशी बाळगू शकतो. तो असा की, माझं वातावरण, सर्व परिस्थिती, संस्कार जसे माझ्या प्रगतीला मदत करीत असतात, तसेच त्यांच्या त्यांच्या विशिष्ट आकार प्रकृतीप्रमाणं ते माझ्या विचारांना नकळत मर्यादाही घालतात, संकुचितही करीत असतात आणि याकडं सावधतेनं लक्ष ठेवलं तर, हा धोका आपण बऱ्याच प्रमाणात टाळू शकतो.

दुसरा मुद्दा असा समोर येईल की, जे काही आपलंआपलं विचारविश्व - विचारांची पद्धती, प्रमाण, दिशा - जसं काही आहे, त्याविषयी आपण फारच कमी विचार केलेला असतो. 'माझा विचार बरोबर आहे' या व्यतिरिक्त त्यावर फारसा विचार करण्याची गरज आपल्याला वाटत नाही ! यात आपणच स्वत:चं नुकसान करून घेतो आहोत, याची आपल्याला कल्पना येऊ शकते.

म्हणून आपल्याच या शक्तीबद्दल आपण जागरूक होण्याची, त्याबद्दलची आपली अकारण उदासीनता टाकण्याची गरज आहे. थोड्या औत्सुक्यानं, थोड्याशा प्रयत्नानं आपण या विश्वाकडं गेलो, तर आपण नक्कीच काही भरीव असं कमवू शकू.

तिसरा मुद्दा असा जाणवेल की, स्वत:च्या विचारांच्या प्रक्रियेबद्दल आपण जितकं जागरूक होऊ, तितकं आपल्या हे लक्षात येतं की, ही अशी प्रक्रिया प्रत्येक माणसामाणसांत आहे. त्यामुळं प्रत्येक माणसाचं 'विचारविश्व' समजून घ्यायला फारसं अवघड नाही. मला माहीत नसलेले संस्कार, शब्द, भाषा, अनुभव हे समजून घ्यावं लागेल. पण मूळ प्रक्रिया सारखीच राहील.

यातली एक महत्त्वाची बाब म्हणजे, आपले सारे विचार हे आपल्याला म्हणजे 'स्वत:ला' धरून म्हणजेच स्वार्थाला धरून नकळतपणे घडत असतात. स्वत:चं सुख, स्वत:च्या कल्पना, मतं, विश्वास, अनुभव अशा अनेक गोष्टींच्या परिघाबाहेर विचार करता येत नाही. म्हणूनच अर्थात आपला विचार संकुचित तर होतोच, पण तो सर्वथा 'हिता'चा ठरत नाही.

'माझ्या'वर येणारं संकट टाळण्याचा विचार जितका सहजपणे मी करू शकतो, तितक्याच सहजपणे मला तसंच संकट दुसऱ्यावर येऊ नये, याचाही करण्याची गरज आहे. तसं असूनही, तसा विचार तितक्या सहजपणे करता येत नाही, हा अनुभव आपण घेऊ शकतो. वास्तविक, असा नि:स्वार्थी विचार

आणि अर्थातच तशी कृती करणाऱ्यांमुळंच तर जग निर्वेधपणे सुरू राहातं, प्रगत होतं, सुखी होतं.

यातही अधिक प्रगल्भ माणसं केंद्रस्थानीच्या 'स्व'च्या जागी 'जगा'ला ठेवू शकतात. तीच माणसं संत वा सत्पुरुष म्हणून गणले जातात. त्यांच्या 'विचारविश्वा'मध्ये 'विश्वविचार'च सदैव वास करीत असलेला दिसतो. म्हणूनच 'अवघे विश्वचि माझे घर । ऐशी जयाची मति स्थिर' असे श्री ज्ञानोबा 'पसायदाना'मध्ये साऱ्या विश्वाचं कल्याण व्हावं असा विचार आपल्यासमोर ठेवतात, तेव्हा तोच संकुचित, सीमित विचार, विचारानंच किती 'विशाल, व्यापक व त्यामुळं विलक्षण विस्मयकारक' होऊ शकतो, याचा प्रत्यय येतो. म्हणूनच श्री तुकोबा 'अणुरणिया थोकडे' असूनही भक्तिसाधनेनं 'तुका आकाशाएवढा' असा अनुभव का सांगू शकतात, ते कोडं उलगडू शकतं.

'विचारविश्वा'च्या परिचयानं, प्रयत्नानं आपण याच 'विचारशक्ती'च्या साहाय्यानं 'विश्वविचारा'ची मजल गाठू शकू. यासाठी 'विचारे इहलोक परलोक । विचारे होतसे सार्थक' हा श्री रामदासस्वामींचा निर्वाळा खरोखरच विचार करायला लावणारा नि आयुष्याला विधायक दिशा द्यायला लावणारा ठरेल, यात नवल ते काय ?

म्हणूनच या विचारांच्या विश्वाची ओझरती ओळख करून घेण्याचा हा नम्र प्रयास. आपल्या आयुष्याचं सार्थक करू शकणाऱ्या या 'विचारां'विषयी आपणाला जागरूकता येवो व या 'ओळखी'चं रूपांतर गाढ परिचयात होवो, अशा सद्‌भावना व्यक्त करून या प्रयत्नाला विराम देतो !

******

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात : आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती) श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. संतबोध : भाग ४ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार : मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. उत्तरायण -भाग ३ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. अनुभवपुष्पे - भाग २ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. श्रद्धा : श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. अनुभवपुष्पे - भाग ३ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. अर्घ्य : ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. जीवनचिंतन : दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. स्वास्थ्यसंवाद : मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. वचनांजली भाग १ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. अक्षरायण : आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. वचनांजली भाग २ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. भावगीता : श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

विचारविश्वाची ओळख

(नवी आवृत्ती)

प्रत्येक माणसाच्या मनात विचार हे असतातच ! विचाराचं स्वरूप कसंही असो आणि माणूस विचार कळत करो किंवा नकळत करो. माणसानं कितीही टाळलं तरी विचार करणं त्याला टळत नाही. आपल्या आयुष्यातल्या घटना पाहिल्या तर त्यामागं विचारांचं मोठं कर्तृत्व दिसतं. जसे काही चूक-बरोबर, पूर्ण-अपूर्ण विचार केले गेले तशीच दिशा आपल्या कृतीला मिळाली आणि त्यानुसार बरेवाईट परिणामही अनुभवायला मिळाले, असं दिसतं.

पण आपल्या आयुष्यात इतक्या महत्त्वाच्या असलेल्या 'विचारविश्वा'बद्दल मात्र आपण क्वचितच जागरूक असलेले आढळतो. वास्तविक या 'विचारांच्या जगा'ची निदान 'ओळख' तरी आपल्याला होणं किती गरजेचं आहे ! हीच गरज 'विचारविश्वाची ओळख' या पुस्तकाद्वारे पूर्ण होत आहे.